अंतिम मार्गदर्शक सूचना

जा.क्र.कृआ/नपि/विप्र-३/कृप/राअसुअ/२३१८/332/२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००५
दिनांक -31/०५/२०१८

प्रति,

१. **विभागीय कृषि सहसंचालक** अमरावती / नागपूर विभाग

२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** बुलढाणा, अकोला,अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर

**विषय:- कृषि उन्नती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत "बीटी विरहीत" सघन कापूस विकास कार्यक्रम २०१८-१९ राबविणेबाबत. . .**
अंतिम मार्गदर्शक सूचना . . . .

संदर्भ-१. केंद्र शासनाचे पत्र जा.क्र.एफ क्र. ३-१/२०१७/सीयु-४, दि. २८.०२.२०१८ (अॅलोकेशन)
२.कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.सीओए/विप्र-३/एनएफएस-सीसी/ कॉटन/ एएपी/२३१८/१५२/२०१८, दि. २०.०३.२०१८ (प्रस्तावित कार्यक्रम)
३. कृषि आयुक्तालयाचे पत्र कृउसं/नपि/विप्र३/कृप/रा अ सु अ/२३१८/८८, दि. २३.०२.२०१८
४. कृषि आयुक्तालयाचे पत्र कृआ/विप्र३/राअसुअ-कापूस/२३१८/११६,दि.५.०३.२०१८ (प्रस्तावित वाकुआ)
५. कृषि आयुक्तालयाचे पत्र कृआ/विप्र३/राअसुअ-कापूस/२३१८/१९९,दि.९.०४.२०१८ (बियाणे उपलब्धता)
६. केंद्र शासनाचे पत्र जा.क्र.एफ क्र. २-९/२०१५/सीयु-४, दि. ०३.०५.२०१८ (केंद्राची प्रशा. मान्यता)
७. शासन निर्णय क्र. ०४१८/प्र. क्र. १५५/१४-अे , दि. २७.०४.२०१८ (उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहिम)
८. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र. ३१/१७-अे , दि. १९.०४.२०१७ (डीबीटी)
९. शासन निर्णय क्र. सुकृओ-२०१६/प्र.क्र. ३०१/११-अे , दि. २१.०१.२०१७ (डीबीटी)
१०. कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक जा.क्र.आकृ कक्ष/सुधारित मापदंड/२६६/दि.९.०५.२०१८(नवासणी मापदंड)
११. कृषि आयुक्तालयाचे पत्र कृआ/नपि/विप्र३/कृप/राअसुअ/२३१८/३११, दि. १९.०५.२०१८
१२. शासन निर्णय क्र.अेओपी-२०१८/प्र.क्र.४६/४-अे , दि. २३.०५.२०१८ (प्रशासकीय मान्यता)

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम सन २०१४-१५ पासून राबविण्यात येत आहे. संदर्भिय पत्र १ अन्वये केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम २०१८-१९ राबविण्यासाठी रु. ३५४.५५ लाखाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्यासाठी दर्शविला. त्यानुसार संदर्भ २ अन्वये वार्षिक कृती आराखडा सन २०१८-१९ साठी प्रस्तावित करण्यात आला. दरम्यान संदर्भ ३ अन्वये जिल्हानिहाय, घटकनिहाय भौतिक व आर्थिक कार्यक्रमासह प्रस्तावित कार्यक्रम पूर्वतयारीसाठी आपल्या कार्यालयास पाठवून त्या अनुषंगाने देशी वाणांच्या/अतीलांब धाग्याच्या कापसाच्या बियाणांचे आरक्षणाबाबत कार्यवाही सुरु करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच संदर्भ ४ अन्वये केंद्र शासनाने सन २०१८-१९ करिता नविन घटकांच्या अंतर्भावासह आणि अर्थसहाय्यातील बदलासह प्रस्तावित कार्यक्रम कळवून स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाच्या कार्यक्रमांतर्गत कृषि विद्यापीठांच्या सहकार्याने घ्यावयाचे घटक काही घटक प्रस्तावित करावयाचे असल्यास त्याबाबत कळविण्यात आले होते. संदर्भ ५ अन्वये महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाकडील बियाणे उपलब्धता देखील आपणास कळविण्यात आली होती.

संदर्भ २ अन्वये प्रस्तावित कृती आराखड्यास केंद्र शासनाने संदर्भ ६ च्या पत्रान्वये सदर कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ करीता कापुस पिकासाठी केंद्र:राज्य ६०:४० टक्के यानुसार केंद्र हिस्सा रु. २१२.७३ लाख आणि राज्य हिस्सा रु. १४१.८२ लाख अशा एकुण रु. ३५४.५५ लाख रक्कमेच्या कार्यक्रमास प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने संदर्भ ११ अन्वये अंतरीम मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या होत्या.

सदर कार्यक्रमास संदर्भ १२ अन्वये राज्यशासनाने प्रशासकिय मान्यता प्रदान केलेली आहे. त्याच्या अधिन राहून योजना अंमलबजावणीच्या अंतिम मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

सन २०१८-१९ करीता योजनेंतर्गत संदर्भ ३ अन्वये जिल्हानिहाय, घटकनिहाय कार्यक्रम कळवून तालुकानिहाय कार्यक्रम प्रस्तावित करण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र जिल्ह्यांकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्याने आता जिल्हानिहाय कळविण्यात आलेल्या लक्ष्यांकाच्या अनुषंगाने उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिमेच्या निकषानुसार

जिल्ह्यातील कमी उत्पादकता असलेल्या तालुक्यात आणि तालुक्यातील मंडळात जिल्हास्तरावरुन लक्ष्यांक निश्चित करुन देण्यात यावेत. **सदर योजनेंतर्गत बीटी बियाणे वापरण्यात येऊ नये.** सूक्ष्म मूलद्रव्य ही बाब निवडलेल्या शेतक-यांनी माती परिक्षण आणि जमिन आरोग्य पत्रिकेतील शिफारशींनुसार स्वखर्चाने राबवावयाची आहे.

त्याप्रमाणे कार्यक्रम राबवण्याबाबत क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. कपाशीची लागवड मे अखेर/जून महिन्याच्या सुरवातीस होत असल्याने केंद्रिय कापूस संशोधन संस्था, नागपूर, महाबीज, राष्ट्रीय बीज निगम तसेच कृषि विद्यापिठे यांचेकडून कापसाचे देशी वाणाचे व बीटी विरहित संकरित वाणाचे तसेच आंतरपिकासाठी मुग, उडीद चे आवश्यक बियाणे त्वरित आरक्षित करुन ठेवावे. **याबाबत संदर्भ ३ व ५ अन्वये यापूर्वीच सूचित करण्यात आले आहे. संदर्भ ७, ८ व ९ च्या शासन निर्णयातील सूचनांचा पीक प्रात्यक्षिके आयोजित करताना अवलंब करावा.** योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या शेतक-यांना प्रात्यक्षिकासाठी लागणा-या कृषि निविष्ठा या प्राधान्याने महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापिठे, शासकीय जैविक प्रयोगशाळा (बियाणे व जैविक खते व औषधे इ.) या शासकीय संस्थांमार्फत शेतक-यांनी खरेदी प्रथम येणा-यास प्राधान्य या तत्वावर आणि संस्थेस रक्कम अदा करुन कृषि निविष्ठा त्वरित उचलण्याबाबत कळवावे. या निविष्ठांव्यतिरिक्त अन्य निविष्ठांची लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने खरेदी करावी व त्यानंतर गटातील शेतक-यांच्या आधार सलग्न बँक खात्यात थेट अनुदान जमा करावे. याबाबतची देय रक्कम थेट अनुदान वितरण (डीबीटी) पध्दती संदर्भ ८ व ९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली असून रक्कम शेतक-यांच्या बँक खात्यावर करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत लोकवाटा जमा करण्यात येऊ नये.

आपल्या जिल्ह्यास देण्यात आलेल्या लक्ष्यांकाच्या अनुषंगाने पुरेसे बियाणे शेतक-यांना वेळेत उपलब्ध होईल असे पहावे. बियाणे उपलब्ध नसल्यास तसे संस्थेकडून लिखित स्वरुपात निवेदन घेण्यात यावे. बियाणे उपलब्धते अभावी तालुका / जिल्ह्याचा कार्यक्रम कमी होत असल्यास विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास ३१ मे २०१८ पूर्वी कळवावा. विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय याबाबतची कारणमिमांसा करुन आवश्यकतेनुसार सदरचे क्षेत्र लक्ष्यांक विभागांतर्गत इतर जिल्हास वळती करतील. कापूस लागवडीच्या कालावधीनंतर लक्ष्यांक साध्य होऊ शकत नसल्याबाबतची कोणतीही सबब विचारात घेण्यात येणार नाही.

कृषि विभागामार्फत शेतक-यांना कीटकनाशके, खते, औषधे इ. ची 'जेनेरिक' नावाने शिफारस करण्यात यावी.

राज्यातील शेतक-यांचे उत्पन्न सन २०२२ पर्यंत दुप्पट करण्याच्या उद्देशाने सन २०१७-१८ पासून राज्यात **"उन्नत शेती-समृध्द शेतकरी"** मोहीम राबविण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भ ७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या असून त्यानुसार खरीप हंगामापासून अंमलबजावणीचे दृष्टीने सूक्ष्म नियोजन आपल्या स्तरावर केले असेलच. योजनेचे भौतिक व आर्थिक लक्ष्यांक प्रपत्र १ (जिल्हानिहाय) सोबत सहपत्रित केले आहेत.

परिशिष्ट १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे तिमाही अहवाल (लाभार्थी विगतवारीसह) तिमाही संपताच तर परिशिष्ट २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मासिक प्रगती अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेस सादर करण्यात यावेत.

सोबत : वरीलप्रमाणे

**(विजय घावटे)**
**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.अपर मुख्य सचिव, कृषि व पणन, महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई -३२.
२) मा. मंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक.
३) मा. राज्यमंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक.
४) मा. अवर सचिव, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान कक्ष, कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२

**प्रत:- माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सादर**

१) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि औद्योगिक विकास महामंडळ, राजन हाऊस, तिसरा मजला, प्रभादेवी, मुंबई २५

२) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, शास्त्रीनगर, अकोला.

३) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघुद्योग विकास महामंडळ, मुंबई.

४) मा.संचालक, कापूस निदेशनालय, डी.ओ.सी.डी. नागपूर

५) संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला; वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी; महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर

६) विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ३७.

२/- यांना विनंती की, सदर कार्यक्रमांतर्गत विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने कृषि विद्यापीठाच्या सहकार्याने निश्चित केलेल्या प्रती हेक्टरी खर्च प्रमाणकानुसार निश्चित केलेल्या कृषि निविष्ठा मागणीनुसार यथाशिघ्र पुरविण्यात याव्यात.

**प्रत सहपत्रासह माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.**

१) कृषि संचालक (सर्व)

२) कृषि उपसंचालक, आयुक्त कक्ष, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

३) कृषि माहिती अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी.

४) कृषि उपसंचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे-५

५) कृषि उपसंचालक (विप्र १), कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे-५

६) कक्ष अधिकारी (४अे), कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -३२

७) कार्यासन अधिकारी, नि.व.गु.नि.-५, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-१

**प्रतिलिपी - कृषि उपसंचालक, (पीक संरक्षण विप्र-७)**, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-५ यांना सहपत्रासह माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

२/- यांना कळविण्यात येते की, ऑनलाईन पेस्ट मॉनिटरिंग ॲण्ड ॲडव्हाजरी सर्व्हिसेस (ओपीएमएस) हा घटक क्रॉपसॅप या कार्यक्रमाशी सलग्न करुन राबविण्याबाबतची कार्यवाही आपल्या कार्यासनामार्फत करण्यात यावी. तसेच केंद्र शासनाने सन २०१८-१९ करिता सदर घटकासाठी मंजूर केलेल्या रक्कम ७७.५५ लाख निधीपैकी उपलब्धतेनुसार रक्कम कृषि उपसंचालक, विप्र ७ यांचे अधिनस्त खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. निधी प्राप्त होताच तो कृषि उपसंचालक, विप्र ७ कार्यासनामार्फत खर्च करण्याबाबतची सर्व कार्यवाही करुन त्याचा अनुपालन अहवाल, अंतीम उपयोगिता प्रमाणपत्राची प्रत विप्र ३ कार्यासनास पाठविण्यात यावी.

**प्रतिलिपी - कृषि उपसंचालक, (औजारे/किना, गुनि-५)**, कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-१ यांना सहपत्रासह माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

२/- यांना कळविण्यात येते की, स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाचे घटक अंतर्गत कॉटन श्रेडर या यंत्रासाठी केंद्र शासनाने सन २०१८-१९ करिता रक्कम ४५.०० लाख निधी मंजूर केला आहे. करिता सदर कार्यक्रम राज्यात राबविण्यासाठी कृषि यांत्रिकीकरण अंतर्गत राबविण्यात येणा-या प्रक्रियेमध्ये (जसे ऑनलाईन अर्ज मागविणे, छाननी इ.) या कार्यक्रमाची व या घटकाची नोंद घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

## कृषि उन्नती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये "बीटी विरहीत" सघन कापूस विकास कार्यक्रम राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना

सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- व्यापारी पिके या अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये आद्यरेषिय प्रात्यक्षिके (देशी आणि अती लांब धाग्याच्या कापूस /अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन, कापूस पीक आधारित आंतरपीक पध्दती आणि देशी वाणाच्या कापसाची अतीघन लागवड पध्दत) या घटकंतर्गत सन २०१८-१९ मध्ये केंद्र शासनाने प्रति हेक्टरी अर्थसहाय्याच्या स्वरुपात अंशत: वाढ केली आहे. या घटकांशिवाय राज्यस्तरीय अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण, ऑनलाईन पेस्ट मॉनिटरिंग सर्व्हिसेस (ओपीएमएस) आणि स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाचे कार्यक्रम या घटकांचा नव्याने समावेश केला आहे. यासाठी केंद्र:राज्य :: ६०:४० टक्के याप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकांतर्गत अन्नधान्य पिकांचा समावेश करण्यात आला आहे.

**या कार्यक्रमाची उद्दीष्टे पुढील प्रमाणे आहेत :-**

१) कापूस आधारित पीक पध्दतीस चालना देणे.
२) कापूस पिकात मुग, उडीद आंतरपिकास प्रोत्साहन देणे.
३) कापूस पिकात एकात्मिक कीड व्यवस्थापन, कापसाच्या देशी वाणांची अतीघन लागवड, अधिक लांब धाग्याच्या कापसाच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करुन कापूस उत्पादनास चालना देणे.
४) मनुष्यबळ विकासासाठी राज्यस्तरीय अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण
५) ऑनलाईन पेस्ट मॉनिटरिंग सर्व्हिसेस (ओपीएमएस) (क्रॉपसॅप शी सलग्न) द्वारे कापसावरील कीड व रोगाचे वेळीच नियंत्रण करणे
६) स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाच्या कार्यक्रमास प्रोत्साहन देणे.

**योजनेत अंतर्भूत जिल्हे -** ही योजना राज्यातील कापूस उत्पादक विभागामधील खालील प्रमुख ८ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|
| १ | अमरावती | १) बुलढाणा २) अकोला ३) अमरावती ४) वाशिम ५) यवतमाळ |
| २ | नागपूर | ६) वर्धा ७) नागपूर ८) चंद्रपूर |

सदर जिल्ह्यातील कापूस पिकाचे क्षेत्र व उत्पादकता वृध्दीच्या उद्देशाने अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

➢ **अभियान अंमलबजावणीचे वेळापत्रक :**

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | अंतिम तारीख |
|---|---|---|
| १ | प्रकल्प निवड व प्रकल्प आराखडा तयार करणे | २० मे |
| २ | नोंदणीकृत गटांची/शेतकरी उत्पादक कंपनीची निवड | २० मे |
| ३ | गटांची सभा- कार्यक्रम नियोजन व गटाच्या/ लाभार्थ्यांच्या जबाबदाऱ्या | २५ मे |
| ४ | पीक प्रात्यक्षिकांसाठी लाभार्थी निवड | २५ मे |
| ५ | पीक संरक्षणासाठी कीटकनाशके व जैविक कीडनाशके वाटप | २५ मे |
| ६ | ऑनलाईन पेस्ट मॉनिटरिंग सर्व्हिसेस (ओपीएमएस) क्षेत्र-लाभार्थी निवड | २५ मे |
| ७ | स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाचे कार्यक्रम: कॉटन श्रेडर या घटकासाठी लाभार्थी निवड | २५ मे |
| ८ | राज्यस्तरीय अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण | ३० जुन |
| ९ | बियाणे, बीजप्रक्रिया व पेरणीपूर्व आवश्यक निविष्ठा मागणी | ३० मे |
| १० | इतर निविष्ठांची मागणी | १० जुन |

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | अंतिम तारीख |
|---|---|---|
| ११ | बियाणे व पेरणीपूर्व आवश्यक निविष्ठा पुरवठा | १० जुन |
| १२ | इतर निविष्ठा पुरवठा | १५ जुन |
| १३ | क्षेत्रिय तपासणी तसेच अंतिम निवडलेल्या लाभार्थींची माहिती वेबसाईटवर भरणे | ३१ जुलै |
| १४ | शेती दिनाचे आयोजन करणे | ऑगस्ट-सप्टेंबर |
| १५ | कॉटन श्रेडर या निवडलेल्या लाभार्थीस पुरवठा / लाभार्थीकडून प्रापण निवड | ३० सप्टेंबर |
| १६ | पीक कापणी व उत्पादन अहवाल संकलन | ३१ डिसेंबर |
| १७ | यशोगाथा सादर करणे | १५ मार्च |

टीप : सदर वेळापत्रक तात्कालिक स्वरुपाचे असून स्थानिक परिस्थितीनुरुप आवश्यक ते बदल लागू राहतील

➢ **तालुका निवड -**

१. राज्याच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा कमी उत्पादकता असलेल्या जिल्ह्यांची आणि त्यातील तालुक्यांची निवड या कार्यक्रमात करावयाची आहे. **तालुकानिहाय उत्पादकता वाढीचे लक्ष्यांक उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहिमेच्या शासन निर्णयानुसार ठरवून दिल्याप्रमाणे जिल्ह्यातील सांख्यिकी विभागाच्या तालुकानिहाय तपशिलानुसार निर्धारित करावेत.** त्यानुसार जिल्ह्याने तालुकानिहाय लक्ष्यांक निश्चित करुन कृषि आयुक्तालयास कळवावी. तालुक्यातील प्रकल्प क्षेत्र निवडताना त्या तालुक्यातील सर्वात कमी उत्पादकता असणा-या मंडळाची निवड करुन प्रकल्प राबवावा.

२. जिल्ह्यातील अनुसुचित जाती (किमान १६ टक्के)/ अनुसुचित जमाती (किमान ८ टक्के)/यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करावी. तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थींच्या ३० टक्के महिलांची निवड करावी. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबवितांना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात यावा.

➢ **प्रकल्प आखणी**

सन २०१८-१९ चा कार्यक्रम १० हेक्टरचा एक या प्रमाणे लघु प्रकल्पाच्या (क्लस्टर) स्वरुपात राबविणे बंधनकारक राहील. त्यानुसार लघु प्रकल्प आराखडा तयार करावा. या प्रकल्पाचे उद्दीष्ट व त्यावरुन जो परिणाम अपेक्षित आहे यांची नीट मांडणी करुन लघु प्रकल्प तयार करण्यात यावे. निवड केलेल्या क्षेत्राच्या पायाभूत सर्वेक्षणाचे (बेसलाईन सर्व्हे) काम पूर्ण करुन सोबत सहपत्रित केलेल्या विहित प्रपत्रात माहिती भरुन प्रकल्पातील उत्पादकतेच्या लक्ष्यांकासह प्रकल्प आराखडा तयार करुन त्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मान्यता प्रदान करावी. निवड करण्यात आलेल्या प्रकल्प क्षेत्राची निवड इतर कोणत्याही योजनेमध्ये/प्रकल्पामध्ये करु नये. जर प्रकल्प क्षेत्राची एका पेक्षा जास्त प्रकल्पांमध्ये निवड केल्याचे आढळुन आल्यास प्रकल्पाचा संपूर्ण खर्च वसूल पात्र राहील. तसेच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे, याचा प्रगती अहवाल साध्य झालेली उत्पादकता, पीक कर्जाचे स्केल ऑफ फायनान्स या अनुषंगाने तयार करण्यात यावा. तसेच विविध बाबी राबवितांना पीक वाढीच्या विविध अवस्थेतील फोटोसहीत यशोगाथा तयार करावी.

➢ **योजनेमध्ये राबविण्यात येणारे घटक**

१. एकात्मिक पीक व्यवस्थापन (आयसीएम) आद्यरेषिय प्रात्यक्षिक
२. देशी आणि अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादनाची आद्यरेषिय प्रात्यक्षिक
३. आंतरपिक पध्दतीचे आद्यरेषिय प्रात्यक्षिक
४. देशी कापसाच्या अतीघन लागवडीच्या चाचण्या
५. पीक संरक्षण औषधी व बायो-एजंटच चे वितरण
६. राज्यस्तरीय प्रशिक्षण
७. स्थानिक पुढाकाराच्या बाबी

अ. ऑनलाईन पेस्ट मॉनिटरिंग ॲण्ड ॲडवायझरी सिस्टीम (ओपीएमएएस )
ब. कॉटन श्रेडरचा वापर

## ➢ पीक प्रात्यक्षिके

सदर कार्यक्रमांतर्गत पीक प्रात्यक्षिके आयोजित करण्याबाबत सर्वसाधारण सूचना खालीलप्रमाणे आहेत.

राज्यातील विविध पिकांची उत्पादकता वाढविण्याच्या हेतुने तंत्रज्ञान प्रसाराचे साधन म्हणून पीक प्रात्यक्षिके शेतक-यांच्या शेतावर आयोजित करण्यात येतात. यापुर्वी पीक प्रात्यक्षिकांसाठी लागणा-या निविष्ठा शासनामार्फत खरेदी करुन लाभार्थ्यांस पुरवठा करण्यात येत होत्या तसेच, प्रात्यक्षिकाचे क्षेत्र किमान १०० हेक्टर असल्याने मोठ्या प्रमाणावर विखुरलेल्या स्वरुपात प्रात्यक्षिके घ्यावी लागत होती. विखुरलेल्या स्वरुपातील या मोठ्या क्षेत्रावर पोहोचण्यास कृषि सहाय्यकांना शक्य होत नव्हते. परिणामी, सर्व शेतक-यांसोबत नियमित संवाद साधणे व तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रात्यक्षिकांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. पीक प्रात्यक्षिक १० हेक्टर क्षेत्रावर घेण्यात यावे व हे क्षेत्र शक्यतो सलग असावे.
२. पीक प्रात्यक्षिकाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कृषि सहाय्यकाची राहील.
३. निवड केलेल्या मंडळात सदर योजनेंतर्गत एकच पीक प्रात्यक्षिक घेता येईल. संबंधित कृषि सहाय्यकाच्या पर्यवेक्षकांनी दर १५ दिवसाला पीक प्रात्यक्षिकांना नियमितपणे भेट द्यावी व शेतक-यांना मार्गदर्शन करावे. तसेच कृषि सहाय्यकांना पुढील भेटीपर्यंत प्रात्यक्षिकांतर्गत करावयाच्या कामांबाबत सूचना द्याव्यात आणि भेटीवेळी झालेल्या कामाचे मुल्यमापन करुन आपला अहवाल वरीष्ठ कार्यालयास नियमितपणे सादर करावा. संबंधित मंडळ कृषि अधिका-यांनी १५ दिवसातून एकदा किमान एका पीक प्रात्यक्षिकास भेट द्यावी व आपला अहवाल प्रपत्र २ मध्ये सादर करावा. तालुका कृषि अधिका-यांनी दर महिन्याला जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांना पीक प्रात्यक्षिकाचा अहवाल सादर करावयाचा आहे.

प्रपत्र २

कृषि उन्नती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत "बीटी विरहीत" सघन कापूस विकास कार्यक्रम सन २०१८-१९

(१) आयसोपम २) आंतरपीक ३) एचडीपीएस प्रात्यक्षिक प्रकारानुसार कापूस व आंतरपिक (असल्यास) उत्पादकता स्वतंत्रपणे नमूद करावी.)

| अ.क्र. | गाव | तालुका | प्रात्यक्षिकाखालील क्षेत्र | उत्पादकता (किलो/हे.) लिंट | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रात्यक्षिक प्लॉट | तुलनात्मक प्लॉट |
| | | | | | |

४. विभागातील प्रत्येक अधिका-याने किमान एक प्रात्यक्षिक दत्तक घ्यावे. सदर प्रात्यक्षिकास नियोजनापासून वेचणी व पिकाचे अवशेष काढेपर्यंत दर महिन्याला एक भेट देऊन योग्य ते मार्गदर्शन करावे. याबाबतचा अहवाल वरीष्ठ कार्यालयास सादर करावा.
५. तालुक्यातील कापूस पिकाची सरासरी उत्पादकता, राज्यात काही शेतक-यांनी कापूस पिकात मिळविलेली उच्चतम उत्पादकता आणि त्या पिकाची विद्यापीठाने ठरवून दिलेली अनुवांशिक उत्पादनक्षमता (जेनेटिकल पोटेंशियल) यामध्ये मोठी तफावत आहे. ही तफावत कमी करुन पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी स्थानिक कृषि हवामान पध्दतीचा विचार करुन संबंधित कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कापूस पिकासाठी कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञाने (संचालक, संशोधन/संचालक, विस्तार) आधुनिक तंत्रज्ञान निश्चित करुन विभागीय कृषि सहसंचालकांना द्यावे. विभागीय कृषि सहसंचालकांनी या कामी कृषि विद्यापीठ, कृषि विभागाचे क्षेत्रिय अधिकारी व अन्य संस्थांशी समन्वय साधून तंत्रज्ञान निश्चित करुन घ्यावे व हे तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने विस्तार कार्याचे तसेच पीक प्रात्यक्षिकांचे नियोजन करावे. तंत्रज्ञान निश्चितीसाठी कापूस पिकाचे उच्चतम उत्पादन घेतलेल्या शेतक-यांची देखील मदत घेण्यात यावी.
६. एकुण १० हेक्टर क्षेत्र असणा-या शेतक-यांचे समुह/गटामार्फत प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी करण्यात यावी. गटामधील जे शेतकरी शासनाने ठरवुन दिलेल्या तंत्रज्ञानाप्रमाणे पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यास तयार असतील अशा शेतकरी समुहांना लाभार्थी म्हणून निवडण्यात यावे. गावातील प्रात्यक्षिकांच्या संख्येपेक्षा अधिक गटांची इच्छुकता प्राप्त झाल्यास लाभार्थी गटाची लॉटरी पध्दतीने निवड करण्यात यावी. प्रत्येक शेतकरी गटात किमान १० शेतक-यांचा समावेश असणे बंधनकारक राहील. प्रत्येक शेतक-याला कमीतकमी एक एकर व जास्तीतजास्त एक हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत आर्थिक लाभ देण्यात यावा.

७. पीक प्रात्यक्षिकासाठी निवडण्यात आलेल्या शेतक-यांना वाटप केलेल्या मृद आरोग्य पत्रिकेआधारे अथवा ज्या ठिकाणी मृद आरोग्य पत्रिका उपलब्ध नसेल अशा ठिकाणी मृद तपासणी करुन त्या अहवालाप्रमाणे लागणा-या निविष्ठा निश्चित कराव्यात. सदर निविष्ठा संबंधित कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञ व संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांनी निश्चित कराव्यात. प्रात्यक्षिकासाठी लागणा-या निविष्ठा प्राधान्याने महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठे, शासकीय जैविक प्रयोगशाळा (बियाणे, खते व औषधे इ.) या शासकीय संस्थांमार्फत शेतक-यांनी खरेदी कराव्यात. या निविष्ठांव्यतिरिक्त अन्य निविष्ठांची लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातुन त्यांच्या पसंतीने खरेदी करावी व त्या नंतर गटातील शेतक-यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्यात यावे. लाभार्थी गटाने पीकनिहाय वितरण केलेल्या व वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात. कृषि विभागामार्फत शेतक-यांना कीटकनाशके, खते व औषधे इ. ची 'जेनेरिक नावाने' शिफारस करावी.

८. पीक प्रात्यक्षिके राबविताना कृषी विद्यापीठाने पीकनिहाय व पिकाच्या वाढीच्या अवस्थानुसार केलेल्या शिफारशींचा अवलंब करावा. तसेच रासायनिक खतांवरील खर्च कमी करण्यासाठी आयुक्तालयाचे दि. २३ मे २०१६ च्या **<u>'पिकांचे उत्पादनावर परिणाम न करता उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना'</u>** बाबतच्या परिपत्रकातील सुचनांचा अवलंब करावा. प्रात्यक्षिक क्षेत्रामध्ये लाभार्थ्यांनी स्वखर्चाने केलेल्या अन्नद्रव्यांच्या प्रत्यक्ष वापराबाबतच्या नोंदी ठेवाव्यात.

९. ज्या शेतक-यांकडे सिंचन सुविधा असेल अथवा "मागेल त्याला शेततळे, जलयुक्त शिवार इ." इत्यादि योजना/उपक्रमाच्या माध्यमातुन विकसित सिंचन सुविधेचा लाभ होऊ शकतो आणि जे शेतकरी सूक्ष्म सिंचनाचा वापर करतील, त्यांना विशेष प्राधान्य देण्यात यावे.

१०. पीक प्रात्यक्षिकाद्वारे कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाचा वापर तसेच कीड/रोग नियंत्रण, पिकात ओलावा राखणे व उत्पन्नात वाढ करणे इ. बाबी साध्य कराव्यात.

११. पीक प्रात्यक्षिकामध्ये वापरलेले तंत्रज्ञान या प्रात्यक्षिकामध्ये सहभागी नसणा-या राज्यातील इतर सर्व शेतक-यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रात्यक्षिकाचे शेतावर स्थानिक शेतक-यांच्या भेटीचे आयोजन करण्यात यावे.

१२. प्रत्येक पीक प्रात्यक्षिकाकरिता शेतकरी गटाच्या व कृषि पर्यवेक्षकांच्या उपस्थितीत शास्त्रोक्त पध्दतीने पीक कापणी प्रयोग घ्यावेत. त्याचबरोबर रँडम पध्दतीने कंट्रोल प्लॉटची निवड करुन तेथील उत्पादकतेच्या नोंदी ठेवाव्यात. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कृषि सहाय्यकांची व पर्यवेक्षकांची राहील. आणि याचे संपूर्ण संनियंत्रण तालुका कृषि अधिकारी यांनी करुन पीक प्रात्यक्षिकांच्या उत्पादकतेची माहिती गावनिहाय / पीकनिहाय / महसूल मंडळनिहाय संकलित करावी. तालुक्यातील पीक प्रात्यक्षिकांच्या उत्पादकतेचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संकलित करुन कृषि आयुक्तालयास सादर करावा. सदर अहवाल कापूस पिकाच्या वेचणीनंतर १५ दिवसामध्ये कृषि आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी. पीक प्रात्यक्षिकामध्ये पीक कापणी प्रयोगाचे प्रत्यक्ष आयोजन करुन पीक कापणीचा अहवाल सादर करण्याची प्राथमिक जबाबदारी कृषि सहाय्यकांची असल्याने त्यांनी विहित कालावधीत अहवाल सादर करावा.

१३. पीक प्रात्यक्षिकांतर्गत विहित केलेल्या कमाल देय मर्यादेच्या आतच अनुदान अनुज्ञेय राहील याची कृपया नोंद घ्यावी. प्रात्यक्षिकांसाठी खरेदी लाभार्थी गटाने स्वत: करावयाची असून अनुदान थेट बँक खात्यावर जमा करावयाचे असल्याने लाभार्थी हिश्याचा प्रश्न उदभवत नाही.

१४. पीक प्रात्यक्षिकांसाठी आकस्मिक खर्चासाठी मंजूर रु. १००० प्रती हेक्टर ही तरतूद शेती दिन, प्रशिक्षण/प्रसिध्दी साहित्य, शास्त्रज्ञ व कृषि तज्ञ यांच्या भेटी व मार्गदर्शन व आकस्मिक खर्च इ. साठी खालीलप्रमाणे वापरावी.

- ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यामध्ये प्रात्यक्षिक प्लॉटवर शेतीदिनाचे आयोजन करुन परिसरातील शेतक-यांच्या भेटी घडवून आणाव्यात. शेती दिनास स्थानिक लोकप्रतिनिधींना बोलवावे. शेतीदिनासाठी प्रति हेक्टर रु. २५०/- या मर्यादेत खर्च करण्यात यावा. याद्वारे राबविलेल्या तंत्रज्ञानास व्यापक प्रसिध्दी द्यावी

- प्रशिक्षण/प्रसिद्धी साहित्यासाठी प्रति हेक्टर रु. २५० तरतूद असून सदर तरतूद लाभार्थ्याला शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करण्यासाठी वापरावी. याबाबतचा अहवाल शेतकरी मासिक कार्यासनास व या कार्यासनास स्वतंत्रपणे पाठवावा. मात्र लाभार्थी शेतकरी मासिकाचा सभासद असल्यास अन्य स्वरुपाचे प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

- शास्त्रज्ञ व कृषितज्ञ यांच्या भेटी व मार्गदर्शनासाठी रु.३०० प्रति हेक्टर अनुदान अनुज्ञेय असून पेरणीपूर्व/ पिकाचे वाढीच्या कालावधीमध्ये तसेच काढणीपश्चात कालावधीमध्ये प्रात्यक्षिक प्रकल्प क्षेत्रास कृषी विद्यापीठ/ कृषी

महाविद्यालय/ कृषी विज्ञान केंद्र/ कृषी संशोधन केंद्र येथील शास्त्रज्ञ यांच्या भेटी व लाभार्थ्यांशी संवाद घडवून आणावा. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाची नोंद कृषि सहाय्यकांनी क्षेत्रिय स्तरावरील नोंदवहीत करावी.

- उर्वरित रक्कम रु.२०० प्रति हेक्टर आकस्मिक खर्च-प्रात्यक्षिक नोंदवही इ. साठी खर्च करण्यात यावे.

१५. तालुका/ जिल्ह्यातील निवडक २ यशोगाथा कृषि आयुक्तालयास सादर कराव्यात. त्यानुसार महत्वाच्या टप्प्यातील पिकाच्या वाढीच्या अवस्थेतील छायाचित्रे काढून पाठवावीत.

सर्व प्रात्यक्षिकांसाठी संबंधित कृषि सहाय्यक यांनी प्रात्यक्षिकांचे सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक असून वरिष्ठ अधिका-यांनी वेळोवेळी प्रात्यक्षिकांना भेटी देऊन मार्गदर्शन करावे. प्रात्यक्षिके राबविण्याची संपूर्ण जबाबदारी कृषि सहाय्यकांची राहील व गावनिहाय संकलित केलेल्या पीक कापणी निरिक्षण अहवालाची एकत्रित नोंद मंडळस्तर एका स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे मंडळ कृषि अधिका-यांना बंधनकारक राहील. कृषि सहाय्यकांनी वर्षनिहाय नोंदवही प्रपत्र ३ नुसार ठेवावी. याबाबत तालुका कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची प्रशासकीय जबाबदारी राहील. प्रत्येक प्रात्यक्षिका शेजारी गुणात्मक तुलनेसाठी शेतक-याने स्थानीक पध्दतीने घेतलेल्या तेवढ्याच क्षेत्राचा कंट्रोल प्लॉट निवडावा. दोन्ही क्षेत्राच्या पिकाच्या पेरणीपासून कालक्रमानुसार वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी बरोबरच त्यासाठी आलेल्या खर्चाची तारीखवार नोंद व दोन्ही क्षेत्रातून आलेल्या उत्पादनाची सांख्यिकी पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेऊन विश्लेषणात्मक नोंदी खालील प्रपत्रात ठेवाव्यात.

प्रपत्र ३

कृषि उन्नती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत "बीटी विरहीत" सघन कापूस विकास कार्यक्रम सन २०१८-१९

कृषि सहाय्यक स्तरावरील पीक कापणी प्रयोग नोंदवही नमुना

(१)आयसीएम २)आंतरपीक ३)एचडीपीएस प्रात्यक्षिक प्रकारानुसार कापूस आणि आंतरपिकाची उत्पादकता इ.ची नोंदवही

| सहभागी शेतक-यांचे नाव व शेत गट क्र. | प्रात्यक्षिकातील क्षेत्र (हे.) | मिळालेले उत्पादन (क्विं./हे.) | किमान आधारभूत किंमतीनुसार मिळालेले उत्पन्न (रु./हे.) | | प्रात्यक्षिकातील मिळालेले निव्वळ उत्पन्न (रु./हे.) |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रात्यक्षिकातील | कंट्रोल प्लॉट | |
| | | | | | |
| एकूण | | | | | |

वरिष्ठ अधिका-याने या नोंदवहीत तपासणी करुन दिनांकासहित अभिप्राय नोंदवून स्वाक्षरी करावी.

- प्रात्यक्षिकांचे अनुभवावरुन गावातील /जवळपासच्या क्षेत्रातील किती शेतक-यांनी तंत्रज्ञान अवलंब केला.
- त्यांची शेतकरी संख्या . . . . व क्षेत्र . . . . हेक्टर
- प्रात्यक्षिकास भेटी दिलेल्या शेतक-यांची संख्या . . . . .
- सदर अभिलेख अभियानाच्या मूल्यमापनाचे वेळी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

सदर कृषि सहाय्यकाची बदली झाल्यास नोंदवही रुजू होणा-या नवीन कृषि सहाय्यकाकडे वर्ग करावी. सदर अभिलेख कायमस्वरुपी (२० वर्ष) जतन करणे बंधनकारक राहील.

- ➢ तालुक्याची सरासरी उत्पादकता
- ➢ प्रात्यक्षिकासाठी निर्धारित उत्पादकता
- ➢ प्रात्यक्षिकात आलेली उत्पादकता

दहा हेक्टर प्रात्यक्षिकामधील एका शेतक-यांचा प्लॉटची रँडम पध्दतीने निवड करावी व शेतातील सांख्यिकी विभागाच्या पध्दतीचा वापर करुन पीक कापणी प्रयोग घेणे बंधनकारक राहील. तसेच कृषि सहाय्यकांनी त्यांचेकडे घेतलेल्या प्रात्यक्षिकांचा सर्व शेतक-यांचा उत्पादनाचा अहवाल खालील प्रपत्रामध्ये जतन करावा व त्याची एक प्रत तालुका कृषि अधिका-यांना सादर करावी. तालुकास्तरावर प्रात्यक्षिकातील सर्व शेतक-यांचे या पीक कापणीत आलेल्या उत्पादनाचा पिकनिहाय अहवाल संकलित करावा व संकलित केलेला खरीप व रब्बीचा अंतिम अहवाल (Excel sheet मध्ये) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलित अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करुन विभागाचा संकलित अहवाल कृषि आयुक्तालयास ई-मेलद्वारे @. सादर करावा.

कृषि उन्नती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत "बीटी विरहीत" सघन कापूस विकास कार्यक्रम सन २०१८-१९

पीक प्रात्यक्षिकातील उत्पन्न व खर्चाबाबतचा अहवाल (गावनिहाय तालुका)

| शेतक-यांचे नाव व शेत गट क्र. | प्रात्यक्षिक प्रकार | प्रात्यक्षिक प्लॉटमधील एकुण खर्च (रु.) | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील एकुण खर्च (रु.) | प्रात्यक्षिक प्लॉटमधील उत्पादन (क्वि./हे.) | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील उत्पादन (क्वि./हे.) | बाजारभावानुसार मिळालेले उत्पन्न (रु./हे.) | | प्रात्यक्षिकातील मिळालेले निव्वळ वाढीव उत्पन्न (रु./हे.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रात्यक्षिकातील | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील | |
| | आयसीएम | | | | | | | |
| | आंतरपीक | | | | | | | |
| | एचडीपीएस | | | | | | | |

प्रत्येक पीक प्रात्यक्षिकाकरीता शेतकरी गटाच्या उपस्थितीत शास्त्रोक्त पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेऊन प्रात्यक्षिकाद्वारे साध्य करण्यात आलेल्या उत्पादकतेचा अहवाल संबंधित कृषि अधिकारी यांनी संकलित करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलित अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रपत्र २ मध्ये विभागास सादर करावा व त्याची प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी. **पीक कापणीनंतर १५ दिवसामध्ये पीक कापणीचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी**. विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागाचा संकलित अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**प्रात्यक्षिक अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण सूचना**

- प्रात्यक्षिकासाठी आवश्यक सर्व निविष्ठांविषयी शेतक-यांना अवगत करावे. निविष्ठांची खरेदी उत्पादक गटाने वेळेत करणे बंधनकारक राहील. गटामार्फत खरेदी करण्यात आलेल्या तसेच शेतकरी लाभार्थीनिहाय वाटप केलेल्या निविष्ठांच्या नोंदी कृषि सहाय्यकाने प्रात्यक्षिक नोंदवहीमध्ये घ्याव्यात.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय वितरण केलेल्या व वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात.
- प्रात्यक्षिकांतर्गत प्रती हेक्टरी आर्थिक मर्यादेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यास सदर खर्च संबंधित लाभार्थी गटाने करावा.
- प्राप्त निविष्ठांचा वापर नियोजित प्रात्यक्षिकांसाठीच केला जाईल व गैरवापर होणार नाही याबाबत खातरजमा करावी.
- लाभार्थी शेतक-यांची यादी ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर जाहिर करावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या वेबसाईटवर भरावी.
- प्रात्यक्षिक प्लॉट शेजारी पारंपारीक पध्दतीवर आधारित तुलनात्मक प्लॉट घेण्यात यावा.
- प्रात्यक्षिके शक्यतो रस्त्यालगत तसेच, संबंधित गावातील जमिनीचा प्रकार / सुपिकता यांचे प्रातिनिधिक असावीत. प्रात्यक्षिकाचा फलक रस्त्याचा कडेला प्लॉटशेजारी दर्शनी भागात लावावा व त्यावर खालील माहिती नमूद करावी.

| राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ---------- पीक प्रात्यक्षिक | | |
|---|---|---|
| 1) समाविष्ठ गावांचे नाव: | 2) सहभागी शेतकरी संख्या: | 3) पीक व वाण: |
| 4) प्रात्यक्षिकाचा प्रकार: | 5) खत मात्रा: | 6) जैविक खते मात्रा: |
| 7) सुक्ष्म मुलद्रव्ये मात्रा | 8) बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर: | 9) पेरणीची तारीख: |
| 10) शेतकरी गट प्रमुख व कृषि सहाय्यकाचे नाव व भ्रमणध्वनी संपर्क क्रमांक | | |

- अभियाना अंतर्गत प्रात्यक्षिकासाठी वितरीत करावयाच्या निविष्ठा संदर्भात मागणी, तपासणी व देयक अदायगी या अनुषंगाने संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण यांनी निर्गमित केलेल्या अद्ययावत मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
- **<u>कोणत्याही परिस्थितीत बियाणे विरहित पिक प्रात्यक्षिके न राबविणेबाबत केंद्र शासनाच्या सूचना आहेत.</u>**
- अभियाना अंतर्गत प्रात्यक्षिकासाठी वितरीत करावयाच्या निविष्ठा संदर्भात मागणी, तपासणी व देयक अदायगी या अनुषंगाने संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या अद्ययावत मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१६. पीक प्रात्यक्षिकाकरीता बियाणे:

- पीक प्रात्यक्षिकांसाठी बीटी विरहित आणि प्राधान्याने नविन अधिसुचित झालेल्या वाणांच्या प्रमाणित / सत्यप्रत बियाण्यास १०० टक्के अनुदान अनुज्ञेय राहील.
- महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठे, केंद्रिय कापुस संशोधन संस्था, नागपूर यांचेकडील वाणनिहाय प्रमाणित बियाणे उपलब्धतेबाबत तपशील त्यांचे नजीकच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावा.
- स्थानिक कृषि हवामान परिस्थितीनुरुप संलग्न कृषि तज्ञांचे सल्ल्याने वरील १ व २ नुसार वाणांची निवड करुन त्यांची शेतकऱ्यांनी खरेदी करावी.

कापूस पीक प्रात्यक्षिकासाठी शक्यतो १५ वर्षाच्या आतील प्रसारित संकरित/देशी वाणांचे प्रमाणित/सत्यप्रत बियाणे केंद्रिय कापूस संशोधन संस्था, नागपूर, महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठ तसेच कृषि विज्ञान केंद्र यांचेकडून व कमतरता भासल्यासच नोंदणीकृत शेतकरी उत्पादन कंपनी, देशी कापूस बियाणे उत्पादक शेतकरी यांचेकडील बीटी विरहित बियाणे उपलब्धता विचारात घेऊन प्रात्यक्षिकांचे नियोजन करण्यात यावे. आवश्यकता भासल्यास इतर राज्यातील शासन अंगीकृत उपक्रम तसेच कृषि विद्यापीठ यांचेकडून महाराष्ट्रात लागवडीस योग्य वाणांचे बियाणे उपलब्ध करुन घ्यावे. या व्यतिरिक्त देशी कापसाच्या अतिघन लागवडीसाठी बियाण्याची कमतरता भासल्यास ते मागील वर्षी घेण्यात आलेल्या कापूस प्रात्यक्षिक क्षेत्रातील उत्पादित बियाण्यातून वापरण्यात यावे.

- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी स्तरावरुन लक्षांकनिहाय व घटकनिहाय लागणाऱ्या बियाण्यांची मागणी पुरवठादार संस्थांना तात्काळ दयावी. बियाणे पुरवठादार संस्थांनी त्यांचे वितरकामार्फत प्रमाणित/सत्यप्रत बियाणे वाटप करावयाचे आहे. मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी (नोडल आधिकारी) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित वितरकाकडे द्याव्यात. बियाणे खरेदी निवड केलेल्या गटाने विहित मुदतीत आणि शिफारित वाणांचीच केली आहे याची कृषि सहाय्यकांनी खातरजमा करावी.
- शेतकऱ्यांना बियाणे घेण्यासाठी जास्त अंतर जावे लागणार नाही यादृष्टीने जास्तीत जास्त वितरकांकडे बियाणे उपलब्ध होईल याची दक्षता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व बियाणे पुरवठादार संस्थांनी घ्यावी.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुकानिहाय व प्रवर्गनिहाय निश्चित केलेल्या लक्षांकानुसार पुरवठादार संस्थांनी त्या तालुक्यातील आपल्या अधिकृत वितरकांकडे बियाणे उपलब्ध करुन द्यावे व वाणनिहाय किती बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहे याची वितरकनिहाय माहिती संबंधीत तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना विनाविलंब उपलब्ध करुन द्यावी.
- निवड झालेल्या गटातील / उत्पादक कंपनीमधील बियाणे घेण्यास येणाऱ्या शेतकऱ्याचे नाव, प्रवर्ग, गाव, गट क्रमांक, क्षेत्र याबाबतची माहिती घेऊन व त्याची खात्री करुन संबधित शासकीय वितरकांनी शेतकऱ्याला बियाणे वितरीत करावे. **कृषि विभागामार्फत कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्याकडुन अनुदान वजा जाता रक्कम**

**वसुल केली जाणार नाही याची पुरवठादार संस्थांनी नोंद घ्यावी. लाभार्थी हिश्श्याची रक्कम शेतकऱ्याकडून वसुल करण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थांच्या वितरकांची राहील.**

- पुरवठादार संस्थांकडून वितरकांकडे बियाणे प्राप्त झाल्यानंतर गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी लॉट निहाय नमुने घेऊन शासकीय बीज परीक्षण प्रयोगशाळेकडून तपासून घ्यावेत. गुणवत्ता नियंत्रणाबाबत व अप्रमाणित नमुन्याच्या देयक अदायगी प्रकरणी संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांचे पालन करावे. देशी वाणाच्या प्रात्यक्षिकातील उत्पादित बियाणे शेतक-यांनी स्वत:ची खात्री पटल्यानंतर वापरावे. याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही.
- आयुक्तालयाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अनुदानामधून प्रथम प्राधान्याने बियाणे घटकाची अदायगी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून करावी.
- सदर घटकाचे प्रभावी सनियंत्रणाची जबाबदारी उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहील.

**१७.कीडनाशके व बायो एजंटस**

कृषि विद्यापीठाच्या - शास्त्रज्ञांचे सल्ल्याने निविष्ठा निश्चिती करताना सदर तालुक्यातील पिकनिहाय कीड/रोग प्रादुर्भावाच्या वातावरणात संलग्न पूर्वइतिहासाचा विचार करुन शक्यतो कीड/रोग प्रतिकाकरक/प्रतिबंधक वाणांची निवड करावी.

- आवश्यक जैविक/रासायनीक औषधांची लाभार्थी शेतकरी गटाने प्राधान्याने शासकीय प्रयोगशाळा, कृषि विद्यापीठे यामधून करावी. त्या व्यतिरिक्त त्यांनी खुल्या बाजारातून शिफारसीप्रमाणे त्यांच्या पसंतीच्या औषधांची खरेदी करावी.
- प्रात्यक्षिक क्षेत्रातील पिकावर येणाऱ्या संभाव्य किडी व रोगांबाबत सखोल माहिती लाभार्थ्यांस देण्यात यावी. पिकाच्या विविध अवस्थेमध्ये येणाऱ्या किडींचे सर्वेक्षण करण्याबाबत लाभार्थ्यांस प्रशिक्षित करावे तसेच क्रॉपसॅप अंतर्गत मार्गदर्शक सुचनांनुसार संबंधित कृषि सहाय्यकांनी किडीच्या नर पतंगांची संख्या लक्षात येण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळ्यांचा (Pheromone Trap) वापर करावा. किडरोग सर्वेक्षणाच्या आधारे दिलेल्या सल्ल्यानुसारच किडनाशकांचा वापर करण्याबाबत लाभार्थ्यांस प्रवृत्त करावे. यासाठी कृषी विद्यापीठाने पीकनिहाय व किडरोगनिहाय केलेल्या शिफारशींचा अवलंब करावा तसेच लेबल क्लेम प्रमाणेच किडनाशकाची निवड करावी.

१८) **तणनाशकांचा वापर:**

कापूस आणि मुग, उडीद या सारख्या आंतरपिकांच्या उत्पादन वाढीसाठी राबवावयाच्या तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांमध्ये तण व्यवस्थापनासाठी तणनाशकांचा वापर करण्याबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे. विभागीय कृषि सहसंचालक यांनी निश्चित केलेल्या बाबनिहाय खर्च प्रमाणकानुसार उगवणीपूर्व / उगवणीनंतर वापरावयाच्या तणनाशकांचा काळजीपूर्वक अभ्यास करून तणनाशके फवारणीचे तंत्र लाभार्थ्यांना समजावून सांगावे. तणनाशकांचा वापर ज्या तणांसाठी करण्यात आला त्याबाबतच्या नोंदी प्रात्यक्षिक नोंदवहीत घ्याव्यात.

१९) **<u>अनुदान कार्यपध्दती</u>** :प्रात्यक्षिकात सहभागी गटातील शेतक-यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्यात येईल. शासन यंत्रणेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या सर्व स्वउत्पादित निविष्ठांचे प्रत्येक बॅचसचे नमुने काढून प्रयोगशाळेत तपासणी करून घ्यावेत. **अप्रमाणित निविष्ठांची देयके अदा करू नयेत.**

**योजनेतील विविध घटकांबाबत सविस्तर सूचना खालीलप्रमाणे आहेत.**

१) एकात्मिक पीक व्यवस्थापन (आयसीएम)

राज्यातील पावसाची अनियमितता, पावसातील खंड, बहुतांश हलक्या व उथळ जमिनीतील कापूस लागवड, कीड व रोगाचा प्रादुर्भाव इ. अनेक समस्या कापूस लागवडीशी संबंधित असून शेतक-यास पिकाचा अधिकाधिक

मोबदला शाश्वत पध्दतीने मिळण्यासाठी **एकात्मिक पीक व्यवस्थापन (Integrated Crop Management-आयसीएम)** आवश्यक आहे. सन २०१८-१९ पासून सदर घटक नव्याने समाविष्ट असून यासाठी प्रती हेक्टरी रु. ८०००/- इतके अर्थसहाय्य देय आहे. यामध्ये रु. ७०००/हेक्टर ची खर्च प्रमाणके निविष्ठांच्या वापरासाठी निश्चित करावीत आणि रु. १०००/- /हे. आकस्मिक खर्चासाठी वापरावेत.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी केंद्रिय कापूस संशोधन संस्था आणि कृषि विद्यापिठाच्या सहाय्याने या घटकाच्या अनुषंगाने आणि उत्पादन वाढीचे प्रमुख ४ ते ५ बाबी निश्चित कराव्यात आणि त्यावर बाबनिहाय रु. ७०००/- प्रती हेक्टर अनुदानांतर्गत देय अनुदानाची रक्कम निश्चित करावी व त्याची प्रत कृषि आयुक्तालयास माहितीसाठी सादर करावी. कोणत्याही परिस्थितीत लोकवाटा गोळा करण्यात येऊ नये. अनुदान रक्कमेव्यतिरिक्त अधिकचा एकात्मिक पीक व्यवस्थापनांतर्गत खालील बाबी आणि स्थानिक परिस्थितीनुसार कामाचे वेळापत्रक देखील निश्चित करुन घ्यावे.

- स्थानिक परिस्थितीशी सुसंगत बियाण्याची निवड आणि गुणवत्ता
- प्रती हेक्टर नियोजित झाडे संख्या राखण्यासाठी लागवडीच्या वेळेसच २ ते ५ टक्के रोपे पिशव्या / ट्रोण इ. मध्ये बनवून ओळीतील खांड्या भरणे
- जोखिम व्यवस्थापन (रिस्क मिटीगेशन)
- संसाधनांचे व्यवस्थापन (रिसोर्स मॅनेजमेंट)
- कीड-रोग व्यवस्थापन
- पर्यावरणाचा समतोल (जमिनीतील उपयुक्त जिवाणू आणि गांडूळांसारख्या उपयुक्त जिवजंतूंना हानी न पोहोचविता पीक उत्पादन)

**२) आद्यरेषिय प्रात्यक्षिके (देशी व अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन)**

सदर कार्यक्रम कृषि विद्यापीठाच्या मार्फत राबविण्याचे प्रस्तावित असून डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने प्रस्ताव दिल्यानंतर यासाठीचे रु.९०००/- प्रति हेक्टर प्रात्यक्षिक याप्रमाणे ४० हेक्टर क्षेत्राकरीता रु. ३.६० लाखाच्या मर्यादेत अनुदान जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला यांचेमार्फत कृषि विद्यापीठाकडे वर्ग करण्यात यावेत. या कार्यक्रमांतर्गत उत्पादित बियाणे पुढील वर्षीच्या कार्यक्रमांतर्गत वापरण्यात येईल. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अकोला यांनी कृषि विद्यापीठाशी संपर्क साधून कार्यक्रम यशस्वी रितीने राबविला जाईल याकडे पाठपुरावा करावा. ही प्रात्यक्षिके एक हेक्टरची असून त्यासाठी प्रति हेक्टरी खर्च प्रमाणक रु. ९०००/- हेक्टर च्या मर्यादेत निश्चित करुन घ्यावीत. याबाबत बीज प्रमाणीकरण यंत्रणा, महाबीज, अकोला इत्यादी यंत्रणांशी योग्य तो समन्वय साधून बिजोत्पादन कार्यक्रमाची आखणी करुन सदरचा कार्यक्रम कृषि आयुक्तालयास कळविण्यात यावा व त्यानुसार अंमलबजावणी तात्काळ करावी.

कृषि विद्यापीठाच्या किती क्षेत्रावर प्रमाणित बियाणे उत्पादनाचा कार्यक्रम राबविला आहे याची माहिती **पेरणी होताच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कळवावी व बीज गुणाकांनुसार उपलब्ध होणा-या प्रमाणित बियाणांच्या अंदाजानुसार अनुदानाची मागणी आयुक्तालयाकडे नोंदवावी, त्याप्रमाणे त्यांना अनुदान वर्ग करण्यात येईल. वेळेत मागणी न नोंदविल्यास अनुदानाचा विचार केला जाणार नाही. काही अपरिहार्य कारणास्तव प्रमाणित बियाणे ऐवजी सत्यप्रत बियाणे कार्यक्रम राबविल्यास त्यासाठी सुध्दा अनुदान अनुज्ञेय राहील.**

**३) आद्यरेषिय प्रात्यक्षिके -आंतरपिके (कापूस पिकात मुग/उडिद)**

कापूस पिकाच्या सुरवातीचा वाढीच्या अवस्थेत संपूर्ण क्षेत्र व्यापले जात नाही. त्यामुळे कापूस पिकात मुग, उडीद यासारखा कडधान्य पिकांची लागवड केल्यास अधिकचे उत्पन्न मिळू शकते. तसेच या पिकांमुळे जमिनीचा पोतदेखील सुधारतो. त्यामुळे **"बीटी विरहित" लागवड केलेल्या देशी-संकरित कापूस लागवड क्षेत्रात** मुग, उडीद यासारखा कडधान्य पिकांच्या लागवडीची आद्यरेषिय प्रात्यक्षिके आयोजित करावीत. यासाठी रु. ८०००/- प्रति हेक्टर याप्रमाणे अर्थसहाय्य देय आहे. या मध्ये रु. १०००/- प्रती हेक्टर इतकी तरतुद आकस्मिक खर्चासाठी आहे.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी मागील वर्षी (सन २०१७-१८) या घटकांतर्गत कृषि विद्यापीठ इ. च्या सहाय्याने बाबनिहाय द्यावयाचे अनुदान-खर्च प्रमाणके निश्चित करण्यात आली होती. सदर बाबनिहाय रु. ७०००/-

प्रती हेक्टर अनुदानांतर्गत देय अनुदानाच्या बाबी पुनश्च अद्यावत करुन कृषि आयुक्तालयास माहितीसाठी सादर कराव्यात. कोणत्याही परिस्थितीत लोकवाटा गोळा करण्यात येऊ नये. तसेच स्थानिक परिस्थितीनुसार कामाचे वेळापत्रक देखील निश्चित करुन घ्यावे.

प्रति हेक्टरी देय अर्थसहाय्य रु. ८,०००/- इतके असून त्या मध्ये रु. १०००/- इतकी रक्कम आकस्मिक खर्चासाठी उपलब्ध आहे. त्यातून शेती दिन, शास्त्रज्ञ भेटी, प्रसिध्दी, छपाई इ. खर्च भागविण्यात यावा. ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात याबाबतचे सविस्तर नियोजन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विद्यापीठाशी समन्वय साधून करावे व त्याचा कार्यक्रम निश्चीत करुन क्षेत्रिय अधिका-यांना आयोजनाबाबत सूचना द्याव्यात. उप विभाग व जिल्हास्तरावरुन या शेतीदिन, शास्त्रज्ञ भेटी इ. कार्यक्रमांचे सनियंत्रण करावे.

**४) कपाशीच्या देशी वाणांच्या अतीघन लागवडीच्या चाचण्या (एचडीपीएस)**

राज्यातील पावसाची अनियमितता, पावसातील खंड, बहुतांश हलक्या व उथळ जमिनीतील कापूस लागवड या पार्श्वभूमिवर ब्राझिल तंत्रज्ञानावर आधारित देशी कापसाच्या अतीघन लागवडीची पध्दत अधिक उपयुक्त ठरत आहे. देशी कापसाच्या अतिघन लागवड पध्दतीच्या प्रात्यक्षिकांचा बिजोत्पादनाच्या दृष्टीने उपयोग होऊ शकत असल्याने हे प्लॉट शक्यतो बीटी लागवडीपासून आयसोलेशन रेशोच्या अनुषंगाने लांब असावित. त्यानुसार सदर प्रात्यक्षिकासोबतच गावातील शेतकरी पारंपारिक पध्दतीने करत असलेल्या कापसाच्या लागवड पध्दतीचे (कंट्रोल प्लॉट) संपूर्ण हंगामभर निरिक्षण करुन विशेषत: लागवड खर्च, मिळालेले उत्पादन आणि उत्पन्न याच्या नोंदी ठेवाव्यात. सदर प्रात्यक्षिकांतर्गत प्राप्त उत्पादन प्रती हेक्टर च्या स्वरुपात किमान, सरासरी आणि कमाल उत्पादन या स्वरुपात नोंदवून कळविण्यात यावे.

सन २०१८-१९ मध्ये प्रति हेक्टरी देय अर्थसहाय्य रु. १०,०००/-प्रती हेक्टर इतके असून त्या मध्ये रु. १०००/- इतकी रक्कम आकस्मिक खर्चासाठी उपलब्ध आहे. विभागीय कृषि सहसंचालक यांनी मागील वर्षी (सन २०१७-१८) या घटकांतर्गत कृषि विद्यापीठ इ. च्या सहाय्याने बाबनिहाय द्यावयाचे अनुदान-खर्च प्रमाणके निश्चित करण्यात आली होती. सदर बाबनिहाय रु. ९०००/- प्रती हेक्टर अनुदानांतर्गत देय अनुदानाच्या बाबी पुनश्च अद्यावत करुन कृषि आयुक्तालयास माहितीसाठी सादर कराव्यात. उर्वरित रु. १०००/- प्रती हेक्टर आकस्मिक खर्चातून शेती दिन, शास्त्रज्ञ भेटी, प्रसिध्दी, छपाई इ. बाबी वरील खर्च भागविण्यात यावा. ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात याबाबतचे सविस्तर नियोजन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विद्यापीठाशी समन्वय साधून करावे व त्याचा कार्यक्रम निश्चीत करुन क्षेत्रिय अधिका-यांना आयोजनाबाबत सूचना द्याव्यात. उप विभाग व जिल्हास्तरावरुन या शेतीदिन, शास्त्रज्ञ भेटी इ. कार्यक्रमांचे सनियंत्रण करावे. कोणत्याही परिस्थितीत लोकवाटा गोळा करण्यात येऊ नये. तसेच स्थानिक परिस्थितीनुसार कामाचे वेळापत्रक देखील निश्चित करुन घ्यावे.

**देशी वाणांच्या बियाण्याचे संकलन**

देशी वाणांच्या बियाण्यांची वाढती मागणी लक्षात घेता देशी वाणांच्या अतिघन लागवड पध्दतीची प्रात्यक्षिके सलग क्षेत्रावर आणि इतर वाणांच्या कापूस लागवडीपासून आवश्यक आयसोलेशन अंतर राखून घेण्यात येतील असे पहावे. जेणेकरुन आवश्यक शुध्दता राखणे शक्य होईल. तसेच या शेतकरी गटाने शेतक-यांकडे उत्पादित देशी कापसाचे जिनिंग स्वतंत्रपणे होईल याची दक्षता घ्यावी. असे बियाणे त्या भागातील शेतकरी स्वत:ची खात्री करुन पुढील हंगामात स्वत:च्या जबाबदारीवर वापरु शकतील. भविष्यात बियाणे प्रमाणीकरण यंत्रणेच्या सहाय्याने बियाणे उत्पादन कार्यक्रम अशा भागात राबविणे शक्य होईल.

संचालक, कापूस विकास निदेशालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.डी-३ (१)(एनएफएसएम/सीसी) कॉटन/१०९, दिनांक-३/६/२०१४ अन्वये सदर अभियानांतर्गत देशी कापसाच्या अतिघन लागवडीच्या आयरेषिय प्रात्यक्षिकांमधील उत्पादीत कापसाची खरेदी कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया मार्फत करण्याचे नियोजित असून जिनींग बियाणे संबधित यंत्रणेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर बियाणांचा आवश्यक त्या कार्यवाहीनंतर बियाणे म्हणून वापर करता येईल. यासाठी विहीत केलेली प्रपत्रे सोबत सहपत्रित केलेली आहेत. त्यामध्ये परिपूर्ण प्रागतिक

माहिती भरुन कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडीया आणि कृषि आयुक्तालयास वेळोवेळी तसेच काढणीपुर्वी किमान २ महिने सादर करावी. याबाबत **कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडीयाच्या** विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून पुढील रुपरेषा निश्चित करण्यात यावी. तसेच विभागीय कृषि सह संचालक यांनी महाबीज, अकोला, बीज प्रमाणीकरण यंत्रणा इत्यादि यंत्रणांसोबत बैठक आयोजित करुन देशी वाणाचे बियाणे प्राप्त करण्यासाठीची रुपरेषा हंगामात निश्चित करावी.

## ५) पीक संरक्षण औषधी व बायो-एजंटच चे वितरण

पीक संरक्षण औषधी व बायो-एजंटचे वितरण हा घटक सन २०१८-१९ पासून सदर घटक नव्याने समाविष्ट असून यासाठी प्रती हेक्टरी एकूण खर्चाच्या ५० टक्के कमाल रु. ५००/हेक्टर इतके अर्थसहाय्य देय आहे. हा कार्यक्रम मागील वर्षात ज्या गावांमध्ये कीड व रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळला अशा गावांमध्ये प्राधान्याने राबविण्यात यावा.

हा कार्यक्रम प्रात्यक्षिक स्वरुपाचा नाही तथापि तो १० हेक्टरचा एक गट यानुसार शक्यतो सलग क्षेत्रावर राबवावा. जेणेकरुन त्याचा व्यापक परिणाम दिसून येण्यास मदत होईल.

या घटकांतर्गत देय पीक संरक्षण औषधी व बायो-एजंटस कृषि विद्यापिठाच्या सहाय्याने विभागीय कृषि सहसंचालक यांनी निश्चित करावेत. या मध्ये बीज प्रक्रिया (कार्बन्डेंडेझिम), पीक संरक्षण औषधे फवारणी, तसेच कामगंध सापळे इ. साठी अर्थसहाय्य देय राहील.

देय अर्थसहाय्याव्यतिरिक्त येणारा खर्च लाभार्थी शेतक-याने स्वतः करावयाचा असून कोणत्याही परिस्थितीत तो लोकवाटा म्हणून घेण्यात येऊ नये.

## ६) मनुष्य बळ विकास कार्यक्रम (राज्यस्तरीय अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण)

सन २०१८-१९ पासून सदर घटक नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे.

सन २०१७-१८ मध्ये राज्यात कापुस पिकावर शेंदरी बोंडअळी या किडीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव आढळल्याने अधिकारी-कर्मचारी वर्गास शास्त्रीय दृष्टीकोनातून एकात्मिक पीक व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक कीड-रोग व्यवस्थापन इ. बाबत अद्ययावत प्रशिक्षण आवश्यक आहे. या करिता अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यासाठी विभागस्तरावर २ दिवसांचे २० प्रशिक्षणार्थीकरिता प्रशिक्षण घेण्यात यावे. सदर प्रशिक्षणे केंद्रिय कापुस संशोधन संस्था, नागपूर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या सहकार्याने /त्यांचेमार्फत आयोजित करण्यात यावीत. प्रशिक्षणाची सविस्तर रुपरेषा सदर संस्थांशी समन्वय साधून निश्चित करावी. विभागीय कृषि सह संचालक अमरावती व नागपूर विभाग यांनी आपल्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची प्रशिक्षणासाठी निवड करावी. प्रशिक्षण शास्त्रज्ञांमार्फत देण्यात यावे. प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे बाबनिहाय खर्चाचा तपशिल देण्यात येत असून त्याप्रमाणे खर्च करण्यात यावा.

| अ.क्र | घटक | रक्कम (रु.) |
| --- | --- | --- |
| १ | व्याख्यात्यांना मानधन (रु.५००/- प्रति व्याख्यान प्रमाणे) १० व्याख्यानासाठी | ५००० |
| २ | प्रशिक्षण साहीत्य, स्टेशनरी, ,छपाई, प्रसिध्दि इत्यादीरुपचे ४०० प्रति प्रशिक्षणार्थी | ८००० |
| ३ | भोजन, नाश्टा, (२ दिवसांसाठी) (रु.५०/- प्रति दिन X प्रशिक्षणार्थी धरुन ४० लोकांसाठी X २ दिवस) | २५०० |
| ४ | भोजन व्यवस्था व राहण्याची व्यवस्था रु.५००/- प्रति प्रशिक्षणार्थी | २०००० |
| ५ | इंधन व प्रशिक्षणासाठीच्या प्रक्षेत्रावरील भेटी वाहन भाडे व त्या अनुषंगाने येणारा किरकोळ खर्च | ४५०० |
| | **एकुण** | ४०००० |

प्रशिक्षणाच्या आयोजनाबाबत सविस्तर प्रस्ताव हंगामपूर्व/हंगाम सुरु झाल्याबरोबर संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावा. त्यानुसार प्रशिक्षणाची तारीख निश्चित करुन अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत संबंधित अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षणास उपस्थित राहतील असे पहावे. अनुपस्थित अधिकारी-

कर्मचारी यांचेवर योग्य ती प्रशासकिय कार्यवाही करावी. सदरचा तपशील प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी तरतूद उपलब्ध करुन दयावी. आयोजित प्रशिक्षणावर झालेल्या खर्चाचा सविस्तर तपशील आणि उपयोगिता प्रमाणपत्र आयोजकांकडून प्राप्त करुन घ्यावे.

**७) स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाचे कार्यक्रम**

**अ) ऑनलाइन पेस्ट मॉनिटरिंग अॅण्ड अॅडव्हायजरी सर्व्हिसेस (ओपीएमएस)**

सन २०१८-१९ पासुन हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. ऑनलाईन पेस्ट मॉनिटरिंग अॅण्ड अॅडव्हाजरी सर्व्हिसेस (ओपीएमएस) हा घटक राज्यातील पीकावरील कीड व रोग सर्वेक्षण सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) या कार्यक्रमाशी संलग्न करुन राबविण्यात येणार आहे. या बाबत सविस्तर सूचना कृषि उपसंचालक (पीक संरक्षण-विप्र ७) हे निर्गमित करतील. या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाने सन २०१८-१९ करिता रक्कम ७७.५५ लाख निधी मंजूर केला आहे.

**ब) कॉटन श्रेडरचा वापर**

राज्यात कापूस पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असून कपाशीच्या उत्पादनासोबतच कापसाच्या पिकाचे अवशेषदेखील मोठ्या प्रमाणावर असतात. हे अवशेष विशेषतः प-हाटी सरपणासाठी-जळाऊ इंधन म्हणून वापरले जातात. मात्र डिसेंबरनंतरही हे अवशेष शेतातच राहत असल्याने कीड व रोगाच्या जीवनक्रमासाठी पुरक ठरतात. त्यामुळे हे अवशेष कॉटन श्रेडर यंत्राद्वारे बारीक करुन शेतात मिसळल्यास विघटनानंतर सेंद्रिय घटक म्हणून उपयुक्त ठरतो. शिवाय कीड व रोगांचा जीवनक्रम खंडीत करण्यास ते उपयुक्त ठरते.

कृषि यांत्रिकीकरणांतर्गत निश्चित केलेल्या पध्दतीनुसार आणि त्यात नमुद केलेल्या यंत्रसामुग्रीपैकी कॉटन श्रेडर या यंत्राकरिता अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, अल्प व सिमांतिक शेतकरी, महिला यांच्या साठी श्रेडर यंत्राच्या किंमतीच्या ५० टक्के कमाल रु. ६३०००/- प्रती युनिटच्या मर्यादेत तर इतर लाभार्थ्यांसाठी श्रेडर यंत्राच्या किंमतीच्या ४० टक्के कमाल रु. ५००००/- प्रती युनिटच्या मर्यादेत अर्थसहाय्य देय राहील.

या घटकाचा लाभ देण्यासाठी "उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहीम" सन २०१८-१९ राबविणेबाबत मार्गदर्शक सूचनाचा शासन निर्णय क्र. ०४१८/प्र. क्र. १५५/१४-ए, दि. २७.०४.२०१८ मधील परिच्छेद क्र. ४.५ कृषि यांत्रिकीकरण या बाबींसाठी दिलेल्या सूचनांचा अवलंब करावा.

- **अभियान अंमलबजावणीसाठी तपासणी :-**

शासनाने निर्देशित केलेप्रमाणे लाभार्थ्यांच्या यादीनुसार सर्व लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतावर हाती घेण्यात आलेल्या कार्यक्रमाची प्रत्यक्ष तपासणी संबंधित गावातील कृषी सहाय्यकांनी करायची असून आपला अहवाल तालुका कृषी अधिकाऱ्यामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे. याबाबत कृषि आयुक्तालयाचे संदर्भ १० च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार तपासणी करण्यात यावी.

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रमामध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची प्रवर्गनिहाय माहिती कृषि विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यासाठी कृषि आयुक्तालयास तातडीने सादर करावी.
- अभियानाच्या मासिक प्रगतीचा अहवाल आयुक्तालयाने विहित केलेल्या प्रपत्रात प्रवर्गनिहाय दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रमामध्ये गावनिहाय वाटप केलेल्या निविष्ठा, प्रात्यक्षिके व इतर दिलेले लाभ याबाबतची माहिती लाभार्थ्यांच्या यादीसह ग्रामपंचायतीच्या फलकावर लावावी.
- अभियानांतर्गत राबविलेल्या सर्व घटकांमुळे प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या उत्पादकतेवर दिसून आलेल्या परिणामांचे मूल्यमापन करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल **उपविभागीय कृषी अधिकारी** यांनी हंगामाच्या अखेरीस आयुक्तालयास सादर करावा.

- विभागीय कृषि सह संचालक यांनी सोबत दिलेल्या प्रपत्रात त्यांचे स्तरावर प्राप्त झालेले संकलित मासिक प्रगती अहवाल ई मेल व्दारे ddacashcrop@gmail.com वर व लेखी स्वरुपात कृषि आयुक्तालयास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पाठवावेत.
- योजनेच्या प्रगतीचा तिमाही अहवाल केंद्र शासनास सादर करावे लागतात. त्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, योजनेचा जून, सप्टेंबर, डिसेंबर व मार्च या तिमाहीचे प्रगती अहवाल, तिमाहीनंतर पुढील महिन्याच्या ५ तारखे पर्यंत विभागीय कृषि सह संचालक कार्यालयामार्फत कृषि आयुक्तालयास सादर करावेत.
- विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना संगणकीय प्रणालीव्दारे – पीएफएमएस द्वारे अनुदानाचे वितरण करण्यात येईल. उपलब्ध करुन दिलेले अनुदान महिनानिहाय पूर्णपणे खर्च होईल याची दक्षता घ्यावी. यासाठी गटांकडुन वेळापत्रकानुसार सर्व बाबींची अंमलबजावणी होऊन अनुदान मागणी वेळेत प्राप्त होईल असे पहावे.

योजनेच्या खर्चाचे अंतीम उपयोगीता प्रमाणपत्र १२ सीएसआर प्रपत्रामध्ये एप्रीलच्या दुस-या आठवड्यात कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येतो किंवा कसे हे पाहण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीय स्तरावरील सनियंत्रण समिती राज्यात येते. त्यावेळी या समितीस यशोगाथा दाखविता याव्यात याकरिता खरीप हंगामात हे घटक राबविण्याची पुर्वतयारी सुरवातीपासुनच केल्यास या सनियंत्रण समितीस या कार्यक्रमामधुन साध्य झालेली कामे दाखविता येऊ शकतील.

**आहरण व संवितरण अधिकारी** - सन २०१८-१९ साठी या कार्यक्रमाकरिता शासन निर्णयात नमुद करण्यात आलेले अधिकारी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पहातील. योजनेंतर्गत सर्व प्रकारचे आर्थिक सहाय्य पीएफएमएस (PFMS) द्वारे अदा करण्यात येतील.

**अभियानाचे सनियंत्रण व मुल्यमापन**

उपरोक्त संदर्भ क्र. ४ नुसार कृषि पर्यवेक्षकाने संबंधित कृषि सहाय्यकांच्या पिक प्रात्यक्षिकांना १५ दिवसाला नियमितपणे भेट द्यावी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच कृषि सहाय्यकांना पुढील भेटीपर्यंत प्रात्यक्षिका अंतर्गत करावयाच्या कामाबाबत सूचना द्याव्यात आणि पुढील भेटीवेळी झालेल्या कामाचे मूल्यमापन करून आपला अहवाल **प्रपत्र १ अ** मध्ये मंडळ कृषि अधिकाऱ्यामार्फत तालुका कृषि अधिकारी कार्यालयास नियमितपणे सादर करावा. पिक प्रात्यक्षिकांना भेट दिल्यानंतर कृषि पर्यवेक्षकांनी संबंधित गावात मोका तपासणी देखील करावी. त्याचप्रमाणे संबधित मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी १५ दिवसातून एकदा किमान एका पिक प्रात्यक्षिकास भेट देऊन आपला अहवाल **प्रपत्र १ ब** नुसार तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. सर्व पिक प्रात्यक्षिकांचा अहवाल संकलित करून तालुका कृषि अधिकाऱ्यांनी दर महिन्याला जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांना सादर करावा. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्याचा एकत्रित अहवाल **प्रपत्र १ क** मध्ये विभागीय कृषि सहसंचालक व संचालक (विस्तार व प्रशिक्षण) पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करावा.

vii) प्रत्येक पिक प्रात्यक्षिक क्लस्टरमधून रँडम पद्धतीने एक प्लॉट निवडून तेथे शेतकरी गटाच्या उपस्थितीत शास्त्रोक्त पद्धतीने पिक कापणी प्रयोग राबविणे बंधनकारक राहील. तालुक्यातील एकूण पिक कापणी प्रयोगाचे संकलन करून तो अहवाल जिल्हास्तरावर सादर करण्यात यावा. जिल्हास्तरावरून जिल्ह्यातील सर्व प्रात्यक्षिकांचे संकलन करून पीकनिहाय

प्रात्यक्षिकांद्वारे साध्य करण्यात आलेल्या उत्पादकतेचा अहवाल कृषी आयुक्तालयास सादर करावा. उपविभागीय कृषी अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुक्यामध्ये व तालुका कृषी अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील प्रत्येक मंडळामध्ये किमान एक पिक कापणी प्रयोगास हजर राहून सनियंत्रण करणे बंधनकारक राहील.

**सर्व प्रात्यक्षिकांसाठी संबंधीत कृषि सहाय्यक यांनी प्रात्यक्षिकांचे सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक असून वरिष्ठ अधिका-यांनी वेळोवेळी प्रात्यक्षिकांना भेटी देवून मार्गदर्शन करावे. प्रात्यक्षिके राबविण्याची संपूर्ण जबाबदारी कृषि सहाय्यकांची राहील व गांवनिहाय संकलित केलेल्या पिक कापणी निरिक्षण अहवालाची एकत्रित नोंद मंडळस्तरावर एका स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे मंडळ कृषि अधिका-यांना बंधनकारक राहील. कृषि सहाय्यकांनी वर्षनिहाय नोंदवही प्रपत्र ४ नुसार ठेवावी. याबाबत तालुका कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची प्रशासकीय जबाबदारी राहील. प्रत्येक प्रात्यक्षिका शेजारी गुणात्मक तुलनेसाठी शेतक-यांने स्थानीक पध्दतीने घेतलेल्या तेवढ्याच क्षेत्राचा 'कन्ट्रोल प्लॉट' निवडावा. दोन्ही क्षेत्राच्या पिकाच्या पेरणीपासून कालक्रमानुसार वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी बरोबरच त्यासाठी आलेल्या खर्चाची तारीखवार नोंद व दोन्ही क्षेत्रातून आलेल्या उत्पादनाची संख्यिकी पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेऊन विश्लेषणात्मक नोंदी खालील प्रपत्रात ठेवाव्यात.**

दहा हेक्टर प्रात्यक्षिकामधील एका शेतक-यांच्या प्लॉटची रँडम पद्धतीने निवड करावी व शेतातील सांख्यिकी विभागाच्या पद्धतीचा वापर करून पिक कापणी प्रयोग घेणे बंधनकारक राहील. तसेच कृषि सहाय्यकांनी त्यांचेकडे घेतलेल्या प्रात्यक्षिकांचा सर्व शेतकऱ्यांचा उत्पादनाचा अहवाल खालील प्रपत्रामध्ये जतन करावा व त्याची एक प्रत तालुका कृषि अधिकाऱ्यांना सादर करावी. तालुकास्तरावर प्रात्यक्षिकातील सर्व शेतकऱ्यांचे या पिक कापणीत आलेल्या उत्पादनाचा पीकनिहाय अहवाल संकलित करावा व संकलित केलेला खरीप व रबीचा अंतिम अहवाल (Excel sheet मध्ये) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलित अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करून विभागाचा संकलित अहवाल कृषि आयुक्तालयास ई-मेल द्वारे ddanfsm@gmail.com सादर करावा.

<u>**पिक प्रात्यक्षिकाचा अहवाल**</u>

योजना : -----प्रात्यक्षिकाचा हेतू:---- कृषि सहाय्यकाचे नाव:-----प्रात्यक्षिकाचे गाव/तालुका:-----सहभागी शेतकरी संख्या:

| शेतकऱ्याचे नाव | प्रात्यक्षिक प्लॉटमधील एकुण खर्च | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील एकुण खर्च | प्रात्यक्षिक प्लॉटमधील उत्पादन (क्विंटल/हे) | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील उत्पादन (क्विंटल/हे) | बाजारभावानुसार मिळालेले उत्पन्न (₹/हे) | | प्रात्यक्षिक प्लॉटमधील मिळालेले निव्वळ वाढीव उत्पन्न (₹/हे) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रात्यक्षिक प्लॉटमधील | पारंपारीक पध्दतीने | |
| | | | | | | | |

प्रत्येक पीक प्रात्यक्षिकाकरीता शेतकरी गटाच्या उपस्थितीत शास्त्रोक्त पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेवून प्रात्यक्षिकांद्वारे साध्य करण्यात आलेल्या उत्पादकतेचा अहवाल संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांनी संकलीत करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलीत अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी **प्रपत्र २ मध्ये** विभागास सादर करावा व त्याची प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी. <u>**पिक कापणीनंतर १५ दिवसामध्ये पिक कापणीचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.**</u> विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागाचा संकलीत अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

**प्रात्यक्षिक अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण सूचना –**

- प्रात्यक्षिक क्लस्टरसाठी निवड केलेल्या क्षेत्राचे मंडळ कृषि अधिकारी यांनी पायाभूत सर्वेक्षण काम पूर्ण करून क्लस्टरमधील उत्पादकतेच्या लक्षांकांसह प्रकल्प आराखडा तयार करावा व त्याची योग्यायोग्यता विचारात घेवून त्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यास यथाशिघ्र मान्यता प्रदान करावी. निश्चित केलेले प्रात्यक्षिकांचे तालुकानिहाय उत्पादकता लक्षांक रा.अ.सु.अ. कक्षास कळविण्यात यावेत.
- पायाभूत सर्वेक्षणाबाबतची माहिती http://www.nfsm.gov.in/mis/bline या लिंकवर तात्काळ भरून अद्ययावत करण्याची जबाबदारी मंडळ कृषी अधिकारी यांची राहील.

- ज्या शेतकरी गटाकडे प्रात्यक्षिके घेण्यात आलेली आहेत त्या शेतकरी गटाची निवड याच अभियानांतर्गत पुन्हा इतर पिकासाठी शक्यतो पुनश्चः करू नये, जेणेकरून जास्तीत जास्त शेतक-यांना लाभ देणे सुलभ होईल.
- अनुसूचित जाती/जमातीच्या, महिला, अपंग लाभार्थ्यांना विहित प्रमाणानुसार लाभ देणे बंधनकारक राहील.
- प्रात्यक्षिक क्षेत्रातील पिकांची पूर्वमशागत, बीजप्रक्रिया, पेरणी/लावणी, आंतरमशागत, सिंचन व्यवस्था, विशेष तंत्रांचा वापर, पीक संरक्षण, काढणी व मळणी या सर्व कामांचे नियोजन लाभार्थी गटास तयार करून द्यावे.
- प्रात्यक्षिकासाठी आवश्यक सर्व निविष्ठांविषयी शेतकऱ्यांना अवगत करावे, निविष्ठांची खरेदी उत्पादक गटाने वेळेत करणे बंधनकारक राहील. गटामार्फत खरेदी करण्यात आलेल्या तसेच शेतकरी लाभार्थीनिहाय वाटप केलेल्या निविष्ठांच्या नोंदी कृषी सहाय्यकाने प्रात्यक्षिक नोंदवहीमध्ये घ्याव्यात.
- प्रात्यक्षिकांतर्गत प्रती हेक्टरी आर्थिक मर्यादेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यास सदर खर्च संबधित लाभार्थी गटाने करावा.
- प्राप्त निविष्ठांचा वापर नियोजित प्रात्याक्षिकासाठीच केला जाईल व गैरवापर होणार नाही याबाबत खातरजमा करावी.
- लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर जाहीर करावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या वेबसाईटवर भरावी.
- प्रात्यक्षिक प्लॉट शेजारी पारंपरीक पध्दतीवर आधारीत तुलनात्मक प्लॉट घेण्यात यावा.
- प्रात्यक्षिके शक्यतो रस्त्यालगत तसेच, संबंधित गावातील जमिनीचा प्रकार/सुपीकता यांचे प्रतिनिधिक असावीत. प्रात्यक्षिकाचा फलक रस्त्याच्याकडेला प्लॉटशेजारी दर्शनी भागात लावावा व त्यावर खालील माहिती नमूद करावी.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत ---------- पीक प्रात्यक्षिक'

| | | |
|---|---|---|
| १) समाविष्ठ गावांचे नाव: | २) सहभागी शेतकरी संख्या: | ३) पीक व वाण: |
| ४) प्रात्यक्षिकाचा प्रकार: | ५) खत मात्रा: | ६) जैविक खते मात्रा: |
| ७) सुक्ष्म मुलद्रव्ये मात्रा: | ८) बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर: | ९) पेरणीची तारीख: |
| १०) शेतकरी गट प्रमुख व कृषि सहाय्यकाचे नांव व भ्रमणध्वनी संपर्क क्रमांक | | |

- प्रात्यक्षिकासाठीच्या निविष्ठा वेळेपूर्वी लाभार्थी गटास उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ते नियोजन व वेळापत्रक मंडळ कृषि अधिकारी यांनी तयार करावे.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय वितरण केलेल्या व वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात.
- अभियाना अंतर्गत प्रात्यक्षिकासाठी वितरीत करावयाच्या निविष्ठा संदर्भात मागणी, तपासणी व देयक अदायगी या अनुषंगाने संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण यांनी निर्गमित केलेल्या अद्ययावत मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
- कोणत्याही परिस्थितीत बियाणे विरहित पिक प्रात्यक्षिके न राबविणेबाबत केंद्र शासनाच्या सूचना आहेत.

## परिशिष्ट ३

**सन २०१८-१९ साठी पिक प्रात्यक्षिकाकरिता पीकनिहाय उच्चत्तम अर्थसहाय्याचे दर खालीलप्रमाणे,**

| पिक | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित प्रात्यक्षिके | प्रात्यक्षिके | अर्थसहाय्य दर रुपये प्रति हेक्टर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निविष्ठा* | शेतीदिन | प्रशिक्षण साहित्य | शास्त्रज्ञ भेट व सल्ला | एकूण |
| **राअसुअ भात** | | | | | | | |
| भात | अ. सलग क्षेत्रावरील गट प्रात्यक्षिके | श्री पद्धत - सुधारित भात/ श्री पद्धत - संकरीत भात/ चारसूत्री भात पिक लागवड/ यांत्रिकी पद्धतीने पुनर्लागवड | ८२०० | २५० | २५० | ३०० | ९००० |
| | ब.पिक पद्धतीवर आधारित प्रात्यक्षिके | भात पिकानंतर कडधान्य | १४२०० | २५० | २५० | ३०० | १५००० |
| **राअसुअ गहू** | | | | | | | |
| गहू | अ. सलग क्षेत्रावरील गट प्रात्यक्षिके | गहू | ८२०० | २५० | २५० | ३०० | ९००० |
| | ब.पिक पद्धतीवर आधारित प्रात्यक्षिके | मुग/उडीद/सोयाबीन नंतर गहू | १४२०० | २५० | २५० | ३०० | १५००० |
| **राअसुअ कडधान्य** | | | | | | | |
| कडधान्य | अ. सलग क्षेत्रावरील गट प्रात्यक्षिके | तुर/मुग/उडीद/हरभरा | ८२०० | २५० | २५० | ३०० | ९००० |
| | ब.आंतरपीक पद्धतीवर प्रात्यक्षिके | सोयाबीन + तूर | ८२०० | २५० | २५० | ३०० | ९००० |
| | ब.पिक पद्धतीवर आधारित | i) मुग, उडीद पिकानंतर र. ज्वारी/ मुग, | | | | | |

| पिक | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित प्रात्यक्षिके | प्रात्यक्षिके | अर्थसहाय्य दर रुपये प्रति हेक्टर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | निविष्ठा * | शेतीदिन | प्रशिक्षण साहित्य | शास्त्रज्ञ भेट व सल्ला | एकूण |
| | प्रात्यक्षिके | उडीद पिकानंतर गहू/ ख. ज्वारी पिकानंतर हरभरा/ बाजरी पिकानंतर हरभरा | १४२०० | २५० | २५० | ३०० | १५००० |
| **रा.अ.सु.अ. भरडधान्य - मका** | | | | | | | |
| मका | अ. सलग क्षेत्रावरील गट प्रात्यक्षिके | मका | ५२०० | २५० | २५० | ३०० | ६००० |
| | ब.आंतरपीक पद्धतीवर प्रात्यक्षिके | मका + सोयाबीन / मका + तूर | ५२०० | २५० | २५० | ३०० | ६००० |
| **रा.अ.सु.अ. पौष्टीक तृणधान्ये-न्युट्री सिरीयल (ज्वारी/ बाजरी/ नागली)** | | | | | | | |
| ज्वारी | सलग क्षेत्रावरील गट प्रात्यक्षिके | ज्वारी | ५२०० | २५० | २५० | ३०० | ६००० |
| बाजरी | सलग क्षेत्रावरील गट प्रात्यक्षिके | बाजरी | ५२०० | २५० | २५० | ३०० | ६००० |
| नागली | सलग क्षेत्रावरील गट प्रात्यक्षिके | नागली | ५२०० | २५० | २५० | ३०० | ६००० |

टिप - (* उच्चतम मर्यादा दर्शवली आहे तथापि मंजूर पॅंकेज च्या अधीन राहून लागू राहील.)

१. भात पिकाच्या बांधावर तूर लागवड ही बाब मोठ्या प्रमाणात घेण्याबाबत केंद्र शासनाचे निर्देश असल्याने तसेच कडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढवण्याच्या उद्देशाने प्रत्येक प्रात्यक्षिकात सदर बाबीचा समावेश करण्यात यावा.

२. कृषि विद्यापीठाचे शिफारशीनुसार कडधान्यावर आधारित इतर पिक पद्धतीचाही समावेश करणेस हरकत नाही. यासाठीही अनुदान मर्यादा उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे रु.१५०००/- प्रती हेक्टर राहील.

३. पीक पद्धतीवर आधारित प्रात्यक्षिकासाठी लाभार्थी निवडताना **दोन्ही हंगामात पिके घेण्याची तयारी असणाऱ्या** व त्याप्रमाणे सुविधा उपलब्ध असलेल्या शेतकऱ्यांचीच निवड करावी.

४. मनुष्यबळ हा घटक राबविणे अनिवार्य आहे.

## २. बियाणे वितरण :

पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी बियाणे बदलाचे महत्व विचारात घेता संकरीत/सुधारित वाणांचे प्रसारासाठी खालीलप्रमाणे **प्रमाणित बियाणे वितरणासाठी मूळस्त्रोत** अनुदान अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | पिकाचे नाव | वयोमर्यादा | अधिकतम अनुदान मर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | संकरीत वाणाच्या बियाण्याकरिता | सुधारित वाणाच्या बियाण्याकरिता |
| राअसुअ-भात, गहू व कडधान्य बियाणे वितरण तपशील | | | | |
| १ | भात | १० वर्षाच्या आतील अधिसूचित वाण | किमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ १००००/ प्रती क्विंटल यापैकी किमानप्रमाणे | किमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ २०००/- प्रती क्विंटल यापैकी किमानप्रमाणे |
| | | १० वर्षाच्या वरील अधिसूचित वाण | -- | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ १०००/ प्रती क्विंटल यापैकी किमान प्रमाणे |
| २ | गहू | १० वर्षाच्या आतील अधिसूचित वाण | -- | किमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ २०००/- प्रती क्विंटल यापैकी किमानप्रमाणे |
| | | १० वर्षाच्या वरील अधिसूचित वाण | -- | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ १०००/ प्रती क्विंटल यापैकी किमान प्रमाणे |
| ३ | कडधान्य | १० वर्षाच्या आतील अधिसूचित वाण | -- | किमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ ५०००/- प्रती क्विंटल यापैकी किमानप्रमाणे |
| | | १० वर्षाच्या वरील अधिसूचित वाण | -- | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ २५००/- प्रती क्विंटल यापैकी किमान प्रमाणे |
| भरडधान्य - मका व पौष्टीक तृणधान्ये कार्यक्रम (ज्वारी/ बाजरी/ नागली) बियाणे वितरण तपशील | | | | |
| १ | मका | १० वर्षाच्या आतील अधिसूचित वाण | किमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ १००००/ प्रती क्विंटल यापैकी किमानप्रमाणे | -- |
| २ | पौष्टीक तृणधान्ये-न्युट्री सिरीयल (ज्वारी/ बाजरी/ नागली*) | १० वर्षाच्या आतील अधिसूचित वाण | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ १००००/ प्रती क्विंटल यापैकी किमानप्रमाणे | किमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ ३०००/- प्रती क्विंटल यापैकी किमानप्रमाणे |
| | | १० वर्षाच्या वरील अधिसूचित वाण | -- | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम ₹ १५००/ प्रती क्विंटल यापैकी किमान प्रमाणे |

**(*नागली बियाणे कृषि विद्यापीठांकडील उत्पादित सत्यप्रत बियाणे महाबीज मार्फत पुरवठा केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.)**

सदर घटकाच्या अंमलबजावणी बाबत कृषी आयुक्तालयाच्या दि. २६/०४/२०१६ रोजीच्या पत्रानुसार जिल्हास्तरीय बियाणे समिती गठीत करावी. ५० टक्के अनुदानीत दरापेक्षा बियाण्याचा दर कमी असल्यास संभाव्य बचतीतून उपलब्ध निधीच्या मर्यादेत अतिरिक्त बियाणे वितरण करण्यात यावे.

२.१. जिल्हानिहाय, पिकनिहाय वितरीत करावयाच्या प्रमाणित बियाण्यांचा तपशील परिशिष्ट २ मध्ये सहपत्रीत करण्यात येत आहे. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी **महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, एचआयएल, कृभको, कृषि विद्यापीठे व कृषि विज्ञान केंद्रे** यांच्याबरोबर समन्वय ठेवून लक्षांकाप्रमाणे संबंधित तालुक्यामध्ये बियाणे वेळेत वितरीत केले जाईल याबाबत स्थानिक पातळीवर नियोजन व अंबलबजावणी करावी. **विहित केलेल्या प्रमाणानुसार अनुसूचित जाती / जमाती व इतर प्राधान्यक्रमाच्या लाभार्थी शेतकऱ्यांना लाभ पोहचेल याची दक्षता घ्यावी.** बियाणे वितरणाचा लाभार्थी प्रवर्गनिहाय तपशील संबंधित संस्थांनी ता.कृ.अ./जि.अ.कृ.अ. यांना देयकासोबत पाठवावा जेणेकरून लाभार्थी प्रवर्गनिहाय निधी खर्ची टाकता येवू शकेल.

२.२. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी लक्षांकनिहाय व पिकनिहाय पूर्वानुभव विचारात घेवून स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुरूप कृषि हवामानास योग्य बियाण्यांची मागणी पुरवठादार संस्थांना तात्काळ द्यावी. बियाणे पुरवठादार संस्थांनी त्यांचे वितरकामार्फत प्रमाणित बियाणे वाटप करावयाचे आहे. मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी (नोडल आधिकारी) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या याद्या संबधित वितरकाकडे द्याव्यात.

२.३. पुरवठादार संस्थांच्या वितरकांनी बियाणे विक्री अनुदानित दराने खुल्या पध्दतीने करावयाची आहे. शेतकऱ्यांना बियाणे घेण्यासाठी जास्त अंतर जावे लागणार नाही याद्दष्टिने जास्तीत जास्त वितरकांकडे बियाणे उपलब्ध होईल याची दक्षता बियाणे पुरवठादार संस्थांनी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी घ्यावी.

२.४. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी **तालुकानिहाय व प्रवर्गनिहाय** निश्चित केलेल्या लक्षांकानुसार पुरवठादार संस्थांनी त्या तालुक्यातील त्यांच्या अधिकृत वितरकांकडे प्रमाणित बियाणे उपलब्ध करुन द्यावे तसेच, वाणनिहाय व वितरकनिहाय किती बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहे याची माहिती संबधीत तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना विनाविलंब उपलब्ध करून द्यावी.

**२.५. वितरकांनी दर्शनी भागावर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत प्रमाणित बियाणे अनुदानावर उपलब्ध असल्याचा फलक लावावा. तसेच, वाणनिहाय दर, अनुदान व अनुदान वजा जाता पॅकींगनिहाय येणारी किंमत याची माहिती संबंधित वितरकाने फलकावर प्रदर्शित करणे आवश्यक आहे.**

२.६. बियाणे घेण्यास येणाऱ्या शेतकऱ्याचे नाव, प्रवर्ग, गाव, सर्व्हे/गट क्रमांक, क्षेत्र याबाबतची माहिती घेऊन व त्याची खात्री करुन संबधित वितरकांनी अनुदान वजा जाता येणारी किंमत लाभार्थी शेतक-याकडून घेऊन शेतकऱ्याला बियाणे वितरीत करावे. **कृषि विभागामार्फत कोणत्याही परीस्थितीत शेतकऱ्याकडुन अनुदान वजा जाता रक्कम वसुल केली जाणार नाही याची पुरवठादार संस्थांनी नोंद घ्यावी. लाभार्थी हिश्श्याची रक्कम शेतकऱ्याकडून वसुल करण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थांच्या वितरकांची राहिल.**

२.७. खरीप व रब्बी हंगामात लाभार्थीनिहाय वितरण, वितरकाची साठा नोंदवही व विक्री बिलांची तपासणी संबंधित ता.कृ.अ. यांनी वेळोवेळी करावी.

२.८. वितरीत केलेल्या बियाण्याची खातरजमा करण्यासाठी संबंधित वितरकाने प्रवर्गनिहाय लाभार्थी याद्या तालुका कृषी अधिकारी यांचेकडे वेळेवर सादर कराव्यात. तालुका कृषी अधिकारी व बियाणे पुरवठादार संस्थांकडून संयुक्त बियाणे वितरण अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय कृषी अधिकारी यांनी बियाणे वितरण प्रमाणपत्र जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयास पाठवावे. सदर वितरण प्रमाणपत्राच्या आधारे जिल्हास्तरावरुन संबधित पुरवठादार संस्थांना अनुदान वितरीत करण्यात यावे .

२.९. पुरवठादार संस्थांकडून वितरकांकडे बियाणे प्राप्त झाल्यानंतर गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी लॉट निहाय नमुने घेऊन शासकीय बीज परीक्षण प्रयोगशाळेकडून तपासून घ्यावेत. गुणवत्ता तपासणीत नमुना अप्रमाणित घोषित झाल्यास त्या लॉटची देयके अदा करू नयेत. तसेच, **पुरवठा केलेल्या बियाणाबाबत काही तक्रारी निर्माण झाल्यास जिल्हास्तरीय / तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीद्वारे प्रत्यक्ष क्षेत्रास भेटी देवून निरीक्षणे नोंदवावीत, समितीने शास्त्रोक्त पद्धतीने**

**सुस्पष्ट निष्कर्ष नोंदवावेत. अप्रमाणित नमुन्याबाबत तसेच, तक्रारीचे अनुषंगाने पुढील कार्यवाही गुणवत्ता नियंत्रणाबाबत संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांनुसार करावी. तक्रारीबाबत बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियम १९६८ च्या भाग ९ मधील नियम २३-A नुसार कार्यवाही करावी.**

२.१०. सदर घटकाचे प्रभावी सनियंत्रणाची जबाबदारी उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहील.

२.११. वितरीत निधीतून बियाणे घटकाची अदायगी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून प्रथम प्राधान्याने करावी.

२.१२. वितरीत बियाण्याची अनुदान अदायगी केंद्र / राज्य शासनाने त्या वर्षासाठी उपलब्ध करून दिलेल्या आर्थिक मर्यादेचे अधीन राहून केली जाईल.

**३. बियाणे उत्पादन कार्यक्रम :**

**३.१. अ) प्रमाणित बियाणे उत्पादन (कडधान्य पिके) :**

कडधान्य उत्पादन वाढविण्यासाठी तूर, मुग, उडीद व हरभरा या प्रमुख कडधान्य पिकांच्या नवीन वाणांचे प्रमाणित बियाणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणे गरजेचे आहे. कडधान्य पिकांचा बियाणे बदलाचा दर वाढविण्याच्या उद्देशाने राज्यासाठी शिफारस केलेल्या वाणांचे प्रमाणित बियाणे राज्यातच उत्पादन करण्यास प्राधान्य देणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन केंद्र शासनाने सदर अभियानांतर्गत तूर, मुग, उडीद व हरभरा या कडधान्य पिकांसाठी "बियाणे उत्पादनास अर्थसहाय्य " हा घटक समाविष्ट केला आहे. **सदर घटकांतर्गत बिजोत्पादकाने उत्पादित केलेल्या १० वर्षाच्या आतील वाणांचे प्रमाणित बियाण्यापोटी ₹ ५००० प्रती क्विंटल या प्रमाणात अनुदान अनुज्ञेय आहे.**

**ब) प्रमाणित बियाणे उत्पादन (पौष्टीक तृणधान्ये- न्युट्री सिरीयल (ज्वारी/ बाजरी/ नागली):** सदर पिकांच्या बियाणे बदलाच्या दरात वृद्धी करणे व नवीन सुधारित वाणांचा प्रसार करणे हा हेतू आहे. सदर घटकांतर्गत बिजोत्पादकाने मागील १० वर्षाच्या आतील राज्यासाठी अधिसूचित झालेल्या वाणांचे राज्यांतर्गत उत्पादित केलेल्या प्रमाणित बियाण्याचे उत्पादनापोटी ₹ ३००० प्रती क्विंटल या प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. सदर घटकांतर्गत अनुज्ञेय लाभासाठी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज), राष्ट्रीय बीज निगम, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, *(नोंदणीकृत शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO/FPC)* व कृषी विज्ञान मंडळ या बिजोत्पादन करणाऱ्या संस्था पात्र ठरतील. उपलब्ध निधी मर्यादेतच सदर घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील. बिजोत्पादन कार्यक्रम राबविताना भरडधान्य / पौष्टीक तृणधान्ये पिकाच्या मागील १० वर्षाच्या आतील अधिसूचित व राज्यासाठी शिफारस केलेल्या वाणांचे बिजोत्पादन घेण्यास प्रोत्साहन द्यावे जेणेकरून पुढील वर्षी पुरेशा प्रमाणात बियाणे उपलब्ध होईल.

- बियाणे उत्पादनास इच्छुक असलेल्या उपरोक्त नमूद केलेल्या संस्थांनी प्रथम प्राधान्याने जिल्हानिहाय बीजोत्पादनाचा आराखडा संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे हंगामापूर्वी सादर करावा व त्यास जिल्हास्तरीय बियाणे समितीची मान्यता घ्यावी.
- बिजोत्पादनासाठी निवडलेल्या वाणाचे अधिसुचित वर्षाची व राज्यासाठी शिफारस असल्याची खात्री करून १० वर्षाच्या आतील अधिसुचित वाणाच्या बिजोत्पादन कार्यक्रमास मान्यता द्यावी.
- बिजोत्पादन संस्थांनी बियाणे उत्पादन कार्यक्रमाची नोंदणी बीज प्रमाणीकरण यंत्रणेकडे करावी.
- बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या सल्ल्याने व मार्गदर्शनाखाली कार्यक्रम राबवावा.
- दर्जेदार बिजोत्पादन करण्यासाठी कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करावा.

**३.२. बियाणे उत्पादन अनुदान अदायगीची कार्यपध्दती:**

- संबंधीत बिजोत्पादन संस्था नोंदणीकृत असल्याबाबतचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.
- बीजप्रमाणिकरण यंत्रणेकडील मुक्तता अहवालाची प्रत घ्यावी व त्यानुसार प्रत्यक्ष मुक्त केलेले विहित मर्यादेतील बियाणे अनुदानासाठी पात्र ठरेल.
- संस्थेने स्वत:चे प्रक्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम घेतला असल्यास बीजप्रमाणिकरण यंत्रणेकडील नोंदणीच्या व मुक्तता अहवालाचे आधारे अनुदान संबंधीत संस्थेस अनुज्ञेय राहील.
- संस्थेने बिजोत्पादन कार्यक्रम शेतक-यांच्या शेतावर घेतला असल्यास ज्या शेतक-याचे शेतावर कार्यक्रम घेतला असेल त्या शेतक-यांचे नांव, गाव, सर्व्हे नंबर, राष्ट्रीयकृत बँक खाते क्रमांक व आधार क्रमांक या तपशिलासह यादी जोडावी. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार उत्पादित बियाण्यास अनुज्ञेय अनुदान रक्कम बिजोत्पादक संस्थेस अदा केल्यानंतर

संस्थेने नोंदणी शुल्क, बियाणे प्रक्रिया इत्यादी बाबींसाठी सर्वसाधारण २५ टक्के पर्यंत रक्कम स्वत:कडे ठेवावी व उर्वरीत रक्कम बिजोत्पादक शेतक-याचे आधार सलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यावर जमा करावी. उपविभागीय कृषी अधिकारी यांनी बिजोत्पादक शेतकऱ्याचे बँक खात्यावर रक्कम जमा झाल्याची खात्री करून तसा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.

- उत्पादित बियाण्यास अनुदान अदायगी केंद्र / राज्य शासनाने त्या वर्षासाठी उपलब्ध करून दिलेल्या आर्थिक अनुदान मर्यादेचे अधीन राहून केली जाईल
- खरीप हंगामातील बिजोत्पादन कार्यक्रमाची अनुदान अदायगी संबंधित आर्थिक वर्षातच करावी आणि रब्बी हंगामातील बीजोत्पादनाचा मुक्तता अहवाल पुढील आर्थिक वर्षात प्राप्त होत असल्याने त्याबाबतचा बिजोत्पादन अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा आणि जिल्हा बियाणे समिती व जिल्हास्तरीय अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समितीच्या मान्यतेने पुढील आर्थिक वर्षाच्या कृती आराखड्यामध्ये त्याचा आठवणीने समावेश करावा.
- सदर घटकाचे प्रभावी सनियंत्रणाची जबाबदारी उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहील.

**४. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन :**

जमीन आरोग्य पत्रिका व कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार उत्पादन खर्चात बचत करून गरजेनुरूप अन्नद्रव्ये पुरवठा करण्याच्या दृष्टीने एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनामध्ये सुक्ष्ममुलद्रव्ये, जिप्सम/ गंधक व जैविकखते या बाबींचा समावेश होतो. सदर घटकाची अंमलबजावणी किमतीच्या ५० टक्के अनुदानावर करावयाची आहे. सदर अंमलबजावणी समूह/गट स्वरुपात करावी जेणेकरून सदर घटकाची परिणामकारकता इतर शेतकऱ्यांना समजावून देणे सोयीचे होईल. **सदर घटकांतर्गत प्राप्त लक्षांक खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी असून जिल्ह्यातील राअसुअ पिकांखालील क्षेत्र विचारात घेऊन या घटकाचे हंगामनिहाय व पिकनिहाय नियोजन करावे. पौष्टीक तृणधान्ये-न्युट्री सिरीयल (ज्वारी/ बाजरी/ नागली) /**कडधान्य पिकांसाठी सदर घटक राबविताना मुख्य पिकांबरोबरच आंतरपिकांच्या (उदा. सोयाबीन,वाल, मसूर, राजमा, चवळी, तूर इ.) उत्पादन वाढीसाठी देखील नियोजन करावे.

**४.१. सूक्ष्ममूलद्रव्यांचा वापर :**

- जिल्ह्याच्या सुपीकता निर्देशांकानुसार ज्या तालुक्यात सूक्ष्ममुलद्रव्यांची कमतरता आहे अशा तालुक्यातील शेतकरी गटांची निवड करून त्यांना सूक्ष्ममूलद्रव्याचे महत्त्व पटवून द्यावे.
- सूक्ष्ममुलद्रव्याच्या वापरासाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा ₹ ५००/- प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने शिफारशीप्रमाणे सूक्ष्ममूलद्रव्ये त्यांच्या पसंतीने खुल्या बाजारातून खरेदी करावीत व त्यानंतर गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय वापरलेल्या सुक्ष्ममुलद्रव्यांच्या नोंदी व संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषी सहाय्यकांनी नोंदवहीत ठेवावा. तसेच, तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना सूक्ष्ममुलद्रव्यांचे महत्त्व पटवून द्यावे.

**४.२. फॉस्पोजिप्समचा / गंधक (९० WDG) वापर**

- कडधान्य पिकांकरिता फॉस्पोजिप्सम/गंधकाचा वापर जमीन आरोग्य पत्रिकेतील शिफारशीनुसार करावा.
- फॉस्पोजिप्सम/गंधकाच्या वापरासाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा ₹ ७५०/- प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने खरेदी करावीत व त्यानंतर गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय वापरलेल्या फॉस्पोजिप्सम/गंधकाच्या नोंदी व संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषी सहाय्यकांनी नोंद वहीत ठेवावा. तसेच तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना फॉस्पोजिप्सम/गंधकाचे महत्त्व पटवून द्यावे.

**४.३. जिवाणु खते**

- **सदर बाब फक्त कडधान्य/ पौष्टीक तृणधान्ये-न्युट्री सिरीयल (ज्वारी/ बाजरी/ नागली) कार्यक्रमासाठी लागू आहे.** कृषी विभागाच्या जैविक प्रयोगशाळामार्फत पीक गटास आवश्यक द्रवरूप जैविक खते/जैविक खते संघ (liquid

consortia) तयार करण्यात येत असून सदर खतांची बीजप्रक्रिया केल्यास उत्पादन खर्चात बचत करून पिकांच्या उत्पादकतेत वाढ होते. खत नियंत्रण आदेश, १९८५ मध्ये द्रवरूप जीवाणू संघ (liquid consortia) त्यामध्ये नत्र स्थिरीकरण करणारे, स्फुरद विरघळविणारे व जस्त विरघळविणारे जीवाणू उपलब्ध करून देणारे यापैकी कमीत कमी दोन किंवा अधिक जीवाणूंचा समावेश असतो असे जैविक खत म्हणजेच द्रवरूप जीवाणू संघ (liquid consortia). एकच जीवाणू असणारे जैविक खत व दोन किंवा अधिक जीवाणू असणारे जीवाणू संघ यांची तुलना केली असता द्रवरूप जीवाणू संघ (liquid consortia) हा तुलनेने स्वस्त, वापरण्यास सोपा, वाहतूक खर्च कमी, बीज प्रक्रियेसाठी विशेष कौशल्याची आवश्यकता नसलेला व एकात्मिक अन्नद्रव्य पुरविण्याचा उद्देश साध्य करणार आहे. यापूर्वी प्रामुख्याने घनरूप जैविक खतांचा वापर केला जात होता. परंतु त्यापेक्षा द्रवरूप जीवाणू खते अधिक फायदेशीर आहेत. एकच जीवाणू असलेले द्रवरूप/घनरूप जैविक खते वापरण्यापेक्षा तीनही मुख्य अन्नद्रव्य उपलब्ध करून देणारे जैविक खत वापरणे फायदेशीर ठरते. उपरोक्त तीन जीवाणूंचा समावेश असणारे जैविक खत हे पिकानुसार उपलब्ध करून दिले जाऊ शकते. याबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात यावी. संबंधित गटामार्फत द्रवरूप जीवाणू संघ (liquid consortia) प्रथम पूर्ण किंमत देवून खरेदी करावीत व तद्नंतर गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे. **शेतकरी गटाने जीवाणू खतांची खरेदी प्रथम प्राधान्याने शासकीय प्रयोगशाळा, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे या प्राधान्यक्रमाने यांच्याकडून करावी**.

- शेतकऱ्यांना खुल्या बाजारातून जिवाणु खते खरेदी करावयाची असल्यास **कडधान्य व पौष्टीक तृणधान्ये पिकांसाठी किंमतीच्या** ५० टक्के किंवा **₹ ३००/-** प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने खरेदी करावी व त्यानंतर याबाबत खात्री करून गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय वापरलेल्या जिवाणू खतांच्या नोंदी व संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषी सहाय्यकांनी नोंदवहीत ठेवावा. तसेच तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना जिवाणू खतांचे महत्त्व पटवून द्यावे.

## ५. एकात्मिक कीड/रोग व्यवस्थापन

### ५.१. पीक संरक्षणासाठी कीडनाशके पुरवठा

हवामान बदलामुळे पिकांवर विविध कीड/रोगांचा प्रादुर्भाव होत असल्याने पीकसंरक्षणा वरील खर्च वाढतो. पर्यायाने अन्नधान्य पिकांच्या उत्पादन खर्चात वाढ होते. कीडनियंत्रणासाठी रासायनिक कीडनाशकांचा वापर अनिवार्य असल्यास सदर घटकाची अंमलबजावणी शास्त्रोक्त पद्धतीने व प्रभावीपणे करावी. यासाठी प्रथम्याने केंद्रीय कीटकनाशक मंडळाने लेबल क्लेमसह शिफारस केलेल्या (**कीडनाशकांचे लेबल क्लेम www.cibrc.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत**) किंवा कृषि विद्यापीठांनी शिफारस केलेल्या किडनाशकांचाच वापर करावा. कडधान्य **/पौष्टीक तृणधान्ये**पिकांसाठी सदर घटक राबविताना मुख्य पिकांबरोबरच अंतर पिकांच्या (उदा. सोयाबीन, वाल, मसूर, राजमा, चवळी, तूर इ.) उत्पादन वाढीसाठी देखील नियोजन करावे.

- शेतकऱ्यांच्या निवडलेल्या पिकांवरील मागील २-३ वर्षाच्या किड व रोगांचे प्रादुर्भावाबाबत माहिती घेण्यात यावी. या माहितीनुसार महत्त्वाच्या किड व रोगाचे एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या अनुषंगाने वेळीच पीक संरक्षण औषधांचा वापर करणेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात यावे. यासाठी कीड व रोग सर्वेक्षणाच्या अहवालाचा उपयोग करावा.
- पीक संरक्षण औषधांसाठी किमतीच्या ५० टक्के किंवा रुपये ५००/- प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने लेबल क्लेम असलेल्या पिक संरक्षण औषधांची खरेदी करावी व त्यानंतर याबाबत खात्री करून गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय किडींचा झालेला प्रादुर्भाव व त्यासाठी वापरलेल्या रासायनिक कीडनाशकांच्या नोंदी व संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषी सहाय्यकांनी नोंदवहीत ठेवावा. तसेच तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना कीड व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून द्यावे.

- कोणत्याही परिस्थितीत मंजूर आर्थिक/भौतिक कार्यक्रमापेक्षा जास्त मागणी तसेच, शिफारस न केलेल्या कीडनाशकांचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**५.२. तणनाशके**

ऐन हंगामात मजूर उपलब्धतेच्या समस्येमुळे व वाढत्या मजुरी दरांमुळे तणनियंत्रणावरील खर्च वाढत असून अन्नधान्य पिकांच्या उत्पादन खर्चात वाढ होत आहे. तणनियंत्रणासाठी रासायनिक तणनाशकांचा वापर अनिवार्य असल्यास सदर घटकाची अंमलबजावणी शास्त्रोक्त पद्धतीने व प्रभावीपणे करावी.

- तणनाशकांच्या किंमतीच्या ५० टक्के किंवा ₹ ५००/- प्रति हेक्टर यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. त्यासाठी लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने लेबल क्लेम असलेल्या तणनाशकांची खरेदी करावी व त्यानंतर खात्री करून गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्यात यावे.
- तणनाशके ही पिकांसाठी अतिसंवेदनशील असल्याने लेबलक्लेमवर नमूद केलेल्या वापराबाबतच्या सूचनांप्रमाणे व तज्ञांच्या सल्ल्यानेच तणनाशकांचा वापर करण्याची सर्वतोपरी दक्षता घेण्यात यावी.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय तणांच्या नियंत्रणासाठी वापरलेल्या तणनाशकांच्या नोंदी व मजूर खर्चामध्ये झालेली बचत आणि संबंधित पिकांचे आलेले उत्पादन याबाबतचा तपशील कृषी सहाय्यकांनी नोंदवहीत ठेवावा. तसेच तुलनात्मक प्लॉटच्याही उत्पादन नोंदी ठेवाव्यात आणि इतर शेतकऱ्यांना तणव्यवस्थापनाचे महत्त्व पटवून द्यावे.
- कोणत्याही परिस्थितीत मंजूर आर्थिक/भौतिक कार्यक्रमापेक्षा जास्त मागणी तसेच, शिफारस न केलेल्या तणनाशकांचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**६. संसाधनाच्या संवर्धनासाठी तंत्रज्ञान /औजारे (सुधारित कृषी औजारे) :**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत समाविष्ट पिकांच्या उत्पादन खर्चात बचत करून उत्पादन वाढ करण्यासाठी उपयुक्त असलेल्या यंत्रे/कृषी औजारांचे वापरास प्रोत्साहन देण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी **आधुनिक कृषी औजारे व यंत्रांबाबतची माहिती तसेच यंत्र चालविण्याबाबतचे कौशल्य इच्छुक शेतकऱ्यांना प्राप्त होण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राचे सहकार्याने प्रशिक्षण व प्रात्यक्षिकाचे आयोजन करावे.**

**६.१. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान २०१८-१९ अंतर्गत मंजूर औजारांचा तपशील**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान २०१८-१९ साठी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या औजारांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | सुधारित कृषि औजारे | अधिकतम अनुदान मर्यादा (रुपये) | | पिक | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ.ज /अ.जा./महिला / अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी (५० टक्के) | इतर शेतकरी (४० टक्के) | भात | गहू | कडधान्य |
| १ | ड्रम सीडर ( below ४ rows) | १५०० | १२०० | ✓ | -- | -- |
| | ड्रम सीडर ( above ४ rows) | १९०० | १५०० | ✓ | -- | -- |
| २ | चीजल प्लो (below २० bhp tractor driven) | ८००० | ६००० | -- | ✓ | -- |
| | चीजल प्लो (above २०-३५ bhp tractor driven) | १०००० | ८००० | -- | ✓ | -- |
| ३ | पेरणी यंत्र (Seed Drill) (Tractor Driven below २० bhp ) | १५००० | १२००० | ✓ | ✓ | ✓ |
| | पेरणी यंत्र (Seed Drill) (Tractor Driven above २०-३५ bhp ) | १९००० | १५००० | ✓ | ✓ | ✓ |
| | पेरणी यंत्र (Seed Drill)(Tractor Driven above ३५ bhp ) | ४४००० | ३५००० | ✓ | ✓ | ✓ |
| ४ | झीरो टिल बहुपीक बियाणे व खत पेरणी यंत्र (Tractor Driven below २० bhp ) | १५००० | १२००० | -- | ✓ | -- |
| | झीरो टिल बहुपीक बियाणे व खत पेरणी यंत्र (Tractor Driven above २०-३५ bhp ) | १९००० | १५००० | -- | ✓ | -- |
| | झीरो टिल बहुपीक बियाणे व खत पेरणी यंत्र (Tractor Driven above ३५ bhp ) | ४४००० | ३५००० | -- | ✓ | -- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | झीरो टिल बहुपीक पेरणी यंत्र (Tractor Driven below २० bhp ) | १५००० | १२००० | -- | ✓ | -- |
| | झीरो टिल बहुपीक पेरणी यंत्र (Tractor Driven above २०-३५ bhp ) | १९००० | १५००० | -- | ✓ | -- |
| | झीरो टिल बहुपीक पेरणी यंत्र (Tractor Driven above ३५ bhp ) | ६३००० | ५०००० | -- | ✓ | -- |
| ६ | रीज फरो प्लांटर (Tractor Driven below २० bhp ) | १५००० | १२००० | -- | -- | ✓ |
| | रीज फरो प्लांटर (Tractor Driven above २०-३५ bhp ) | १९००० | १५००० | -- | -- | ✓ |
| | रीज फरो प्लांटर (Tractor Driven above ३५ bhp ) | ६३००० | ५०००० | -- | -- | ✓ |
| ७ | पॉवर विडर - Engine opertaed Below २ bhp | १५००० | १२००० | ✓ | -- | -- |
| | पॉवर विडर - Engine opertaed above २ bhp | १९००० | १५००० | ✓ | -- | -- |
| ८ | रोटाव्हेटर (Tractor Driven below २० bhp ) | ३५००० | २८००० | ✓ | ✓ | ✓ |
| | रोटाव्हेटर (Tractor Driven above २०-३५ bhp ) | ४४००० | ३५००० | ✓ | ✓ | ✓ |
| | रोटाव्हेटर (Tractor Driven above ३५ bhp ) | ६३००० | ५०००० | ✓ | ✓ | ✓ |
| ९ | भात मळणी यंत्र (Tractor Driven below २० bhp ) | २०००० | १६००० | ✓ | -- | -- |
| | भात मळणी यंत्र (Tractor Driven above २०-३५ bhp ) | २५००० | २०००० | ✓ | -- | -- |
| | भात मळणी यंत्र (Tractor Driven above ३५ bhp ) | ६३००० | ५०००० | ✓ | -- | -- |
| १० | बहुपीक मळणी यंत्र (Tractor Driven below २० bhp ) | २०००० | १६००० | ✓ | ✓ | ✓ |
| | बहुपीक मळणी यंत्र (Tractor Driven above २०-३५ bhp ) | २५००० | २०००० | ✓ | ✓ | ✓ |
| | बहुपीक मळणी यंत्र (Tractor Driven above ३५ bhp ) | ६३००० | ५०००० | ✓ | ✓ | ✓ |
| ११ | स्वयंचलित भात लावणी यंत्र (४ rows) | ९४००० | ७५००० | ✓ | -- | -- |
| | स्वयंचलित भात लावणी यंत्र (above ४-८ rows, ८-१६ rows) | २००००० | २००००० | ✓ | -- | -- |
| १२ | पॉवर टिलर (Below ८ bhp) | ५०००० | ४०००० | ✓ | ✓ | ✓ |
| | पॉवर टिलर ( ८ bhp & Above) | ७५००० | ६०००० | ✓ | ✓ | ✓ |
| १३ | स्वयंचलित भात कापणी यंत्र (Reaper) (Below २० bhp) | २०००० | १६००० | ✓ | ✓ | -- |
| | स्वयंचलित भात कापणी यंत्र (Reaper) (Above २०-३५ bhp) | २५००० | २०००० | ✓ | ✓ | -- |
| १५ | स्वयंचलित भात कापणी यंत्र (Reaper) (Above ३५ bhp) | ६३००० | ५०००० | ✓ | ✓ | -- |
| | स्वयंचलित भात कापणी व बांधणी यंत्र (Reaper cum binder) | १२५००० | १००००० | ✓ | ✓ | -- |

### ६.२. औजारे घटकासाठी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यावर जमा करण्याबाबत कार्यपद्धती (DBT)

उपरोक्त संदर्भ ३ वरील शासन निर्णयानुसार कृषी विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र व राज्य योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या कृषी औजारांच्या संदर्भात थेट लाभ हस्तांतरण योजना, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कलम ३ अन्वये लोकसेवा म्हणून अधिसूचित करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने कृषी औजारासंदर्भात कार्यवाही करणे बंधनकारक आहे. याबाबत उपरोक्त संदर्भ क्र २ ते ६ वरील शासन निर्णयांचे पालन करावे. तद्अनुषंगाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत औजारे घटकाच्या अंमलबजावणीसाठी कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील. कृषी औजारे घटकांतर्गत मंजूर औजारांमध्ये स्थानिक मागणीचे अनुषंगाने अंतर्गत बदल मंजूर आर्थिक तरतुदीचे मर्यादेत विभागीय कृषि सहसंचालक यांचे मान्यतेने करता येतील. DBT कार्यपद्धतीनुसार अनुदानाची अदायगी केलेल्या सर्व लाभार्थींची माहिती http://www.nfsm.gov.in/mis या लिंकवर तात्काळ भरून वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावी. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानामध्ये दर्शविलेली औजारे उपरोक्त संदर्भ क्र. ४ वरील शासन निर्णयामध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीने तसेच याबाबत संचालक (निवगुनि) यांनी वेळोवेळी घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार शेतकऱ्यांना अनुदानावर देण्यात यावीत.

- सदर घटकाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रपत्रे व मासिक प्रगती अहवाल **प्रपत्र ३** मध्ये सहपत्रीत केले आहे.
- पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी सिंचन साधनांतर्गत पंपसंच घटकासाठी लाभार्थी निवडताना ज्या शेतकऱ्यांनी यापुर्वी विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनेत शेततळ्याचा /विहारींचा लाभ घेतलेला आहे अशा शेतकऱ्यांची तसेच महावितरणच्या प्रतिक्षा यादीतील शेतकऱ्यांची प्राधान्याने निवड करावी.

## ७. पीक पद्धतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण

याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. ४ चे पालन करावे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- भात, गहू व कडधान्य/पौष्टिक अन्नधान्य अंतर्गत जिल्हानिहाय पीक पद्धतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षणाचे लक्षांक परिशिष्ट -२ मध्ये देण्यात आलेले आहेत.

सुधारित पीक उत्पादन पद्धतीची माहिती जास्तीत जास्त शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशिक्षण ही बाब महत्त्वाची असल्याने अभियानामध्ये पीक पद्धतीवर आधारित प्रशिक्षणाचा समावेश करण्यात आलेला आहे. पीक पद्धतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण **दोन** सत्रामध्ये राबवावयाचे आहेत. जिअकृअ व प्रकल्प संचालक, आत्मा यांनी समन्वयाने सदर घटकाचे नियोजन व अंमलबजावणी खालीलप्रमाणे करावी .

- जिल्हानिहाय दिलेल्या लक्षांकानुसार ज्या शेतकऱ्यांची पीक पध्दतीवर आधारीत पिक प्रात्यक्षीकांकरिता निवड झालेली आहे त्याच शेतकऱ्यांना /शेतकरी गटांना प्राधान्याने प्रशिक्षीत करावे .
- **सदर शेतकरी प्रशिक्षणाचा कार्यक्रम संदर्भ क्र. ४ वरील शासन निर्णयानुसार प्राधान्याने कृषी विद्यापीठ, कृषी विद्यापीठांतर्गत संशोधन केंद्र, केंद्र शासनाच्या संस्था, कृषि विज्ञान केंद्र, शासकीय कृषी महाविद्यालय इ. शासकीय संस्थांमध्ये आयोजित करावा व या संस्थांकडे प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली नाही तर कृषी चिकित्सालयाच्या ठिकाणी देखील प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे.**
- प्रशिक्षण वर्ग हा एकुण दोन सत्रामध्ये (खरीप व रब्बी हंगामाच्या सुरवातीस) आयोजीत करण्यात यावा.
- प्रत्येकी ३५ शेतकऱ्यांच्या समुहासाठी एका सत्रासाठी रक्कम रू. ७०००/- आर्थिक तरतूद राहिल. संपुर्ण दोन सत्राच्या प्रशिक्षण वर्गासाठी एकूण रक्कम ₹ १४०००/- अनुदान अनुज्ञेय राहील. प्रशिक्षणासाठी निवडलेले ३५ शेतकऱ्यांनाच दोन्ही सत्रामध्ये प्रशिक्षण द्यावयाचे आहे. **प्रत्येक सत्रासाठी वेगवेगळे शेतकरी निवडण्यात येऊ नये.**
- सदर प्रशिक्षण पीक पद्धतीवर आधारित असल्याने प्रशिक्षणार्थीना आंतरपीक पद्धती व साखळी पीक पद्धती बाबतचे प्रशिक्षण साहित्य देणे बंधनकारक राहील.
- पिक व्यवस्थापन (लागवड पद्धती व पिक संरक्षण) बरोबरच प्राथमिक प्रक्रिया, साठवणूक व विक्री व्यवस्थापन या विषयांचा देखील समावेश प्रशिक्षण कार्यक्रमात करावा.
- प्रशिक्षण शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग व कृतीव्दारे अनुभव (Experiential learning) या तत्वावर आधारीत राहील. शेतकरी प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम हा हंगामानुसार व स्थानिक गरजेनुरुप राहील.
- हंगामनिहाय व पिकनिहाय प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करून आयुक्तालयास सादर करावे.
- महिनानिहाय आयोजित केलेल्या प्रशिक्षणाचे भौतिक साध्य मासिक प्रगती अहवालामध्ये दर्शवावे.

**शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे बाब निहाय मापदंड खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | तपशिल/बाब | मापदंड | २ सत्रासाठी एकूण रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| १ | तज्ञांचे मानधन | ₹ १००० प्रति सत्र | ₹ २,०००/- |
| २ | प्रशिक्षणासाठी लागणारे साहित्य व लेखनसामग्री | ₹ १००० प्रति सत्र | ₹ २,०००/- |
| ३ | प्रशिक्षणार्थी व सहाय्यक कर्मचाऱ्यासाठी अल्पोपहार (३५ व्यक्तींसाठी) | ₹ १००/ प्रतिव्यक्ती प्रति सत्र | ₹ ७,०००/- |
| ४ | आकस्मिक खर्च, इंधन वाहनाची सोय इ. | ₹ १५०० प्रति सत्र | ₹ ३,०००/- |
| एकूण खर्च | | | ₹ १४,०००/- |

आयोजित केलेल्या प्रशिक्षण सत्रांबाबत जिल्ह्याचा सविस्तर अहवाल कृषी आयुक्तालयास पाठवावा. अहवालामध्ये प्रशिक्षणाचे वेळापत्रक, निवडलेले विषय, प्रशिक्षण साहित्य (घडीपत्रिका, माहितीपत्रक, पुस्तिका इ.), तज्ञ मार्गदर्शकांची नावे, संपर्क क्रमांक व ई-मेल पत्ते, सहभागी प्रशिक्षणार्थींची संख्या, फोटो आणि बातम्या यांचा समावेश असावा.

## ८. प्रकल्प व्यवस्थापन चमू व संकीर्ण खर्च

### ८.१ प्रकल्प व्यवस्थापन चमू (Project Management Team) :

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कार्यक्रमासाठी (भरडधान्य व पौष्टिक अन्नधान्य कार्यक्रम वगळता) १ तंत्र सल्लागार व २ तंत्र सहाय्यक यांचा एक प्रकल्प व्यवस्थापन चमू निर्धारित केलेला असून आयुक्तालय स्तरावर २ चमूस व पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग वगळता उर्वरित ३१ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक चमूस मान्यता आहे. ठाणे जिल्ह्यासाठी मंजूर २ तंत्र सहाय्यकांपैकी एक तंत्र सहाय्यकाची सेवा जिअकृअ पालघर कार्यालयासाठी वापरण्यात यावी.

जिल्हास्तरावरील चमुसाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी ₹१०.०० लाख निधीची तरतूद आहे. आयुक्तालय स्तरावरील प्रकल्प चमूचे मानधन खर्चासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पुणे यांचे स्तरावर आवश्यक तरतूद उपलब्ध राहील. जिल्हास्तरीय प्रकल्प व्यवस्थापन चमूसाठी आवश्यक अर्हता व मानधनाचा तपशील खालीलप्रमाणे राहील.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत कंत्राटी तत्त्वावर भरावयाच्या पदांसाठी अर्हता, अनुभव व मानधन**

| अ.क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तर सल्लागार (District Consultant) | ०१ | कृषि विद्यावेत्ता, कृषी विस्तार, मृदशास्त्र, पीक संरक्षण, वनस्पती पैदासशास्त्र, पिक सुधारणा या विषयातील पदव्युत्तर पदवी व कमीत कमी १० वर्षाचा क्षेत्रीय कामाचा अनुभव, गटाचे नेतृत्व करण्याची व प्रेरणा देण्याची क्षमता आवश्यक. | एकत्रित मानधन ₹ ३००००/- + पूरक भत्ता ₹ १०००/- + दैनिक भत्ता ₹ १५० प्रमाणे (फक्त १० दिवसासाठी) |
| | तंत्र सहाय्यक जिल्हास्तर (Technical Assistant) | ०२ | कृषी विषयातील पदवी व क्षेत्रीय स्तरावरील पिक व्यवस्थापन क्षेत्रातील प्राविण्य तसेच संगणकीय ज्ञान आवश्यक, कृषी विषयातील पदवीधर उपलब्ध न झाल्यास जैविक शास्त्रातील पदवीधारकांचा विचार करावा. संशोधन व विस्तार विषयातील अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. | एकत्रित मानधन ₹ २००००/- + पूरक भत्ता ₹ ८००/- + दैनिक भत्ता ₹ १०० प्रमाणे (फक्त १० दिवसासाठी) |

सदर चमूतील सल्लगार व तंत्र सहाय्यकांच्या सेवा कंत्राटी पद्धतीने घेण्यात याव्यात. GST Council approved rate schedule for services **मधील अनु. क्र. ४ (vi) नुसार कृषि विस्तार सेवांकरिता GST लागू नाही. त्यामुळे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत प्रकल्प व्यवस्थापन चमूच्या नियुक्तीसाठी सेवा पुरवठादार संस्थेबरोबर करार करताना उपरोक्त नियमांचा उल्लेख करारमध्ये स्पष्टपणे करण्यात यावा.** जिल्हास्तरीय चमूमध्ये २ तंत्र सहाय्यकांच्या सेवा घ्यावयाच्या असून त्यांच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.

- तंत्र सहाय्यक १
  १. मासिक प्रगती अहवाल सादर करणे.
  २. MIS Online भरणे.
  ३. लाभधारकांची माहीती Online भरणे.
  ४. घटकनिहाय लाभार्थी याद्यांचे Excel sheet मध्ये संकलन करून सादर करणे.
  ५. जिल्हा स्तरावरुन तालुकानिहाय व प्रकल्पनिहाय कार्यक्रमाचे सनियंत्रण करणे.
- तंत्र सहाय्यक २
  १. प्रात्यक्षिकातील तसेच इतर घटकातील प्लॉटची उत्पादनाची आकडेवारी संकलन करणे.
  २. बियाणे वितरण व बिजोत्पादन घटकाचे उपविभागीय कृषी अधिकारी यांनी सदर केलेय अहवालांचे संकलन व विश्लेषण करणे.
  ३. कृषी औजारे घटकाचा DBT कार्यवाहीचा प्रगती अहवाल सादर करणे.
  ४. अभियानाच्या यशोगाथा सादर करणे.
  ५. शेतकरी प्रशिक्षणाचे सनियंत्रण करणे.
  ६. क्षेत्रीय स्तरावरील संर्वगनिहाय तपासणीचा अहवाल तयार करणे.
- जिल्हास्तरीय चमूमध्ये एका सल्लागाराची सेवा घ्यावयाची असून त्यांच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे राहतील.
  १. जिल्हास्तरीय अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समिती आणि जिल्हा बियाणे समितीच्या कामकाजासाठी समन्वयक म्हणून काम करणे.
  २. केंद्र व राज्य स्तरावरील अभियानाशी संबंधित अधिकाऱ्यांचे दौऱ्याचे समन्वयन करणे.
  ३. जिल्ह्यातील कृषी विज्ञान केंद्र व कृषी संशोधन केंद्राशी समन्वय ठेवणे.
  ४. जिल्ह्यातील कृषी विषयक सांख्यिकी माहिती संकलन व जतन करणे.
  ५. तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांचे नियोजन व संनियंत्रण करून उत्पादन/ उत्पादकतेविषयी माहितीचे विश्लेषण करणे.
  ६. शेतकरी प्रशिक्षणासाठी व प्रचार प्रसिद्धीसाठी साहित्य विकसित करणे.
  ७. निविष्ठा पुरवठ्याचे व्यवस्थापन करणे.
  ८. अभियानाच्या फलनिष्पत्तीबाबत विश्लेषणात्मक अहवाल आणि यशोगाथा तयार करणे.

## ८.२ संकीर्ण खर्च

संकीर्ण खर्चासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कडधान्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यासाठी रक्कम ₹ २.०० लाख निधी उपलब्ध आहे. याअंतर्गत कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी भाडोत्री वाहन घेणे यासाठी ₹ १.२० लाख, कार्यालयीन संगणक/ स्टेशनरीसाठी ₹ ०.५० लाख व इतर संकीर्ण बाबीसाठी ₹ ०.३० लाख तरतूद उपलब्ध राहील. आयुक्तालय स्तरावरील संकीर्ण खर्चासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, पुणे यांना अतिरिक्त तरतूद उपलब्ध राहील.

## ९. स्थानिक पुढाकाराच्या बाबी

स्थानिक स्तरावर आवश्यक वाटणाऱ्या ज्या बाबींचा समावेश अभियानाच्या नियमित कार्यक्रमामध्ये नाही परंतु अशा बाबींमुळे पिकाचे उत्पादन वाढण्यास, मूल्यवृद्धी तसेच उत्पादनाची विक्री तथा साठवणूक व्यवस्था बळकट करण्यास मदत होते अशा बाबी या घटकांतर्गत समाविष्ट आहेत. केंद्र शासनाने सन २०१८ -१९ साठी स्थानिक पुढाकाराच्या बाबी अंतर्गत मंजूर केलेले घटक पुढीलप्रमाणे आहेत.

**राअसुअ भात -**

१. शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO/FPC) साठी गोदाम बांधकाम (२५० मे.टन क्षमतेचे), २ . शेतकरी गटासाठी मिनी राईस मिल, ३. मूल्यवर्धनासाठी स्थानिक वाणांचे प्रात्यक्षिके व प्रक्रिया.

**राअसुअ गहू -**

१. शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO/FPC) साठी गोदाम बांधकाम (२५० मे.टन क्षमतेचे).

**राअसुअ कडधान्य -**

१. शेतकरी गटासाठी मिनी डाळ मिल; २ .शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO/FPC) साठी गोदाम बांधकाम (२५० मे.टन क्षमतेचे); ३. शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO/FPC) साठी बीज प्रक्रिया प्रकल्प.

**सदर बाबींच्या अंमलबजावणीसाठी विविध प्रसारमाध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी द्यावी. दिलेल्या लक्षांकापेक्षा अधिक शेतकरी गटांचे / शेतकरी उत्पादक संघ/कंपनीचे अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समितीच्या मान्यतेने सोडत (लॉटरी) पद्धतीने लाभार्थी निवड करावी.**

### ९.१ मिनी दाल मिल :

कडधान्याचे डाळीमध्ये रुपांतर करण्यासाठी सध्या मोठ्या दाल मिल उद्योगाची उभारणी करावी लागते व त्यासाठी मोठी गुंतवणूक आवश्यक असते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे कमी भांडवल उभारणीतही सर्व प्रकारच्या डाळी तयार करण्यासाठी मिनी दाल मिल सयंत्राची निर्मिती करण्यात आली आहे. हे सयंत्र ग्रामीण स्तरावर घरगुती उद्योग म्हणून स्वयंरोजगारास उत्कृष्ट आहे. सदर सयंत्राची उपयुक्तता लक्षात घेऊन अभियानामध्ये कडधान्य पिकाकरीता या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. मिनी दाल मिलचा लाभ शेतकरी/ महिला गट, यांना घेता येईल. सदर बाबीसाठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा ₹ १.२५ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. या बाबीच्या अंमलबजावणीसाठी सुधारित कृषी औजारे घटकांतर्गत (परिच्छेद क्र. ६.२) नमूद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा. मिनी दाल मिलच्या ठिकाणी दर्शनी भागावर खालीलप्रमाणे बोर्ड लावावा.

महाराष्ट्र शासन

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान वर्ष सन २०१८-१९**

| | |
|---|---|
| शेतकरी गटाचे नाव:- ............................ | प्रक्रिया क्षमता ............ |
| एकुण खर्च : रु. ............../- | अनुदानाची रक्कम : रु. ................/- |

### ९.२ मिनी राईस मिल :

दुर्गम भागामध्ये भात भरडाई केंद्रांची (राईस मिल) पुरेशी उपलब्धता नसल्याने शेतकऱ्यांना भात भरडाईसाठी अडचणी निर्माण होतात. परिणामी भाताच्या मूल्यवृद्धीमध्ये मर्यादा येवून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही. सदर समस्येवर मात करण्यासाठी ग्रामीण भागात विजेवर तसेच विजेशिवाय चालणाऱ्या लहान भात भरडाई केंद्रांची (मिनी राईस मिल) स्थापना करणे आवश्यक आहे. यासाठी अभियानांतर्गत भात पिकाकरीता मिनी राईस मिल या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. सदर बाबीचा लाभ शेतकरी/ महिला गट, यांना घेता येईल. सदर बाबीसाठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा ₹ १.२५ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. सदर बाबीच्या अंमलबजावणीसाठी सुधारित कृषी घटकांतर्गत (परिच्छेद क्र. ६.२) नमूद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा. मिनी राईस मिलच्या ठिकाणी दर्शनी भागावर खालीलप्रमाणे बोर्ड लावावा.

महाराष्ट्र शासन

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान वर्ष सन २०१८-१९**

शेतकरी गटाचे नाव:- ............................ प्रक्रिया क्षमता ...........

एकूण खर्च : रु. ............../- अनुदानाची रक्कम : रु. .............../-

### ९.३ शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO/FPC) साठी बीज प्रक्रिया प्रकल्प :

उत्पादित बियाण्यावर प्रक्रिया करून दर्जेदार बियाणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रमाणित बियाणे उत्पादन करणाऱ्या शेतकरी उत्पादक संघ/कंपनी FPO/FPC यांना बीज प्रक्रिया प्रकल्प उभारणी करण्यासाठी (यंत्रसामुग्री व बांधकामासाठी) प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा ₹ १०.०० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. सदर बाब बँक कर्जाशी निगडीत असून लाभार्थ्याने शेतकरी उत्पादक संघ/कंपनी(FPO/FPC) ने बँकेकडे प्रकल्प सादर करावा.

बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर संबंधित शेतकरी उत्पादक संघ/कंपनी(FPO/FPC) सदर बाबीच्या लाभास पात्र राहील.

तालुका कृषी अधिकारी यांनी अशा शेतकरी उत्पादक संघ/कंपनी(FPO/FPC) चे अर्ज पूर्वसंमतीकरिता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी संमती दिल्यानंतर संबंधित लाभार्थ्यास कार्यारंभ आदेश द्यावेत.

बँक प्रतिनिधी व मंडळ कृषी अधिकारी यांच्या संयुक्त मोका तपासणी अहवालाच्या आधारे लाभार्थ्यास अनुज्ञेय होणारे अनुदान त्याच्या राष्ट्रीयकृत बँक खात्यावर वर्ग करावे. दिलेल्या लक्षांकानुसार अंमलबजावणी करावी. बीज प्रक्रिया प्रकल्पाचे दर्शनी भागावर खालीलप्रमाणे बोर्ड लावण्यात यावा तसेच प्रकल्पाचे कामापूर्वी व कामानंतर Geotagging करावे.

महाराष्ट्र शासन

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान वर्ष सन २०१८-१९**

शेतकरी उत्पादक संघ/कंपनी नाव:- ............................बीज प्रक्रिया क्षमता ...........

एकूण खर्च : रु. ............../- अनुदानाची रक्कम : रु. .............../-

### ९.४ गोदाम बांधकाम :

अन्नधान्य उत्पादनाच्या सुरक्षित साठवणुकीसाठी व मुल्य वृद्धीसाठी गोदाम सुविधा आवश्यक आहे. ज्या ठिकाणी गोदामाची व्यवस्था नाही अशा परिसरात भात, गहू आणि कडधान्य पिके घेतली जातात अशा ठिकाणी गोदाम कार्यक्रम देण्यात यावा. या अनुषंगाने अभियानांतर्गत २५० मे.टन क्षमतेचे गोदाम बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा ₹ १२.५० लाख यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. सदर बाब बँक कर्जाशी निगडीत असून इच्छुक अर्जदाराने (शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO/FPC) ) केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण

योजना/ नाबार्डच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँकेकडे प्रकल्प सादर करावा. बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर संबंधित अर्जदार कंपनी सदर बाबीच्या लाभास पात्र राहील. तालुका कृषी अधिकारी यांनी अशा अर्जदारांचे अर्ज पूर्वसंमतीकरिता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी पूर्वसंमती दिल्यानंतर संबंधित लाभार्थ्यास बांधकाम सुरु करण्याबाबत कार्यारंभ आदेश द्यावेत. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बँक प्रतिनिधी व मंडळ कृषी अधिकारी यांच्या संयुक्त मोका तपासणी अहवालाच्या आधारे लाभार्थ्यास अनुज्ञेय होणारे अनुदान त्याच्या राष्ट्रीयकृत बँक कर्ज खात्यावर वर्ग करावे. दिलेल्या लक्षांकानुसार आर्थिक वर्षात गोदाम बांधकाम पूर्ण होण्याचे दृष्टीने वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करावी.

- **गोदाम बांधकामाबाबत करावयाची कार्यवाही :**

अ) लाभार्थी निवडीसाठी वर्तमानपत्रात व्यापक प्रसिद्धी देवून अर्ज मागवावेत.

ब) तालुका कृषी अधिकारी यांनी याबाबीसाठी इच्छूक लाभार्थ्यांचे अर्ज महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिका-यांकडून अथवा सार्वजनीक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाइन्स, स्पेसिफिकेशन्स व खर्चाच्या अंदाजपत्रकासह जि.अ.कृ.अ. यांचे शिफारसीने वि.कृ.स.सं. यांना सादर करावेत.

क) लाभार्थी निवड एप्रिल - में महिन्यात करावी. लक्षांकाच्या तुलनेत जास्त अर्ज आल्यास सोडत पद्धतीने निवड करावी.

ड) वखार महामंडळाच्या तांत्रिक निकषाप्रमाणे लाभार्थ्याने जागेची निवड करावी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी गोदाम बांधकामापुर्वी जागेस भेट देऊन खात्री करावी व फोटोग्राप्स घ्यावेत.

इ) शासनाच्या सर्व योजनामधून या बाबीसाठी एकाच योजनेचा एकदाच लाभ घेता येईल. **लाभाची द्विरुक्ती होणार नाही** याची जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी खात्री करावी. **एका बाबीवर दोन योजनेतून अनुदान घेता येणार नाही तसे आढळल्यास सदर बाब गंभीर समजून देणारा व घेणारा यांचेवर कडक कार्यवाही करण्यात येईल**.

ई) वखार महामंडळाच्या तांत्रिक निकषाप्रमाणे डिझाईन, स्पेसिफिकेशन, खर्चाचे अंदाज पत्रकाप्रमाणे बांधकाम आर्थिक वर्षात पूर्ण करणे बंधनकारक राहील. अपूर्ण बांधकामास पुढील आर्थिक वर्षात अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

प) अपूर्ण बांधकाम, मंजूर डिझाईन, स्पेसिफिकेशन मध्ये बदल करून बांधकाम केल्यास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

फ ) गोदामाचा वापर शेतक-यांनी उत्पादीत केलेला कृषिमाल साठवणुकीसाठी शेतक-यांना योग्य व माफक दरात करावा. याबाबत रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड हमीपत्र घ्यावे, त्यात गोदाम वापरामध्ये गैरवापर आढळल्यास अनुदानाची रक्कम व्याजासहीत वसुल केली जाईल याचा स्पष्ट उल्लेख करावा.

ग) जि.अ.कृ.अ. यांनी गोदाम बांधकामास भेटी देऊन कामाची प्रत्यक्ष पाहणी करावी फोटोग्राप्स घ्यावेत.

घ) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पुर्तता अहवाल (Completion Report) व फोटोग्राप्स घ्यावेत.

त) गोदामाच्या उद्देशाप्रमाणे त्याचा वापर अन्नधान्य सुरक्षित साठवणुकीसाठी करणे बंधनकारक राहील.

थ) अन्नधान्यांचे साठवणुकी सुविधेअभावी नुकसान होऊ नये म्हणुन संबंधितांना कृषि विज्ञान केंद्रामार्फत प्रशिक्षण द्यावे.

द) गोदाम भाडे तत्त्वावर द्यावयाचे झाल्यास संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीने ता.कृ.अ.यांचे सल्ल्याने कार्यपध्दती विकसीत करावी.

ध) अन्नधान्य साठवणुकीबाबतचा त्रैमासीक अहवाल, तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.

न) साठवलेल्या मालाची विक्री करण्यासाठी आत्मा/पणन विभागाचे मार्गदर्शन घ्यावे.

य) गोदामासाठी अग्निशमन व्यवस्था आसावी व दर्शनी भिंतीवर सिमेंट कॉक्रीटमध्ये खालीलप्रमाणे कोरीव बोर्ड असावा

महाराष्ट्र शासन

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान वर्ष सन २०१८-१९**

शेतकरी उत्पादक कंपनीचे नाव:- ............................... बांधकाम पुर्ण झाल्याचा दिनांक: ...........

एकुण खर्च : रु. ............../- अनुदानाची रक्कमः रु. .............../-

र) गोदाम बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी व बँकेच्या अधिका-यांनी मोका तपासणी करावी आणि तद्नंतर जि.अ.कृ.अ. यांनी अनुदानाची रक्कम लाभधारकाचे गोदामासाठी घेतलेल्या कर्ज खात्यावर जमा करावी.

ल) गोदामाचे बांधकामापूर्वी व बांधकामानंतर Geotagging करणे बंधनकारक राहील.

### ९.५ मूल्यवर्धनासाठी स्थानिक वाणांचे प्रात्यक्षिके व प्रक्रिया -

भात पिकाचे काही स्थानिक वाणास त्याचे गुणवैशिष्ठ्यांमुळे चांगला बाजारभाव मिळतो. अशा वाणाचे उत्पादकता वाढविण्यासाठी पिक प्रात्यक्षिके तसेच प्राथमिक प्रक्रिया (पोहे, खीर इत्यादी) व विक्रीसाठी प्रती हेक्टरी किंमतीच्या ५० टक्के रु. ४५००/- पर्यंत अनुदान ठेवण्यात आलेले आहे. यामध्ये स्थानिक वाण (जसे तुमसरसाळ, तांबसाळ किंवा इतर) जे त्यांच्या गुणवैशिष्ठ्यांमुळे प्रसिद्ध आहेत व त्यांना चांगला भाव मिळतो अशा वाणांची कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्राच्या सहाय्याने प्रात्यक्षिके घेण्यात यावीत, तसेच त्याची प्राथमिक प्रक्रिया व पॅकिंगसाठी एकूण रु. ४५००/- अनुदान उपलब्ध आहे. स्थानिक गरजेनुसार याचे पॅकेज करण्यात यावे व शेतकऱ्यांना पिक प्रात्यक्षिक ते विक्री व्यवस्थापन पर्यंत मार्गदर्शन करण्यात यावे जेणेकरून शेतकऱ्यांचे उत्पन्नामध्ये भर पडेल. ठरविलेले पॅकेज, वाण इत्यादीची माहिती कृषी आयुक्तालयास सादर करावी. तसेच तद्नंतर आलेले उत्पन्न व शेतकऱ्यांना मिळालेला बाजारभाव याचीही माहिती कृषी आयुक्तालयास सादर करावी.

वरील बाबींपैकी स्थानिक गरजेनुरुप केवळ आवश्यक बाबींची उपलब्ध आर्थीक मर्यादेत निवड करुन त्यांची अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानामध्ये समाविष्ट उपरोक्त घटकांची अंमलबजावणी मंजूर लक्षांकास अनुसरून करावयाची आहे. कोणत्याही परिस्थितीत क्षेत्रिय स्तरावरून घटकांतर्गत तरतुदीमध्ये बदल करणेत येऊ नये.**

### १०. अभियान अंमलबजावणीसाठी तपासणी :-

संदर्भ ४ अन्वये शासनाने निर्देशित केलेप्रमाणे लाभार्थ्यांच्या यादीनुसार सर्व लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतावर हाती घेण्यात आलेल्या कार्यक्रमाची प्रत्यक्ष तपासणी संबंधित गावातील कृषी सहाय्यकांनी करायची असून आपला अहवाल तालुका कृषी अधिकाऱ्यामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे. विविध स्तरावर खर्चाच्या तपासणीची टक्केवारी खालीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | स्तर | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सहसंचालक | ०.५ |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ |
| ३ | उपविभागीय कृषि अधिकारी | ५ |
| ४ | तालुका कृषि अधिकारी | २५ |
| ५ | मंडल कृषि अधिकारी | ५० |
| ६ | कृषि पर्यवेक्षक/ कृषि सहाय्यक | १०० |

प्रत्येक महिन्यात विभागीय कृषि सहसंचालक यांनी किमान एका क्लस्टरला भेट दयावी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ३ क्लस्टरला भेट दयावी. कृषि उपसंचालक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील ५० टक्के क्लस्टरला भेटी दयाव्यात. भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांनी निविष्ठा पुरवठा व इतर कार्यक्रमांचा आढावा घ्यावा. भेट नोंदवहीमध्ये तशी नोंद करावी व शेऱ्यामध्ये सूचना लिहाव्यात.

### ११. <u>अभियानाचे सनियंत्रण व मूल्यमापन</u> :-

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत भात, गहू, कडधान्य, भरडधान्य व पौष्टीक अन्नधान्य कार्यक्रमामध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची प्रवर्गनिहाय माहिती केंद्र शासनाच्या http://www.nfsm.gov.in या वेबसाईटवर तसेच कृषी विभागाच्या MIS मध्ये ऑनलाईन वेळेत भरण्याची जबाबदारी तंत्र सहाय्यक-१ यांनी राहील.
- अभियानाच्या मासिक प्रगतीचा अहवाल आयुक्तालयाने विहित केलेल्या प्रपत्रात प्रवर्गनिहाय दर महिन्याच्या दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा.
- संदर्भ क्र. ७ अन्वये शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे घटकनिहाय, प्रवर्गनिहाय लाभार्थी यादी संकेत स्थळावरती भरणे बंधनकारक असल्यामुळे अपूर्ण माहिती असल्यास पुढील निधीचे वितरण केले जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

• राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत गावनिहाय वाटप केलेल्या निविष्ठा, प्रात्यक्षिके व इतर दिलेले लाभ याबाबतची माहिती लाभार्थ्यांच्या यादीसह ग्रामपंचायतीकडे पाठवून सदरील माहिती ग्रामसभेत जाहीर करावी.

• अभियानांतर्गत राबविलेल्या सर्व घटकांमुळे प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या उत्पादकतेवर दिसून आलेल्या परिणामांचे मूल्यमापन करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल उपविभागीय कृषी अधिकारी यांनी हंगामाच्या अखेरीस आयुक्तालयास सादर करावा.

• अभियानांतर्गत शेतकऱ्यांनी/गटांनी उत्कृष्टपणे राबविलेल्या कार्यक्रमाच्या यशोगाथा छापील / डिजिटल स्वरुपात तयार करून आयुक्तालयास सादर कराव्यात. यासाठी अभियानातील प्रशिक्षण व संकीर्ण बाबीखालील तसेच कृषी विभागाने इतर योजनांमध्ये उपलब्ध करून दिलेल्या निधीचा वापर करावा.

**सोबत - वरीलप्रमाणे**

अभियान संचालक (राअसुअ) तथा
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत -

१. मा. अपर मुख्य सचिव (कृषी व पणन), मंत्रालय, मुंबई ३२, यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. कृषी उपसंचालक, मा. आयुक्त कृषी कक्ष, महाराष्ट्र शासन, पुणे.
३. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस, तिसरा मजला, प्रभादेवी, मुंबई-६५
४. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ महाबीज, कृषिनगर अकोला
५. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समिती, सर्व
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
७. संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण, कृषी आयुक्तालय, पुणे
८. संचालक, आत्मा, कृषी आयुक्तालय, पुणे
९. संचालक, कृषी नियोजन व प्रक्रिया, कृषी आयुक्तालय, पुणे
१०. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषी आयुक्तालय, पुणे
११. संचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, पुणे
१२. संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा-अहमदनगर.
१३. संशोधन संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
१४. संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
१५. संशोधन संचालक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
१६. विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, मार्केट यार्ड, पुणे.
१७.. विभागीय विक्री व्यवस्थापक, हिंदुस्तान इन्सेक्टीसाइड लि. , मलकापूर, अकोला
१८. विभागीय कृषि सहसंचालक, सर्व
उपरोक्त दिलेल्या सूचनांनुसार आपल्या विभागात कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करावे.
१९. प्रकल्प संचालक, आत्मा, सर्व

**मार्गदर्शक सूचना**

जा.क्र.कृआ/नपि/विप्र-३/कृप/राअसुअ-ऊस/३३४/२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००५
दिनांक ३१/०५/२०१८

प्रति,

१) **विभागीय कृषि सह संचालक,** औरंगाबाद / लातूर

२) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,** औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली

**विषय : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०१८-१९ मार्गदर्शक सूचना . . .**

संदर्भ - १. केंद्र शासनाचे पत्र जा.क्र.एफ क्र. ३-१/२०१७/सीयु-४, दि. २८.०२.२०१८ (अॅलोकेशन)

२. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.सीओए/विप्र-३/एनएफएस-सीसी/शुगरकेन/एपी/१५१/२०१८, दि. २०.०३.२०१८ (लक्ष्यांक कळविणे)

३. कृषि आयुक्तालयाचे पत्र कृउस/विप्र३/राअसुअ-ऊस/एपी १८-१९/१०८, दि. ३.०३.२०१८

४. केंद्र शासनाचे पत्र जा.क्र.एफ क्र. २-१/२०१५/सीयु-४, दि. ०३.०५.२०१८ (केंद्राची प्रशा. मान्यता)

५. शासन निर्णय क्र. ०४१८/प्र. क्र. १५५/१४-अे, दि. २७.०४.२०१८ (उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहिम)

६. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र. ३१/१७-अे, दि. १९.०४.२०१७ (डीबीटी)

७. शासन निर्णय क्र. सुकृओ-२०१६/प्र.क्र. ३०१/११-अे, दि. २१.०१.२०१७ (डीबीटी)

८. कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक जा.क्र.आकृकक्ष/सुधारित मापदंड/२६६/दि.९.०५.१८ (तपासणी मापदंड)

९. शा.नि.क्र.एपी-२०१८/प्र.क्र.४६/४ए, दि.२३.०५.२०१८

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम सन २०१४-१५ पासून राबविण्यात येत आहे. संदर्भिय पत्र १ अन्वये केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०१८-१९ राबविण्यासाठी रु. ४३८.७२ लाखाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्यासाठी दर्शविला आहे. त्यानुसार संदर्भ २ अन्वये वार्षिक कृती आराखडा सन २०१८-१९ साठी प्रस्तावित करण्यात आला. दरम्यान संदर्भ ३ अन्वये जिल्हानिहाय, घटकनिहाय भौतिक व आर्थिक कार्यक्रमासह प्रस्तावित कार्यक्रम पूर्वतयारीसाठी आपल्या कार्यालयास पाठविण्यात आला आहे. केंद्र शासनाने सन २०१८-१९ करिता नविन घटकांच्या अंतर्भावासह आणि अर्थसहाय्यातील बदलासह प्रस्तावित कार्यक्रम कळवून स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाच्या कार्यक्रमांतर्गत कृषि विद्यापीठांच्या सहकार्याने घ्यावयाचे घटक काही घटक प्रस्तावित करावयाचे असल्यास त्याबाबत कळविण्यात आले होते.

संदर्भ ३ अन्वये प्रस्तावित कृती आराखड्यास केंद्र शासनाने संदर्भ ४ च्या पत्रान्वये सदर कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ करीता ऊस पिकासाठी केंद्र:राज्य ६०:४० टक्के यानुसार केंद्र हिस्सा रु.२६३.२३ लाख आणि राज्य हिस्सा रु. १७५.४९ लाख अशा एकुण रु.४३८.७२ लाख रक्कमेच्या कार्यक्रमास प्रशासकिय मान्यता प्रदान केली आहे.

सदर कार्यक्रमास संदर्भ ९ च्या शासन निर्णयान्वये राज्यशासनाची प्रशासकिय मान्यता प्राप्त झालेली असून त्याच्या अधिन राहून योजना अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचना पुर्वतयारीसाठी निर्गमित करण्यात येत आहेत.

सन २०१८-१९ करीता योजनेंतर्गत संदर्भ २ अन्वये जिल्हानिहाय, घटकनिहाय कार्यक्रम कळवून तालुकानिहाय कार्यक्रम प्रस्तावित करण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र जिल्ह्यांकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्याने आता जिल्ह्यानिहाय कळविण्यात आलेल्या लक्ष्यांकाच्या अनुषंगाने उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहीमेच्या निकषानुसार जिल्ह्यातील कमी उत्पादकता असलेल्या तालुक्यात आणि तालुक्यातील मंडळात जिल्हास्तरावरुन लक्ष्यांक निश्चित करुन देण्यात यावेत. सुक्ष्म मुलद्रव्य ही बाब निवडलेल्या शेतक-यांनी माती परिक्षण आणि जमिन आरोग्य पत्रिकेतील शिफारशीनुसार स्वखर्चाने राबवायची आहे.

त्याप्रमाणे कार्यक्रम राबवण्याबाबत क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. **संदर्भ ५, ६ व ७ च्या शासन निर्णयातील सूचनांचा पीक प्रात्यक्षिके आयोजित करताना अवलंब करावा.** योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या शेतक-यांना प्रात्यक्षिकासाठी लागणा-या कृषि निविष्ठा या प्राधान्याने महाबीज, राष्ट्रीय बीज

निगम, कृषि विद्यापिठे, शासकीय जैविक प्रयोगशाळा (बियाणे व जैविक खते व औषधे इ.) या शासकीय संस्थांमार्फत शेतक-यांनी खरेदी प्रथम येणा-यास प्राधान्य या तत्वावर आणि संस्थेस रक्कम अदा करुन कृषि निविष्ठा त्वरित उचलण्याबाबत कळवावे. या निविष्ठांव्यतिरिक्त अन्य निविष्ठांची लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने खरेदी करावी व त्यानंतर गटातील शेतक-यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट अनुदान जमा करावे. कृषि विभागामार्फत शेतक-यांना कीटकनाशके, खते, औषधे इ. ची 'जेनेरिक' नावाने शिफारस करण्यात यावी.

राज्यातील शेतक-यांचे उत्पन्न सन २०२२ पर्यंत दुप्पट करण्याच्या उद्देशाने सन २०१७-१८ पासून राज्यात **"उन्नत शेती-समृध्द शेतकरी"** मोहीम राबविण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना संदर्भ ५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या असून त्यानुसार खरीप हंगामापासून अंमलबजावणीचे दृष्टीने सूक्ष्म नियोजन आपल्या स्तरावर केले असेलच. योजनेचे भौतिक व आर्थिक लक्ष्यांक प्रपत्र १ (जिल्हानिहाय) सोबत सहपत्रित केले आहेत.

परिशिष्ट १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे तिमाही अहवाल (लाभार्थी विगतवारीसह) तिमाही संपताच तर परिशिष्ट २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मासिक प्रगती अहवाल दर महिन्याच्या ५ तारखेस सादर करण्यात यावेत.

सोबत : वरीलप्रमाणे

**(विजय घावटे)**
**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.अपर मुख्य सचिव, कृषि, महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई -३२.
२) मा. मंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक.
३) मा. राज्यमंत्री, कृषि, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२ यांचे स्वीय सहाय्यक.
४) मा. अवर सचिव, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान कक्ष, कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई ३२

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) संचालक, (नि व गु.नि) , आयुक्तालय,म.रा.पुणे-१
२) संचालक, (फलोत्पादन), आयुक्तालय,म.रा.पुणे-५
३) व्यवस्थापकिय संचालक, छोट्या शेतक-यांचा कृषि व्यापार संघ, कृषि आयुक्तालय, म.राज्य, पुणे-५

**प्रतिलिपी :** सस्नेह सादर.

१) मा.आयुक्त साखर, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे- ५
२) मा. कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
३) मा. कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४) मा. कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर
५) मा. **जिल्हाधिकारी** १)औरंगाबाद २) जालना ३) बीड ४) लातूर ५) उस्मानाबाद ६) नांदेड ७) परभणी ८) हिंगोली
६) **संचालक (कृषि संशोधन व विस्तार),वसंतदादा** साखर संस्था, मांजरी बुद्रुक, ता. हवेली,जि.पुणे
७) **ऊस पैदासकार,** १) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
२) वसंतराव नाईक , मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
३) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर
८) **कार्यकारी संचालक,** म.रा. सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई ४०० ०२५.
९) **कार्यकारी संचालक,** वेस्टर्न इंडियन शुगर मिल असो.पुणे-५.
१०) **ऊस विशेषज्ञ,** मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव, ता.फलटण जि. सातारा.

११) **कक्ष अधिकारी,** ४-अे व २-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

१२) **कृषि उपसंचालक,** आयुक्त कक्ष / विप्र १ / नियोजन, कृषि आयुक्तालय, म.रा.पुणे

**प्रतिलिपी - कृषि उपसंचालक, (औजारे/किना, गुनि-५),** कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-१ यांना सहपत्रासह माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

२/- यांना कळविण्यात येते की, स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाचे घटक अंतर्गत शुगरकेन श्रेडर या यंत्रासाठी केंद्र शासनाने सन २०१८-१९ करिता रक्कम ७१.२५ लाख निधी मंजूर केला आहे. करिता सदर कार्यक्रम राज्यात राबविण्यासाठी कृषि यांत्रिकीकरण अंतर्गत राबविण्यात येणा-या प्रक्रियेमध्ये (जसे ऑनलाईन अर्ज मागविणे, छाननी इ.) या कार्यक्रमाची व या घटकाची नोंद घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०१८-१९
## मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना**

ऊस हे महाराष्ट्रातील महत्वाचे नगदी पीक आहे. ऊसाच्या वाढीस लागणारे अनुकूल हवामान राज्यात उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य देशात साखर उत्पादन व साखर उता-याच्या बाबतीत आघाडीवर आहे. परंतु सरासरी प्रती हेक्टरी ऊस उत्पादन कमी आहे. त्यामुळे ऊस उत्पादन प्रगत तंत्रज्ञान जास्तीतजास्त शेतक-यांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन उत्पादन खर्च कमी केल्यास शेतक-यांना ऊस पिकातून शाश्वत उत्पन्न मिळु शकेल.

राज्यात सरासरी ९.०५ लाख हेक्टर क्षेत्र उस पिकाखाली असुन या पिकाची सरासरी उत्पादकता ८१ मे.टन प्रती हेक्टर आहे. ऊस पिकाचा उत्पादन खर्च कमी करुन उत्पादकतेत ८७ मे.टनापर्यंत वाढ करण्याच्या दृष्टीने सन २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाअंतर्गत ऊस विकास कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे.

**अभियानाची उद्दिष्टे**

- ऊसाच्या उत्पादन खर्चात कपात करुन उत्पादकता वाढविणे.
- दर्जेदार बेण्याच्या वापरास प्रोत्साहन देणे यासाठी वसंतदादा साखर संस्था यांच्या मार्फत उती संवर्धित बेणे निर्मिती करुन शेतकऱ्यांना अनुदानावर उपलब्ध करुन देणे.
- तंत्रज्ञान प्रसारासाठी अधिकारी, शेतकरी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे.
- विकसित तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी क्षेत्रिय स्तरावर आंतरपीकाची प्रात्यक्षिके आयोजित करणे.

स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाच्या कार्यक्रमास प्रोत्साहन देणे.

**योजनेत अंतर्भूत जिल्हे -** ही योजना राज्यातील ऊस उत्पादक विभागामधील खालील प्रमुख ८ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | १) औरंगाबाद २) जालना ३) बीड |
| २ | लातूर | ४) लातूर ५) उस्मानाबाद ६) नांदेड ७) परभणी ८) हिंगोली |

सदर जिल्ह्यातील ऊस पिकाचे क्षेत्र व उत्पादकता वृध्दीच्या उद्देशाने अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**अभियान अंमलबजावणीचे वेळापत्रक**

| अ. क्र. | कार्यवाहीचा तपशील | अंतिम तारीख | |
|---|---|---|---|
| | | पूर्वहंगामी ऊसासाठी | आडसाली ऊसासाठी |
| १ | प्रकल्प निवड व प्रकल्प आराखडा तयार करणे | १५ सप्टेंबर | १५ जुन |
| २ | गटांची निवड (शक्यतो कारखाना प्रक्षेत्रातील) | २० सप्टेंबर | २० जुन |
| ३ | गटांची सभा- कार्यक्रम नियोजन व गटाच्या/ लाभार्थ्यांच्या जबाबदाऱ्या | २० ते २५ सप्टेंबर | २० ते २५ जुन |
| ४ | पीक प्रात्यक्षिकांसाठी लाभार्थी निवड | २० ते २५ सप्टेंबर | २० ते २५ जुन |
| ५ | बियाणे, बीजप्रक्रिया व पेरणीपूर्व आवश्यक निविष्ठा मागणी | १० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर | १० जुलै ते १० ऑगस्ट |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | इतर निविष्ठांची मागणी | ३० सप्टेंबर | ५ जून |
| ७ | हंगामपूर्व अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण | ५ सप्टेंबर | १५ ते २५ जुन |
| ८ | बियाणे व पेरणीपूर्व आवश्यक निविष्ठा पुरवठा | १० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर | १० जुलै ते १० ऑगस्ट |
| ९ | इतर निविष्ठा पुरवठा | १५ ऑक्टोबर | ५ जुलै |
| १० | स्थानिक गरजेनुरुप कार्यक्रमांतर्गत-शुगरकेन श्रेडर घटकासाठी निवडलेल्या लाभार्थीस पुरवठा / लाभार्थीकडून प्रापण | २० ऑक्टोबर | ३१ जुलै |
| ११ | शेती दिनाचे आयोजन करणे | १५ नोव्हेंबर | १५ सप्टेंबर |
| १२ | क्षेत्रिय तपासणी तसेच अंतिम निवडलेल्या लाभार्थींची माहिती वेबसाईटवर भरणे | ५ डिसेंबर | ३१ ऑक्टोबर |
| १३ | पीक कापणी व उत्पादन अहवाल संकलन | १५ ऑक्टोबर ते १५ जानेवारी | १० जानेवारी ते १५ मार्च |
| १४ | यशोगाथा सादर करणे | १० एप्रिल | १० एप्रिल |

टीप : सदर वेळापत्रक पथदर्शी असून स्थानिक परिस्थितीनुरुप कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार अंशतः बदल संभवतो.

➢ **तालुका निवड** -

१. राज्याच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा कमी उत्पादकता असलेल्या जिल्ह्यांची आणि त्यातील तालुक्यांची निवड या कार्यक्रमात करावयाची आहे. **तालुकानिहाय उत्पादकता वाढीचे लक्ष्यांक उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहिमेच्या शासन निर्णयानुसार ठरवून दिल्याप्रमाणे जिल्ह्यातील सांख्यिकी विभागाच्या तालुकानिहाय तपशिलानुसार निर्धारित करावेत.** त्यानुसार जिल्ह्याने तालुकानिहाय लक्ष्यांक निश्चित करुन कृषि आयुक्तालयास कळवावी. तालुक्यातील प्रकल्प क्षेत्र निवडताना त्या तालुक्यातील सर्वात कमी उत्पादकता असणा-या मंडळाची निवड करुन प्रकल्प राबवावा.

२. जिल्ह्यातील अनुसुचित जाती (किमान १६ टक्के)/ अनुसूचित जमाती (किमान ८ टक्के)/यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करावी. तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थींच्या ३० टक्के महिलांची निवड करावी. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबविताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात यावा.

➢ **प्रकल्प आखणी**

सन २०१८-१९ चा कार्यक्रम १० हेक्टरचा एक या प्रमाणे लघु प्रकल्पाच्या (क्लस्टर) स्वरुपात राबविणे बंधनकारक राहील. त्यानुसार लघु प्रकल्प आराखडा तयार करावा. या प्रकल्पाचे उदीष्ट व त्यावरुन जो परिणाम अपेक्षित आहे यांची नीट मांडणी करुन लघु प्रकल्प तयार करण्यात यावे. निवड केलेल्या क्षेत्राच्या पायाभूत सर्वेक्षणाचे (बेसलाईन सर्वे) काम पूर्ण करुन सोबत सहपत्रित केलेल्या विहित प्रपत्रात माहिती भरुन प्रकल्पातील उत्पादकतेच्या लक्ष्यांकासह प्रकल्प आराखडा तयार करुन त्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मान्यता प्रदान करावी. निवड करण्यात आलेल्या प्रकल्प क्षेत्राची निवड इतर कोणत्याही योजनेमध्ये/प्रकल्पामध्ये करु नये. जर प्रकल्प क्षेत्राची एका पेक्षा जास्त प्रकल्पांमध्ये निवड केल्याचे आढळून आल्यास प्रकल्पाचा संपूर्ण खर्च वसूल पात्र राहील. तसेच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे, याचा प्रगती अहवाल साध्य झालेली उत्पादकता, पीक कर्जाचे स्केल ऑफ फायनान्स या अनुषंगाने तयार करण्यात यावा. तसेच विविध बाबी राबवितांना पीक वाढीच्या विविध अवस्थेतील फोटोसहीत यशोगाथा तयार करावी.

➢ **योजनेमध्ये राबविण्यात येणारे घटक**

१. एक डोळा आणि/पट्टा पध्दतीचा अवलंब करुन पट्टा पध्दतीने आंतरपीकाची प्रात्यक्षिके आयोजित करणे

२. ऊती संवर्धित रोपे तयार करुन अनुदानावर वाटप करणे

३. राज्यस्तरीय प्रशिक्षण

४. स्थानिक पुढाकाराच्या बाबी अंतर्गत शुगरकेन श्रेडरचा वापर

➢ **एक डोळा आणि/पट्टा पध्दतीचा अवलंब करुन पट्टा पध्दतीने आंतरपीकाची प्रात्यक्षिके आयोजित करणे**

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, कृषि विद्यापीठे व संशोधन संस्थांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रात्यक्षिके हे कृषि विस्ताराचे एक प्रभावी माध्यम आहे. ऊस लागवडीमध्ये योग्य हवामान, योग्य जमिनीचा वापर, दर्जेदार बेण्याचा वापर, बीज प्रक्रिया, एक डोळा आणि/पट्टा पध्दत, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, आंतरपीक, सिंचन व्यवस्थापन, सूक्ष्म मूलद्रव्याचा वापर, इ. तंत्रज्ञानाचा अवलंब करुन ऊस पिकाची उत्पादकता वाढविणे शक्य आहे. त्यासाठी विकसित तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रात्यक्षिके आयोजित करावीत.

सदर कार्यक्रमांतर्गत वरीलप्रमाणे विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयाने कृषि विद्यापीठाच्या सहकार्याने निश्चित केलेल्या बाबींवर रुपये ८०००/- प्रती हेक्टर मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात यावे. निश्चित केलेले पॅकेज कृषि आयुक्तालयास कळविण्यात यावे.तसेच उर्वरित रुपये १०००/- प्रती हेक्टर इतकी तरतुद आकस्मिक खर्चासाठी आहे. सदर तरतुद शेती दिनाचे आयोजन आणि इतरबाबींवर खर्च करण्यात यावी.

➢ **पीक प्रात्यक्षिके**

सदर कार्यक्रमांतर्गत पीक प्रात्यक्षिके आयोजित करण्याबाबत सर्वसाधारण सूचना खालीलप्रमाणे आहेत.

राज्यातील विविध पिकांची उत्पादकता वाढविण्याच्या हेतूने तंत्रज्ञान प्रसाराचे साधन म्हणून पीक प्रात्यक्षिके शेतक-यांच्या शेतावर आयोजित करण्यात येतात. यापुर्वी पीक प्रात्यक्षिकांसाठी लागणा-या निविष्ठा शासनामार्फत खरेदी करुन लाभार्थ्यांस पुरवठा करण्यात येत होत्या तसेच, प्रात्यक्षिकाचे क्षेत्र किमान १०० हेक्टर असल्याने मोठ्या प्रमाणावर विखुरलेल्या स्वरुपात प्रात्यक्षिके घ्यावी लागत होती. विखुरलेल्या स्वरुपातील या मोठ्या क्षेत्रावर पोहोचण्यास कृषि सहाय्यकांना शक्य होत नव्हते. परिणामी, सर्व शेतक-यांसोबत नियमित संवाद साधणे व तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रात्यक्षिकांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. पीक प्रात्यक्षिक १० हेक्टर क्षेत्रावर घेण्यात यावे व हे क्षेत्र शक्यतो सलग असावे.
२. पीक प्रात्यक्षिकाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कृषि सहाय्यकाची राहील.
३. निवड केलेल्या मंडळात सदर योजनेंतर्गत एकच पीक प्रात्यक्षिक घेता येईल. संबंधित कृषि सहाय्यकाच्या पर्यवेक्षकांनी दर १५ दिवसाला पीक प्रात्यक्षिकांना नियमितपणे भेट द्यावी व शेतक-यांना मार्गदर्शन करावे. तसेच कृषि सहाय्यकांना पुढील भेटीपर्यंत प्रात्यक्षिकांतर्गत करावयाच्या कामांबाबत सूचना द्याव्यात आणि भेटीवेळी झालेल्या कामाचे मुल्यमापन करुन आपला अहवाल वरीष्ठ कार्यालयास नियमितपणे सादर करावा. संबंधित मंडळ कृषि अधिका-यांनी १५ दिवसातून एकदा किमान एका पीक प्रात्यक्षिकास भेट द्यावी व आपला अहवाल प्रपत्र २ मध्ये सादर करावा. तालुका कृषि अधिका-यांनी दर महिन्याला जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांना पीक प्रात्यक्षिकाचा अहवाल सादर करावयाचा आहे.

प्रपत्र २

कृषि उन्नती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम सन २०१८-१९

एक डोळा आणि/पट्टा पध्दतीचा अवलंब करुन पट्टा पध्दतीने आंतरपीकाची प्रात्यक्षिके अंतर्गत ऊस व आंतरपिक (हरभरा) उत्पादकता स्वतंत्रपणे नमुद करावी.

| अ.क्र. | बाब | तालुका | प्रात्यक्षिकाखालील क्षेत्र | उत्पादकता (किलो/हे.) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रात्यक्षिक प्लॉट | | तुलनात्मक प्लॉट |
| | | | | ऊस | आंतरपीक | |

४. विभागातील प्रत्येक अधिका-याने किमान एक प्रात्यक्षिक दत्तक घ्यावे. सदर प्रात्यक्षिकास नियोजनापासून आंतरपीक - हरभरा काढणी तसेच ऊसाची तोडणी होईपर्यंत दर महिन्याला एक भेट देऊन योग्य ते मार्गदर्शन करावे. याबाबतचा अहवाल वरीष्ठ कार्यालयास सादर करावा.

५. तालुक्यातील ऊस पिकाची सरासरी उत्पादकता, राज्यात काही शेतक-यांनी ऊस पिकात मिळविलेली उच्चतम उत्पादकता आणि ऊसाची विद्यापीठाने ठरवून दिलेली अनुवंशिक उत्पादनक्षमता (जेनेटिकल पोटेंशियल) यामध्ये मोठी तफावत आहे. ही तफावत कमी करुन पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी स्थानिक कृषि हवामान पध्दतीचा विचार करुन संबंधित कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ऊस आणि आंतरपिकासाठी कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञाने (संचालक, संशोधन/संचालक, विस्तार) आधुनिक तंत्रज्ञान निश्चित करुन विभागीय कृषि सहसंचालकांना द्यावे. विभागीय कृषि सहसंचालकांनी या कामी कृषि विद्यापीठ, कृषि विभागाचे क्षेत्रिय अधिकारी व अन्य संस्थांशी समन्वय साधून तंत्रज्ञान निश्चित करुन घ्यावे व हे तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने विस्तार कार्याचे तसेच पीक प्रात्यक्षिकांचे नियोजन करावे. तंत्रज्ञान निश्चितीसाठी ऊस पिकाचे उच्चतम उत्पादन घेतलेल्या शेतक-यांची देखील मदत घेण्यात यावी.

६. एकूण १० हेक्टर क्षेत्र असणा-या शेतक-यांचे समुह/गटामार्फत प्रात्यक्षिकांची अंमलबजावणी करण्यात यावी. गटामधील जे शेतकरी शासनाने ठरवून दिलेल्या तंत्रज्ञानाप्रमाणे पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यास तयार असतील अशा शेतकरी समुहांना लाभार्थी म्हणून निवडण्यात यावे. गावातील प्रात्यक्षिकांच्या संख्येपेक्षा अधिक गटांची इच्छुकता प्राप्त झाल्यास लाभार्थी गटाची लॉटरी पध्दतीने निवड करण्यात यावी. प्रत्येक शेतकरी गटात किमान १० शेतक-यांचा समावेश असणे बंधनकारक राहील. प्रत्येक शेतक-याला कमीतकमी एक एकर व जास्तीतजास्त एक हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत आर्थिक लाभ देण्यात यावा.

७. पीक प्रात्यक्षिकासाठी निवडण्यात आलेल्या शेतक-यांना वाटप केलेल्या मृद आरोग्य पत्रिकेआधारे अथवा ज्या ठिकाणी मृद आरोग्य पत्रिका उपलब्ध नसेल अशा ठिकाणी मृद तपासणी करुन त्या अहवालाप्रमाणे लागणा-या निविष्ठा निश्चित कराव्यात. सदर निविष्ठा संबंधित कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञ व संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांनी निश्चित कराव्यात. प्रात्यक्षिकासाठी लागणा-या निविष्ठा प्राधान्याने महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठे, शासकीय जैविक प्रयोगशाळा (बियाणे, खते व औषधे इ.) या शासकीय संस्थांमार्फत शेतक-यांनी खरेदी कराव्यात. या निविष्ठांव्यतिरिक्त अन्य निविष्ठांची लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातून त्यांच्या पसंतीने खरेदी करावी व त्या नंतर गटातील शेतक-यांच्या आधार सलग्न बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्यात यावे. लाभार्थी गटाने पीकनिहाय वितरण केलेल्या व वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात. कृषि विभागामार्फत शेतक-यांना कीटकनाशके, खते व औषधे इ. ची 'जेनेरिक नावाने' शिफारस करावी.

८. पीक प्रात्यक्षिके राबविताना कृषी विद्यापीठाने पीकनिहाय व पिकाच्या वाढीच्या अवस्थानुसार केलेल्या शिफारशींचा अवलंब करावा. तसेच रासायनिक खतांवरील खर्च कमी करण्यासाठी आयुक्तालयाचे दि. २३ मे २०१६ च्या **'पिकांचे उत्पादनावर परिणाम न करता उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपाययोजना'** बाबतच्या परिपत्रकातील सूचनांचा अवलंब करावा. प्रात्यक्षिक क्षेत्रामध्ये लाभार्थ्यांनी स्वखर्चाने केलेल्या अन्नद्रव्यांच्या प्रत्यक्ष वापराबाबतच्या नोंदी ठेवाव्यात.

९. जे शेतकरी सूक्ष्म सिंचनाचा वापर करतील, त्यांना विशेष प्राधान्य देण्यात यावे.

१०. पीक प्रात्यक्षिकाद्वारे कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाचा वापर तसेच कीड/रोग नियंत्रण, पिकात ओलावा राखणे व उत्पन्नात वाढ करणे इ. बाबी साध्य कराव्यात.

११. पीक प्रात्यक्षिकामध्ये वापरलेले तंत्रज्ञान या प्रात्यक्षिकामध्ये सहभागी नसणा-या राज्यातील इतर सर्व शेतक-यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रात्यक्षिकाचे शेतावर स्थानिक शेतक-यांच्या भेटीचे आयोजन करण्यात यावे.

१२. प्रत्येक पीक प्रात्यक्षिकाकरिता शेतकरी गटाच्या व कृषि पर्यवेक्षकांच्या उपस्थितीत शास्त्रोक्त पध्दतीने पीक कापणी प्रयोग घ्यावेत. त्याचबरोबर रँडम पध्दतीने कंट्रोल प्लॉटची निवड करुन तेथील उत्पादकतेच्या नोंदी ठेवाव्यात. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कृषि सहाय्यकांची व पर्यवेक्षकांची राहील. आणि याचे संपूर्ण सनियंत्रण तालुका कृषि अधिकारी यांनी करून पीक प्रात्यक्षिकांच्या उत्पादकतेची माहिती गावनिहाय / पीकनिहाय / महसूल मंडळनिहाय संकलित करावी. तालुक्यातील पीक प्रात्यक्षिकांच्या उत्पादकतेचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संकलित करुन कृषि आयुक्तालयास सादर करावा. सदर अहवाल ऊस

पिकाच्या तोडणीनंतर १५ दिवसामध्ये कृषि आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी. पीक प्रात्यक्षिकामध्ये पीक कापणी प्रयोगाचे प्रत्यक्ष आयोजन करुन पीक कापणीचा अहवाल सादर करण्याची प्राथमिक जबाबदारी कृषि सहाय्यकांची असल्याने त्यांनी विहित कालावधीत अहवाल सादर करावा.

१३. पीक प्रात्यक्षिकांतर्गत विहित केलेल्या कमाल देय मर्यादेच्या आतच अनुदान अनुज्ञेय राहील याची कृपया नोंद घ्यावी. प्रात्यक्षिकांसाठी खरेदी लाभार्थी गटाने स्वतः करावयाची असून अनुदान थेट बँक खात्यावर जमा करावयाचे असल्याने लाभार्थी हिश्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

१४. पीक प्रात्यक्षिकांसाठी आकस्मिक खर्चासाठी मंजूर रु. १००० प्रती हेक्टर ही तरतुद शेती दिन, प्रशिक्षण/प्रसिध्दी साहित्य, शास्त्रज्ञ व कृषि तज्ञ यांच्या भेटी व मार्गदर्शन व आकस्मिक खर्च इ. साठी खालीलप्रमाणे वापरावी.

- सप्टेंबर-नोव्हेंबर महिन्यामध्ये प्रात्यक्षिक प्लॉटवर शेतीदिनाचे आयोजन करून परिसरातील शेतकऱ्यांच्या भेटी घडवून आणाव्यात. शेती दिनास स्थानिक लोकप्रतिनिधींना बोलवावे. शेतीदिनासाठी प्रति हेक्टर रु. २५०/- या मर्यादेत खर्च करण्यात यावा. याद्वारे राबविलेल्या तंत्रज्ञानास व्यापक प्रसिद्धी द्यावी
- प्रशिक्षण/प्रसिद्धी साहित्यासाठी प्रति हेक्टर रु. २५० तरतूद असून सदर तरतूद लाभार्थ्याला शेतकरी मासिकाचे वर्गणीदार करण्यासाठी वापरावी. याबाबतचा अहवाल शेतकरी मासिक कार्यासनास व या कार्यासनास स्वतंत्रपणे पाठवावा. मात्र लाभार्थी शेतकरी मासिकाचा सभासद असल्यास अन्य स्वरुपाचे प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
- शास्त्रज्ञ व कृषितज्ञ यांच्या भेटी व मार्गदर्शनासाठी रु.३०० प्रति हेक्टर अनुदान अनुज्ञेय असून पेरणीपूर्व/पिकाचे वाढीच्या कालावधीमध्ये तसेच काढणीपश्चात कालावधीमध्ये प्रात्यक्षिक प्रकल्प क्षेत्रास कृषी विद्यापीठ/कृषी महाविद्यालय/ कृषी विज्ञान केंद्र/ कृषी संशोधन केंद्र येथील शास्त्रज्ञ यांच्या भेटी व लाभार्थ्यांशी संवाद घडवून आणावा. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाची नोंद कृषि सहाय्यकांनी क्षेत्रिय स्तरावरील नोंदवहीत करावी.
- उर्वरित रक्कम रु.२०० प्रति हेक्टर आकस्मिक खर्च-प्रात्यक्षिक नोंदवही इ. साठी खर्च करण्यात यावे.

१५. तालुका/ जिल्ह्यातील निवडक ३ यशोगाथा कृषि आयुक्तालयास सादर कराव्यात. त्यानुसार महत्वाच्या टप्यातील पिकाच्या वाढीच्या अवस्थेतील छायाचित्रे काढून पाठवावीत.

सर्व प्रात्यक्षिकांसाठी संबंधित कृषि सहाय्यक यांनी प्रात्यक्षिकांचे सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी प्रात्यक्षिकांना भेटी देऊन मार्गदर्शन करावे. प्रात्यक्षिके राबविण्याची संपूर्ण जबाबदारी कृषि सहाय्यकांची राहील व गावनिहाय संकलित केलेल्या पीक कापणी निरिक्षण अहवालाची एकत्रित नोंद मंडळस्तर एका स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे मंडळ कृषि अधिकाऱ्यांना बंधनकारक राहील. कृषि सहाय्यकांनी वर्षनिहाय नोंदवही प्रपत्र ३ नुसार ठेवावी. याबाबत तालुका कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची प्रशासकीय जबाबदारी राहील. प्रत्येक प्रात्यक्षिका शेजारी गुणात्मक तुलनेसाठी शेतकऱ्याने स्थानीक पध्दतीने घेतलेल्या तेवढ्याच क्षेत्राचा कंट्रोल प्लॉट निवडावा. दोन्ही क्षेत्राच्या पिकाच्या पेरणीपासून कालक्रमानुसार वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी बरोबरच त्यासाठी आलेल्या खर्चाची तारीखवार नोंद व दोन्ही क्षेत्रातून आलेल्या उत्पादनाची सांख्यिकी पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेऊन विश्लेषणात्मक नोंदी खालील प्रपत्रात ठेवाव्यात.

प्रपत्र ३

कृषि उन्नती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम सन २०१८-१९

कृषि सहाय्यक स्तरावरील पीक कापणी प्रयोग नोंदवही नमुना

एक डोळा आणि/पट्टा पध्दतीचा अवलंब करुन पट्टा पध्दतीने आंतरपीकाची प्रात्यक्षिके अंतर्गत ऊस व आंतरपीक (हरभरा) उत्पादकता (स्वतंत्रपणे) इ.ची नोंदवही

| सहभागी शेतकऱ्यांचे नाव व शेत गट क्र. | प्रात्यक्षिकातील क्षेत्र (हे.) | मिळालेले उत्पादन (टन./हे.) | किमान आधारभूत किंमतीनुसार मिळालेले उत्पन्न (रु./हे.) | | प्रात्यक्षिकातील मिळालेले निव्वळ उत्पन्न (रु./हे.) |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रात्यक्षिकातील | कंट्रोल प्लॉट | |
| | | | अ. ऊस<br>ब. आंतरपीक हरभरा | | |
| एकूण | | | | | |

वरीष्ठ अधिका-याने या नोंदवहीत तपासणी करुन दिनांकासहित अभिप्राय नोंदवून स्वाक्षरी करावी.

- प्रात्यक्षिकांचे अनुभवावरुन गावातील /जवळपासच्या क्षेत्रातील किती शेतक-यांनी तंत्रज्ञान अवलंब केला.
- त्यांची शेतकरी संख्या . . . . . व क्षेत्र . . . . . हेक्टर
- प्रात्यक्षिकास भेटी दिलेल्या शेतक-यांची संख्या . . . . . .
- सदर अभिलेख अभियानाच्या मुल्यमापनाचे वेळी उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

सदर कृषि सहाय्यकाची बदली झाल्यास नोंदवही रुजू होणा-या नवीन कृषि सहाय्यकाकडे वर्ग करावी. सदर अभिलेख कायमस्वरुपी (२० वर्ष) जतन करणे बंधनकारक राहील.

- ➢ तालुक्याची सरासरी उत्पादकता
- ➢ प्रात्यक्षिकासाठी निर्धारित उत्पादकता
- ➢ प्रात्यक्षिकात आलेली उत्पादकता

दहा हेक्टर प्रात्यक्षिकामधील एका शेतक-यांचा प्लॉटची रँडम पध्दतीने निवड करावी व शेतातील सांख्यिकी विभागाच्या पध्दतीचा वापर करुन पीक कापणी प्रयोग घेणे बंधनाकरक राहील. तसेच कृषि सहाय्यकांनी त्यांचेकडे घेतलेल्या प्रात्यक्षिकांचा सर्व शेतक-यांचा उत्पादनाचा अहवाल खालील प्रपत्रामध्ये जतन करावा व त्याची एक प्रत तालुका कृषि अधिका-यांना सादर करावी. तालुकास्तरावर प्रात्यक्षिकातील सर्व शेतक-यांचे या पीक कापणीत आलेल्या उत्पादनाचा पिकनिहाय अहवाल संकलित करावा व संकलित केलेला खरीप व रब्बीचा अंतिम अहवाल ( ऐच्छिक Excel sheet जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलित अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करुन विभागाचा संकलित अहवाल कृषि आयुक्तालयास ई-मेलद्वारे ddacashcrop@gmail. comसादर करावा.

कृषि उन्नती कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम सन २०१८-१९

पीक प्रात्यक्षिकातील उत्पन्न व खर्चाबाबतचा अहवाल (गावनिहाय तालुका)

| शेतक-यांचे नाव व शेत गट क्र. | एक डोळा आणि/पट्टा पध्दतीचा अवलंब करुन पट्टा पध्दतीने आंतरपीकाची प्रात्यक्षिके | प्रात्यक्षिक प्लॉटमधील एकुण खर्च (रु.) | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील एकुण खर्च (रु.) | प्रात्यक्षिक प्लॉटमधील उत्पादन (टन./हे.) | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील उत्पादन (टन./हे.) | बाजारभावानुसार मिळालेले उत्पन्न (रु./हे.) | | प्रात्यक्षिकातील मिळालेले निव्वळ वाढीव उत्पन्न (रु./हे.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रात्यक्षिकातील | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील | |
| | अ.ऊस | | | | | | | |
| | ब.आंतरपीक हरभरा | | | | | | | |

प्रत्येक पीक प्रात्यक्षिकाकरीता शेतकरी गटाच्या उपस्थितीत शास्त्रोक्त पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेऊन प्रात्यक्षिकांद्वारे साध्य करण्यात आलेल्या उत्पादकतेचा अहवाल संबंधित कृषि अधिकारी यांनी संकलित करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलित अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रपत्र २ मध्ये विभागास सादर करावा व त्याची प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी. **पीक कापणीनंतर १५ दिवसांमध्ये पीक कापणीचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.** विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागाचा संकलित अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**प्रात्यक्षिक अंमलबजावणीबाबत सर्वसाधारण सूचना**

- प्रात्यक्षिकासाठी आवश्यक सर्व निविष्ठांविषयी शेतक-यांना अवगत करावे, निविष्ठांची खरेदी उत्पादक गटाने वेळेत करणे बंधनकारक राहील. गटामार्फत खरेदी करण्यात आलेल्या तसेच शेतकरी लाभार्थीनिहाय वाटप केलेल्या निविष्ठांच्या नोंदी कृषि सहाय्यकाने प्रात्यक्षिक नोंदवहीमध्ये घ्याव्यात.
- लाभार्थी गटाने पिकनिहाय वितरण केलेल्या व वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी नोंदवहीत ठेवाव्यात.
- प्रात्यक्षिकांतर्गत प्रती हेक्टरी आर्थिक मर्यादेपेक्षा अधिकचा खर्च झाल्यास सदर खर्च संबंधित लाभार्थी गटाने करावा.

- प्राप्त निविष्ठांचा वापर नियोजित प्रात्यक्षिकांसाठीच केला जाईल व गैरवापर होणार नाही याबाबत खातरजमा करावी.
- लाभार्थी शेतकऱ्यांची यादी ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर जाहीर करावी तसेच केंद्र व राज्य शासनाच्या वेबसाईटवर भरावी.
- प्रात्यक्षिक प्लॉट शेजारी पारंपारीक पध्दतीवर आधारित तुलनात्मक प्लॉट घेण्यात यावा.
- प्रात्यक्षिके शक्यतो रस्त्यालगत तसेच, संबंधित गावातील जमिनीचा प्रकार / सुपिकता यांचे प्रातिनिधिक असावीत. प्रात्यक्षिकाचा फलक रस्त्याचा कडेला प्लॉटशेजारी दर्शनी भागात लावावा व त्यावर खालील माहिती नमुद करावी.

| राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ---------- पीक प्रात्यक्षिक' | | |
|---|---|---|
| १) समाविष्ट गावांचे नाव: | २) सहभागी शेतकरी संख्या: | ३) पीक व वाण: |
| ४) प्रात्यक्षिकाचा प्रकार: | ५) खत मात्रा: | ६) जैविक खते मात्रा: |
| ७) सूक्ष्म मुलद्रव्ये मात्रा: | ८) बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर: | ९) पेरणीची तारीख: |
| १०) शेतकरी गट प्रमुख व कृषि सहाय्यकाचे नांव व भ्रमणध्वनी संपर्क क्रमांक | | |

- अभियाना अंतर्गत प्रात्यक्षिकासाठी वितरीत करावयाच्या निविष्ठा संदर्भात मागणी, तपासणी व देयक अदायगी या अनुषंगाने संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या अद्ययावत मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
- कोणत्याही परिस्थितीत बियाणे विरहित पीक प्रात्यक्षिके न राबविण्याबाबत केंद्र शासनाच्या सूचना आहेत.

१६. पीक प्रात्यक्षिकाकरीता बियाणे:

- पीक प्रात्यक्षिकांसाठी आंतरपिकाच्या प्राधान्याने नविन अधिसुचित झालेल्या वाणांच्या प्रमाणित/सत्यप्रत बियाण्यास १०० टक्के अनुदान अनुज्ञेय राहील.
- महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठे यांचेकडील वाणनिहाय प्रमाणित बियाणे उपलब्धतेबाबत तपशील त्यांचे नजीकच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावा.
- स्थानिक कृषि हवामान परिस्थितीनुरुप संलग्न कृषि तज्ञांचे सल्ल्याने वरील १ व २ नुसार वाणांची निवड करुन त्यांची शेतकऱ्यांनी खरेदी करावी.

पीक प्रात्यक्षिकासाठी आंतरपिकाची शक्यतो १५ वर्षाच्या आतील प्रसारित संकरित/देशी वाणांचे प्रमाणित/सत्यप्रत बियाणे महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठ तसेच कृषि विज्ञान केंद्र यांचेकडून व बियाणे उपलब्धता विचारात घेऊन प्रात्यक्षिकांचे नियोजन करण्यात यावे.

- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी स्तरावरुन लक्षांकनिहाय लागणाऱ्या आंतरपीक व इतर बियाण्यांची मागणी पुरवठादार संस्थांना तात्काळ दयावी. बियाणे पुरवठादार संस्थांनी त्यांचे वितरकामार्फत प्रमाणित/सत्यप्रत बियाणे वाटप करावयाचे आहे. मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी (नोडल अधिकारी) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या याद्या संबधित वितरकाकडे द्याव्यात. बियाणे खरेदी निवड केलेल्या गटाने विहित मुदतीत आणि शिफारित वाणांचीच खरेदी केली आहे याची कृषि सहाय्यकांनी खातरजमा करावी.
- शेतकऱ्यांना बियाणे घेण्यासाठी जास्त अंतर जावे लागणार नाही यादृष्टीने जास्तीत जास्त वितरकांकडे बियाणे उपलब्ध होईल याची दक्षता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व बियाणे पुरवठादार संस्थांनी घ्यावी.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुकानिहाय व प्रवर्गनिहाय निश्चित केलेल्या लक्षांकानुसार पुरवठादार संस्थांनी त्या तालुक्यातील आपल्या अधिकृत वितरकांकडे बियाणे उपलब्ध करुन द्यावे व वाणनिहाय किती बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहे याची वितरकनिहाय माहिती संबधीत तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना विनाविलंब उपलब्ध करून द्यावी.
- निवड झालेल्या गटातील / उत्पादक कंपनीमधील बियाणे घेण्यास येणाऱ्या शेतकऱ्याचे नाव, प्रवर्ग, गाव, गट क्रमांक, क्षेत्र याबाबतची माहिती घेऊन व त्याची खात्री करुन संबधित शासकीय वितरकांनी शेतकऱ्याला

बियाणे वितरीत करावे. **कृषि विभागामार्फत कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्याकडुन अनुदान वजा जाता रक्कम वसुल केली जाणार नाही याची पुरवठादार संस्थांनी नोंद घ्यावी. लाभार्थी हिश्श्याची रक्कम शेतकऱ्याकडून वसुल करण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थांच्या वितरकांची राहील.**

- पुरवठादार संस्थांकडून वितरकांकडे बियाणे प्राप्त झाल्यानंतर गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी लॉट निहाय नमुने घेऊन शासकीय बीज परीक्षण प्रयोगशाळेकडून तपासून घ्यावेत. गुणवत्ता नियंत्रणाबाबत व अप्रमाणित नमुन्याच्या देयक अदायगी प्रकरणी संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्देशांचे पालन करावे. देशी वाणाच्या प्रात्यक्षिकातील उत्पादित बियाणे शेतकऱ्यांनी स्वतःची खात्री पटल्यानंतर वापरावे. याबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही.
- आयुक्तालयाकडुन उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अनुदानामधून प्रथम प्राधान्याने बियाणे घटकाची अदायगी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून करावी.
- सदर घटकाचे प्रभावी सनियंत्रणाची जबाबदारी उपविभागीय कृषी अधिकारी यांची राहील.

**१७.कीडनाशके व बायो एजंटस**

कृषि विद्यापीठाच्या - शास्त्रज्ञांचे सल्ल्याने निविष्ठा निश्चिती करताना सदर तालुक्यातील पिकनिहाय कीड/रोग प्रादुर्भावाच्या वातावरणात संलग्न पूर्वइतिहासाचा विचार करुन शक्यतो कीड/रोग प्रतिकारक/प्रतिबंधक वाणांची निवड करावी.

- आवश्यक जैविक/रासायनीक औषधांची लाभार्थी शेतकरी गटाने प्राधान्याने शासकीय प्रयोगशाळा, कृषि विद्यापीठे यामधून करावी. त्या व्यतिरिक्त त्यांनी खुल्या बाजारातून शिफारसीप्रमाणे त्यांच्या पसंतीच्या औषधांची खरेदी करावी.
- प्रात्यक्षिक क्षेत्रातील पिकावर येणाऱ्या संभाव्य किडी व रोगांबाबत सखोल माहिती लाभार्थ्यांस देण्यात यावी. पिकाच्या विविध अवस्थेमध्ये येणाऱ्या किडीचे सर्वेक्षण करण्याबाबत लाभार्थ्यांस प्रशिक्षित करावे तसेच आंतरपीक हरभरा करिता क्रॉपसॅप अंतर्गत मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित कृषि सहाय्यकांनी किडरोग सर्वेक्षणाच्या आधारे दिलेल्या सल्ल्यानुसारच किडनाशकांचा वापर करण्याबाबत लाभार्थ्यांस प्रवृत्त करावे. यासाठी कृषी विद्यापीठाने पीकनिहाय व किडरोगनिहाय केलेल्या शिफारशींचा अवलंब करावा तसेच लेबल क्लेम प्रमाणेच किडनाशकाची निवड करावी.

१८) **तणनाशकांचा वापर:**

ऊस आणि हरभरा सारख्या आंतरपिकांच्या उत्पादन वाढीसाठी राबवावयाच्या तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांमध्ये तण व्यवस्थापनासाठी तणनाशकांचा वापर करण्याबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे. विभागीय कृषि सहसंचालक यांनी निश्चित केलेल्या बाबनिहाय खर्च प्रमाणकानुसार उगवणीपूर्व / उगवणीनंतर वापरावयाच्या तणनाशकांचा काळजीपूर्वक अभ्यास करून तणनाशके फवारणीचे तंत्र लाभार्थ्यांना समजावून सांगावे. तणनाशकांचा वापर ज्या तणांसाठी करण्यात आला त्याबाबतच्या नोंदी प्रात्यक्षिक नोंदवहीत घ्याव्यात.

१९) **अनुदान कार्यपध्दती :**प्रात्यक्षिकात सहभागी गटातील शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट अनुदान जमा करण्यात येईल. शासन यंत्रणेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या सर्व स्वउत्पादित निविष्ठांचे प्रत्येक बॅचेसचे नमुने काढून प्रयोगशाळेत तपासणी करून घ्यावेत. **अप्रमाणित निविष्ठांची देयके अदा करू नयेत.**

**२) ऊती संवर्धित रोपे तयार करुन अनुदानावर वाटप करणे**

ऊस पिकाच्या लागवडीत सुधारीत वाणांच्या दर्जेदार बेण्यांच्या लागवडीस खूप महत्व आहे. ऊस पिकाचा कालावधी, कीड / रोगांचा संभाव्य प्रादुर्भाव इ. विचार करता ऊती संवर्धित रोपे उच्च गुणवत्तेची, जोमदार, एकसारख्या वाढीची कीड/रोगमुक्त असतात. त्यामुळे ऊसाचा बेणेमळा ऊती संवर्धित रोपांपासून तयार केल्यास त्याचा निश्चितच फायदा होतो. यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट या संस्थेमार्फत ऊती संवर्धित रोपे तयार करुन उपलब्ध करुन दिली जाणार आहे. रुपये ३.५० प्रति रोप अनुदान याप्रमाणे २.४५ लाख रोपांच्या निर्मितीसाठी रक्कम रुपये ७.२२ लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर ऊती संवर्धित रोपे राज्यातील शेतकऱ्यांना वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट या संस्थेकडून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अनुदाना व्यतिरिक्तची रक्कम लाभधारक शेतकऱ्यांनी भरावयाची आहे. सदरची रोपे पुढील हंगामासाठी लागवड साहित्य म्हणून उपलब्ध होतील अशा पध्दतीने बेणे मळयाचे नियोजन करावे.

**३) मनुष्य बळ विकास कार्यक्रम (अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण)**

अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यासाठी विभागस्तरावर २ दिवसांचे २० प्रशिक्षण घेण्यात यावे. सदर प्रशिक्षणे वसंतदादा शुगर इंन्स्टीटयुट, मांजरी, पुणे, ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव, कृषि विद्यापीठ यांचेमार्फत आयोजित करण्यात यावीत. प्रशिक्षणाची सविस्तर रुपरेषा कृषि विद्यापीठाशी समन्वय साधून निश्चित करावी. विभागीय कृषि सह संचालक औरंगाबाद व लातूर यांनी आपल्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची प्रशिक्षणासाठी निवड करावी. प्रशिक्षण शास्त्रज्ञांमार्फत देण्यात यावे. प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे बाबनिहाय खर्चाचा तपशिल देण्यात येत असून त्याप्रमाणे खर्च करण्यात यावा.

| अ.क्र | घटक | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | व्याख्यात्यांना मानधन (रु.५००/- प्रति व्याख्यान प्रमाणे) १० व्याख्यानासाठी | ५००० |
| २ | प्रशिक्षण साहीत्य, स्टेशनरी, ,छपाई, प्रसिध्दि इत्यादीरुपये ४०० प्रति प्रशिक्षणार्थी | ८००० |
| ३ | भोजन, नाष्टा, (२ दिवसांसाठी) (रु.५०/- प्रति दिन X प्रशिक्षणार्थी धरुन ४० लोकांसाठी X २ दिवस) | २५०० |
| ४ | भोजन व्यवस्था व राहण्याची व्यवस्था रु.५००/- प्रति प्रशिक्षणार्थी | २०००० |
| ५ | इंधन व प्रशिक्षणासाठीच्या प्रक्षेत्रावरील भेटी वाहन भाडे व त्या अनुषंगाने येणारा किरकोळ खर्च | ४५०० |
| | **एकूण** | **४००००** |

प्रशिक्षणाच्या आयोजनाबाबत सविस्तर प्रस्ताव हंगामपूर्व / हंगाम सुरु झाल्याबरोबर संबंधित संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावा. सदरचा तपशील प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी तरतूद उपलब्ध करुन दयावी. आयोजित प्रशिक्षणावर झालेल्या खर्चाचा सविस्तर तपशील आणि उपयोगिता प्रमाणपत्र आयोजकांकडून प्राप्त करुन घ्यावे.

**सन २०१७-१८ मध्ये सदर अर्थसहाय्य केंद्र : राज्य :: ६०:४० टक्के यानुसार देय असल्याने त्यानुसार लेखाशिर्षनिहाय खर्च आणि नोंदी होतील याची दक्षता घेण्यात यावी.**

**४). स्थानिक पुढाकाराच्या बाबी**

**शुगर केन श्रेडरचा वापर-**

राज्यात ऊस पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असून ऊसाच्या उत्पादनासोबतच ऊस पिकाचे अवशेषदेखील मोठ्या प्रमाणावर असतात. काढणीनंतरही हे अवशेष शेतातच राहत असल्याने कीड व रोगाच्या जीवनक्रमासाठी पुरक ठरतात. त्यामुळे हे अवशेष शुगर केन श्रेडर यंत्राद्वारे बारीक करुन शेतात मिसळल्यास विघटनानंतर सेंद्रिय घटक म्हणून उपयुक्त ठरतो. शिवाय कीड व रोगांचा जीवनक्रम खंडीत करण्यास ते उपयुक्त ठरते.

कृषि यांत्रिकीकरणांतर्गत निश्चित केलेल्या पध्दतीनुसार आणि त्यात नमूद केलेल्या यंत्रसामुग्रीपैकी शुगर केन श्रेडर या यंत्राकरिता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व सिमांतिक शेतकरी, महिला यांच्या साठी श्रेडर यंत्राच्या किमतीच्या ५० टक्के कमाल रु. ६३०००/- प्रती युनिटच्या मर्यादेत तर इतर लाभार्थ्यांसाठी श्रेडर यंत्राच्या किमतीच्या ४० टक्के कमाल रु. ५००००/- प्रती युनिटच्या मर्यादेत अर्थसहाय्य देय राहील.

या घटकाचा लाभ देण्यासाठी "उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहीम" सन २०१८-१९ राबविणेबाबत मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णय क्र. ०४१८/प्र. क्र. १५५/१४-ए, दि. २७.०४.२०१८ मधील परिच्छेद क्र. ४.५ कृषि यांत्रिकीकरण या बाबीसाठी दिलेल्या सूचनांचा अवलंब करावा.

➢ **अभियान अंमलबजावणीसाठी तपासणी :-**

शासनाने निर्देशित केलेप्रमाणे लाभार्थ्यांच्या यादीनुसार सर्व लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतावर हाती घेण्यात आलेल्या कार्यक्रमाची प्रत्यक्ष तपासणी संबंधित गावातील कृषी सहाय्यकांनी करायची असून आपला अहवाल तालुका कृषी अधिकाऱ्यामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे. याबाबत कृषि आयुक्तालयाचे संदर्भ ८ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार तपासणी करण्यात यावी.

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रमामध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची प्रवर्गनिहाय माहिती कृषि विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यासाठी कृषि आयुक्तालयास तातडीने सादर करावी.
- अभियानाच्या मासिक प्रगतीचा अहवाल आयुक्तालयाने विहित केलेल्या प्रपत्रात प्रवर्गनिहाय दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रमामध्ये गावनिहाय वाटप केलेल्या निविष्ठा, प्रात्यक्षिके व इतर दिलेले लाभ याबाबतची माहिती लाभार्थ्यांच्या यादीसह ग्रामपंचायतीच्या फलकावर लावावी.
- अभियानांतर्गत राबविलेल्या सर्व घटकांमुळे प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या उत्पादकतेवर दिसून आलेल्या परिणामांचे मूल्यमापन करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल **उपविभागीय कृषी अधिकारी** यांनी हंगामाच्या अखेरीस आयुक्तालयास सादर करावा.
- विभागीय कृषि सह संचालक यांनी सोबत दिलेल्या प्रपत्रात त्यांचे स्तरावर प्राप्त झालेले संकलित मासिक प्रगती अहवाल ई मेल व्दारे ddacashcrop@gmail.com वर व लेखी स्वरुपात कृषि आयुक्तालयास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पाठवावेत.
- योजनेच्या प्रगतीचा तिमाही अहवाल केंद्र शासनास सादर करावे लागतात. त्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, योजनेचा जून, सप्टेंबर, डिसेंबर व मार्च या तिमाहीचे प्रगती अहवाल, तिमाहीनंतर पुढील महिन्याच्या ५ तारखे पर्यंत विभागीय कृषि सह संचालक कार्यालयामार्फत कृषि आयुक्तालयास सादर करावेत.
- विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना संगणकीय प्रणालीव्दारे – पीएफएमएस द्वारे अनुदानाचे वितरण करण्यात येईल. उपलब्ध करुन दिलेले अनुदान महिनानिहाय पूर्णपणे खर्च होईल याची दक्षता घ्यावी. यासाठी गटांकडून वेळापत्रकानुसार सर्व बाबींची अंमलबजावणी होऊन अनुदान मागणी वेळेत प्राप्त होईल असे पहावे.

योजनेच्या खर्चाचे अंतीम उपयोगीता प्रमाणपत्र १२ सीएसआर प्रपत्रामध्ये एप्रीलच्या दुसऱ्या आठवड्यात कृषि आयुक्तालयास सादर करावेत.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात येतो किंवा कसे हे पाहण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीय स्तरावरील सनियंत्रण समिती राज्यात येते. त्यावेळी या समितीस यशोगाथा दाखविता याव्यात याकरिता खरीप हंगामात हे घटक राबविण्याची पूर्वतयारी सुरवातीपासूनच केल्यास या सनियंत्रण समितीस या कार्यक्रमातून साध्य झालेली कामे दाखविता येऊ शकतील.

**आहरण व संवितरण अधिकारी** - सन २०१८-१९ साठी या कार्यक्रमाकरिता शासन निर्णयात नमुद करण्यात आलेले अधिकारी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पहातील. योजनेंतर्गत सर्व प्रकारचे आर्थिक सहाय्य पीएफएमएस (PFMS) द्वारे अदा करण्यात येतील.

**अभियानाचे सनियंत्रण व मुल्यमापन**

- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानांतर्गत ऊस विकास कार्यक्रमामध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची प्रवर्गनिहाय माहिती केंद्र शासनाच्या www.nfsm.gov.in या वेबसाईटवर तसेच कृषि विभागाच्या MIS (एमआयएस) मध्ये ऑनलाईन वेळेत भरण्याची / भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी जिल्हा कार्यालयाची राहील.
- सदर कार्यक्रमांतर्गत गावनिहाय वाटप केलेल्या निविष्ठा, प्रात्यक्षिके व इतर दिलेले लाभ याबाबतची माहिती लाभार्थ्यांच्या यादीसह ग्रामपंचायतीकडे पाठवून सदरील माहिती ग्रामसभेत जाहीर करावी.
- सदर कार्यक्रमांतर्गत सर्व घटकांमुळे प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या उत्पादकतेत वाढ दिसून आलेल्या परिणामांचे मुल्यमापन करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांनी हंगामाच्या अखेरीस कृषि आयुक्तालयास सादर करावा.
- अभियानांतर्गत शेतक-यांनी/गटांनी उत्कृष्टपणे राबविलेल्या कार्यक्रमाच्या यशोगाथा छापिल / डीजिटल स्वरुपात तयार करुन कृषि आयुक्तालयास सादर कराव्यात. यासाठी शेती दिन साठी संकिर्ण बाबीकरिता उपलब्ध निधीचा वापर करता येईल.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

परिशिष्ट–१

## राष्ट्रीय अन्नासुरक्षा अभियान योजने अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०१८-१९

### मासिक प्रगती अहवालाचे प्रपत्र

जिल्हयाचे नाव -

**अहवालाचा कालावधी :** दर महिन्याच्या ५ तारखेपुर्वी

### बाब : ऊस आंतरपीक लागवडीची आद्यरेषिय प्रात्यक्षिक

| अ.क्र. | तालुका/ गाव | भौतिक (हेक्टर) | | लाभार्थी संख्या | बियाणे (ऊस व आंतरपिकाचे) | निविष्ठा पुरवठयाचा तपशील (खर्च प्रमाणकानुसार) | | आर्थिक (रु. लाख) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्षांक | साध्य | | | बाब | मात्रा (एककासह) | लक्षांक | साध्य |
| १ | | | | | | | | | |

**टिप :** विभागाने एकत्रित माहिती सादर करताना विभाग स्तरावरील राज्यस्तरीय प्रशिक्षण (अधिकारी व कर्मचारी) या बाबीच्या भौतिक व आर्थिक साध्यासह मासिक प्रगती अहवाल पाठवावा.

परिशिष्ट–२

## राष्ट्रीय अन्नासुरक्षा अभियान योजने अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०१८-१९

### तिमाही प्रगती अहवालाचे प्रपत्र

जिल्हयाचे नाव -

**अहवालाचा कालावधी :** जुन १८/सप्टें१८/डिसेंबर१८/मार्च१९ अखेर

### बाब : ऊस आंतरपीक लागवडीची आद्यरेषिय प्रात्यक्षिक

| अ. क्र. | तालुका/ गाव | भौतिक (हेक्टर) | | लाभार्थी संख्या | | | | | बियाणे (ऊस व अंतर-पिकाचे) | निविष्ठा पुरवठयाचा तपशील (खर्च प्रमाणकानुसार) | | आर्थिक (रु. लाख) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्षांक | साध्य | अनु. जाती | अनु. जमाती | इतर | एकूण | पैकी महिला | | बाब | मात्रा (एककासह) | लक्षांक | साध्य | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | अनु. जाती | | अनु. जमाती | | इतर | | एकूण | |
| | | | | | | | | | | | | | केंद्र (६० %) | राज्य (४० %) | केंद्र (६० %) | राज्य (४० %) | केंद्र (६० %) | राज्य (४० %) | केंद्र (६० %) | राज्य (४० %) |

योजनेतील विस्तार कार्य :

पीक परिस्थिती :

परिशिष्ट ३

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान योजनेअंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०१८-१९**

**वार्षिक प्रगती अहवालाचे प्रपत्र**

कार्यान्वित अधिकारी – जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

१. प्रस्तावना :

२. उद्देश :

३. प्रसारित केलेले तंत्रज्ञान :

४. भौतिक व आर्थिक प्रगती :

४. अ) भौतिक

| जिल्हा तालुका | गाव | लक्षांक (हेक्टर) | | | | | साध्य (हेक्टर) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | एकुण | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | एकुण |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

४. ब) आर्थिक

| जिल्हा/ तालुका | गाव | **तरतूद** (रुपये लाखात) | | | | | **खर्च** (रुपये लाखात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | **एकुण** | अनु.जाती | अनु.जमाती | महिला | इतर | **एकुण** |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

५) निविष्ठा पुरवठा

| प्रात्यक्षिकाचा प्रकार | तालुकानिहाय जिल्हा | प्रात्यक्षिक (क्षेत्र हेक्टर) | निविष्ठाचे नाव | परिमाण (किलो/लि) | मात्रा (क्वांटिटी) | दर (रु.) | एकुण किंमत (रु. लाख) | पैकी लाभार्थी हिस्सा (रु. लाख) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

**६) प्रात्यक्षिकाचा दृष्य परिमाण**

| प्रात्यक्षिकाचा प्रकार | तालुका निहाय जिल्हा | उत्पादनाचा तपशील (क्विंटल कापूस) | निविष्ठा किंमत (रु.प्रति हेक्टरी) | | उत्पादन खर्च (रु.प्रति हेक्टरी) | | निव्वळ नफा (रु.प्रति हेक्टरी) | | अतिरिक्त नफा प्रात्यक्षिकामुळे (रु./हेक्टर) | नफा व खर्चाचे गुणोत्तर (खर्च : नफा) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रात्यक्षिक | शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या पध्दती (कंट्रोल प्लॉट) | प्रात्यक्षिक | शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या पध्दती (कंट्रोल प्लॉट) | प्रात्यक्षिक | शेतकऱ्यांनी अवलंबलेल्या पध्दती (कंट्रोल प्लॉट) | | |
| | | एकुण | | | | | | | | |
| | | सरासरी | | | | | | | | |

**७) विस्तार कार्य**

| विस्तार कार्यक्रम (संख्या) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तालुकानिहाय जिल्हा | शास्त्रज्ञांच्या भेटी | शेतकरी सभा | शेती दिन | जनजागृती | बातम्या/वर्तमानपत्र/रेडिओ/दुरदर्शन प्रसिध्दी (कव्हरेज) |
| | | | | | |

८) यशोगाथा

९) सनियंत्रण अहवाल (तपासणीचे लक्ष्यांकानुसार केलेली तपासणी

१०) उपयोगिता प्रमाणपत्र (फॉर्म जीएफआर १२ सी)

११) ऑडिटेड उपयोगिता प्रमाणपत्र

## ८) पीक संरक्षण औषधी व बायो एजंटस चे वितरण

| अ. क्र. | गाव / तालुका/ जिल्हा | भौतिक | | | वाण | निविष्ठा पुरवठ्याचा तपशील | आर्थिक (रक्कम रु. लाख) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्षांक | साध्य | लाभार्थी संख्या | | | लक्षांक | प्राप्त तरतूद | खर्च |
| | | | | | | अ. शासकीय यंत्रणेमार्फत<br>ब. थेट डीबीटी द्वारे | | | |
| | एकूण | | | | | | | | |

## ९) कृषि यांत्रिकीकरणांतर्गत शुगर केन श्रेडरचे वाटप

| अ. क्र. | गाव / तालुका/ जिल्हा | भौतिक | | | कटिंग श्रेडर प्रकार | निविष्ठा पुरवठ्याचा तपशील | आर्थिक (रक्कम रु. लाख) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्षांक | साध्य | लाभार्थी संख्या | | | लक्षांक | प्राप्त तरतूद | खर्च |
| | | | | | | अ. शासकीय यंत्रणेमार्फत<br>ब. थेट डीबीटी द्वारे | | | |
| | एकूण | | | | | | | | |

अहवालासोबत खालील मुद्यांवर माहिती द्यावी.

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०१८-१९
## पायाभूत सर्वेक्षण

### क्लस्टरविषयी सर्वसाधारण माहिती

१ गावाचे नाव

गटाचे/क्लस्टरचे नाव –

गटाचा/क्लस्टरचा प्रकार- ऊस आंतरपीक / ऊस आधारेषित पिकाचे

प्रात्यक्षिके

२ प्रकल्पासाठी निवडलेले क्षेत्र

३. गावाची सर्वसाधारण माहिती

### प्रपत्र १

| | | |
|---|---|---|
| १ | गावाचे भौगोलिक क्षेत्र | क्षेत्र |
| | लागवडीलायक क्षेत्र | |
| ३ | पडीक क्षेत्र | - |
| | लागवडीलायक क्षेत्रापैकी १) बागायत क्षेत्र | |
| | २) जिरायत क्षेत्र | |
| | बागायतीचा प्रकार अ) विहिर | - |
| | ब) कॅनॉल | |
| | क) उपसा सिंचन | |
| | ड) बोअर वेल | |
| | इ) इतर | |

### प्रपत्र २
### लाभार्थ्यांची वर्गवारी

| अ.क्र | लाभार्थ्यांची वर्गवारी | संख्या | क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १ | अल्पभुधारक | | |
| २ | अत्यल्प भुधारक | | |
| ३ | बहुभुधारक | | |
| ४ | पैकी महिला शेतकरी | | |
| | एकूण खातेदार संख्या | | |

### प्रपत्र ३
### लाभार्थी संवर्गनिहाय विगतवारी

| अ.क्र | संवर्गनिहाय वर्गवारी | संख्या | क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|
प्रात्यक्षिकांसाठी मागील १० वर्षात राज्यासाठी अधिसुचित वाणांचे प्रमाणित बियाणाचा वापर करावा. प्रात्यक्षिक पिकाची तालुक्याची सरासरी उत्पादकता, काही शेतकऱ्यांनी या पिकांमध्ये मिळविलेली उच्चतम उत्पादकता आणि त्या पिकांची विद्यापीठाने ठरवून दिलेली अनुवांशिक उत्पादन क्षमता (Genetic potential) यात मोठी तफावत आहे. ही तफावत कमी करून पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी स्थानिक कृषी हवामान पद्धतीचा विचार करून विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर कृषि विद्यापीठातील तज्ञांचे सल्याने निश्चित केलेल्या पीकनिहाय तंत्रज्ञान पॅकेजचा प्रात्यक्षिकांसाठी संपूर्ण अवलंब करणे बंधनकारक राहील. **<u>केंद्र शासनाच्या धोरणानुसार बियाणे विरहीत प्रात्यक्षिके आयोजीत करता येणार नाहीत व त्यासाठी प्रस्ताव सादर न करू नयेत</u>.** प्रात्यक्षिकांसाठी बियाणे वाण निवडताना कृषि विद्यापीठातील तज्ञांचे सल्याने स्थानिक भौगोलीक व कृषि हवामान परिस्थितीस अनुकुल वाण निवडण्याची याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील. बियाणे पुरवठा संस्थांनीसुध्दा राज्यासाठी शिफारस केलेल्या व संबंधीत भौगोलीक व कृषि हवामान परिस्थितीस अनुकुल ठरणा-या विहीत वयोमानाच्या वाणांचाच पुरवठा करण्याची दक्षता घ्यावी. प्रात्यक्षिकांद्वारे तंत्रज्ञान प्रसार व उत्पादकता वाढ होणे आवश्यक आहे, त्यादृष्टीने विभागीय स्तरावर प्रात्यक्षिकांसाठी निश्चित केलेले संपूर्ण पॅकेज राबविणे बंधनकारक राहील. पीक प्रात्यक्षिकांच्या पॅकेज मध्ये स्थानिक परिस्थितीनुरुप वाण निवड, बीजप्रक्रीया, जमीन आरोग्य पत्रीकेनुसार जैविक खते, सुक्ष्म मुलद्रव्ये, भूसुधारके, खते यांची निवड व एकात्मीक अन्नद्रव्य व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा वापर, एकात्मीक कीड/रोग व तण व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा वापर इ. बाबींचा अंतर्भाव अपेक्षीत आहे. राज्यात बहुतांश गळीतधान्ये खरीप हंगामात कोरडवाहू क्षेत्रात घेतली जातात. त्यामुळे प्रात्यक्षिक प्लॉटमध्ये मुलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करावा.

संदर्भीय दि. १९/४/२०१७ च्या शासन निर्णयानुसार प्रात्यक्षिकांसाठी लागणा-या निविष्ठा (बियाणे, जैविक खते व औषधे इ.) या प्राधान्याने महाबीज, राष्ट्रीय बीज निगम, कृषि विद्यापीठे, शासकीय जैविक प्रयोगशाळा मार्फत शेतक-यांनी घ्यावे. संदर्भीय दि. १२/९/२०१७ च्या शासन निर्णयानुसार बियाणे, सुक्ष्म मूलद्रव्ये, जैविक खते व जैविक कीटकनाशके तसेच, महाराष्ट्र इन्सेक्टीसाईड ली. (एम.आय.एल.) यांनी स्वत: उत्पादित केलेली रासायनिक किंवा जैविक कीटकनाशके याबाबत थेट लाभ हस्तांतरण माध्यमातून अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर निविष्ठांचे उत्पादनास व पुरवठ्यास लागणारा कालावधी विचारात घेता आपली मागणी तात्काळ संबंधित संस्थांस कळवावी. या निविष्ठांव्यतिरिक्त प्रात्यक्षिक पॅकेज अंतर्गत अन्य निविष्ठांची खरेदी लाभार्थी शेतकरी गटाने खुल्या बाजारातुन करावी व त्यानंतर लाभार्थी गटास अनुदान त्यांच्या राष्ट्रीयकृत बँक खात्यात थेट जमा करावे.

**पिक प्रात्यक्षिकांच्या प्रती हेक्टरी अनुज्ञेय अनुदान दरात केंद्र शासनाने वाढ केली आहे. तथापि, प्रत्यक्षात निर्धारित पॅंकेजनुसार आवश्यक अनुदान विचारात घेता प्रती हेक्टरी होणा-या संभाव्य बचतीतून उपलब्ध निधी मर्यादेत अतिरिक्त पिक प्रात्यक्षिके घेण्यात यावीत. बियाणे उपलब्धतेनुसार प्रात्यक्षिकांच्या पीक बदलाबाबत व पिकांचे पॅंकेज ठरविण्याबाबत संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांनी निर्णय घ्यावा व मान्यता प्रदान करावी. त्यासाठी वेळोवेळी आयुक्तालयास प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता राहणार नाही, याची नोंद घ्यावी.**

. निविष्ठांच्या खरेदीनंतर प्रमाणके व भौतीक तपासणीद्वारे खात्री करुन निर्धारीत मर्यादेत अनुदान शेतक-यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा करावे.

संबंधीत कृषि सहाय्यक यांनी प्रात्यक्षिकांचे सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक असून वरिष्ठ अधिका-यांनी वेळोवेळी प्रात्यक्षिकांना भेटी देवून मार्गदर्शन करावे. उपरोक्त संदर्भ क्र. ९ नुसार कृषि पर्यवेक्षकाने संबंधित कृषि सहाय्यकांच्या पिक प्रात्यक्षिकांना १५ दिवसाला नियमितपणे भेट द्यावी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. तसेच कृषि सहाय्यकांना पुढील भेटीपर्यंत प्रात्यक्षिका अंतर्गत करावयाच्या कामाबाबत सूचना द्याव्यात आणि पुढील भेटीवेळी झालेल्या कामाचे मूल्यमापन करून आपला अहवाल **प्रपत्र ६ अ** मध्ये मंडळ कृषि अधिकाऱ्यामार्फत तालुका कृषि अधिकारी कार्यालयास नियमितपणे सादर करावा. पिक प्रात्यक्षिकांना भेट दिल्यानंतर कृषि पर्यवेक्षकांनी संबंधित गावात मोका तपासणी देखील करावी. त्याचप्रमाणे संबधित मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी १५ दिवसातून एकदा किमान एका पिक प्रात्यक्षिकास भेट देऊन आपला अहवाल **प्रपत्र ६ ब** नुसार तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. सर्व पिक प्रात्यक्षिकांचा अहवाल संकलित करून तालुका कृषि अधिकाऱ्यांनी दर महिन्याला जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांना सादर करावा. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी जिल्ह्याचा एकत्रित अहवाल **प्रपत्र ६ क** मध्ये विभागीय कृषि सहसंचालक व संचालक (विस्तार व प्रशिक्षण) पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करावा. पिक प्रात्यक्षिकांमध्ये वापरलेले तंत्रज्ञान या प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी नसणाऱ्या राज्यातील इतर सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रात्यक्षिकाचे क्षेत्रावर स्थानिक इतर शेतकऱ्यांच्या भेटीचे आयोजन करण्यात यावे.

प्रात्यक्षिके राबविण्याची संपूर्ण जबाबदारी कृषि सहाय्यकांची राहील व गांवनिहाय संकलित केलेल्या पिक कापणी निरिक्षण अहवालाची एकत्रित नोंद मंडळस्तरावर एका स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे मंडळ कृषि अधिका-यांना बंधनकारक राहील. कृषि सहाय्यकांनी वर्षनिहाय नोंदवही **प्रपत्र -५** नुसार ठेवावी. याबाबत संबंधित ता.कृ.अ., उ.वि.कृ.अ., जि.अ.कृ.अ. यांची प्रशासकीय जबाबदारी राहील. प्रत्येक प्रात्यक्षिका शेजारी गुणात्मक तुलनेसाठी शेतक-यांने स्थानीक पध्दतीने घेतलेल्या तेवढ्याच क्षेत्राचा "कन्ट्रोल प्लॉट" निवडावा. दोन्ही क्षेत्राच्या पिकाच्या पेरणीपासून कालक्रमानुसार वापरलेल्या निविष्ठांच्या नोंदी, त्यासाठी आलेल्या खर्चाची तारीखवार नोंद व आलेल्या उत्पादनाची सांख्यिकी पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेऊन विश्लेषणात्मक नोंदी ठेवाव्यात

तालुकास्तरावर प्रात्यक्षिकातील सर्व शेतकऱ्यांचे या पिक कापणीत आलेल्या उत्पादनाचा पीकनिहाय अहवाल संकलित करावा व संकलित केलेला खरीप व रबीचा अंतिम अहवाल (Excel sheet मध्ये) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलित अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करून विभागाचा संकलित अहवाल कृषि आयुक्तालयास ई-मेल द्वारे nmoopdda@gmail.com सादर करावा. **पिक प्रात्यक्षिकच्या निष्कर्षाबाबत ग्रामसभेत संबंधित कृषि सहाय्यकाने माहिती द्यावी.**

पिक कापणी प्रयोगानुसार आयुक्तालयास अहवाल पाठवायचे प्रपत्र

योजना : -----प्रात्यक्षिकाचा हेतू:---- कृषि सहाय्यकाचे नाव:-----प्रात्यक्षिकाचे गाव/तालुका:----सहभागी शेतकरी संख्या:--

| शेतक-याचे नाव | प्रात्यक्षिक प्लॉटमधील एकुण खर्च | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील एकुण खर्च | प्रात्यक्षिक प्लॉटमधील उत्पादन (क्विं/हे) | पारंपारीक पध्दतीचे प्लॉटमधील उत्पादन (क्विं/हे) | बाजारभावानुसार मिळालेले उत्पन्न (रु./हे) | | प्रात्यक्षिक प्लॉटमधील मिळालेले निव्वळ वाढीव उत्पन्न (रु/हे) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रात्यक्षिक प्लॉटमधील | पारंपारीक पध्दतीने | |
| | | | | | | | |

तंत्रज्ञान प्रसाराचे दृष्टीने प्रात्यक्षिक प्लॉटवर शेतकरी मेळावे/शेतकरी अभ्यास दौरे आयोजित करावेत. प्रात्यक्षिकांचे पीक कापणी प्रयोगासाठी व फलकासाठी येणारा खर्च अकस्मिकता निधीखालील तरतुदीतुन भागवावा.

प्रत्येक पीक प्रात्यक्षिकाकरीता शेतकरी गटाच्या उपस्थितीत शास्त्रोक्त पध्दतीने पीक कापणी प्रयोग घेवून प्रात्यक्षिकांद्वारे साध्य करण्यात आलेल्या उत्पादकतेचा अहवाल संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांनी संकलीत करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्ह्याचा संकलीत अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी खालील प्रपत्रात विभागास सादर करावा व त्याची प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी.

पिक प्रात्यक्षिकांचे तालुकानिहाय उत्पादकता अहवाल प्रपत्र

योजना : ----- जिल्हा : ----------- विभाग :-----------

| अ.क्र. | पिक | तालुक्याचे नाव | प्रात्यक्षिकाखालील क्षेत्र (हेक्टर) | उत्पादकता (किलो/हे.) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रात्यक्षिक प्लॉट | तुलनात्मक प्लॉट |
| १ | सोयाबीन | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| २ | भुईमुग | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| ३ | करडई | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

पिक कापणीनंतर १५ दिवसामध्ये पिक कापणीचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी..

**२. प्रशिक्षणे:** (खर्चाचे प्रमाण केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) ( जिल्हास्तर )

**२.१ शेतकरी प्रशिक्षण :** शेतक-यांना अद्यावत तंत्रज्ञान अवगत करुन कौशल्यवृध्दी वाढ करणे हा प्रशिक्षणाचा हेतू आहे. **"उन्नत शेती-समृध्द शेतकरी"** मोहीमेबाबतच्या संदर्भीय दि. २७/४/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४.३ नुसार प्रशिक्षणांबाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जि.अ.कृ.अ. यांनी प्रकल्प संचालक आत्मा यांचे समन्वयाने नियोजन व कार्यवाही करणे बंधनकारक राहील. प्रशिक्षणाबाबत कार्यपद्धतीचा सविस्तर तपशील सदर पत्रात दिला आहे. सन २०१८-१९ साठी प्रशिक्षाणाबाबतचे जिल्हानिहाय व पीकनिहाय लक्षांक **प्रपत्र २** व **प्रपत्र ३** मध्ये दर्शविले आहे.

खरीप हंगामासाठी शेतकरी प्रशिक्षणे मे महिन्यात व रब्बी हंगामासाठी सप्टेंबर मध्ये आयोजित करावीत. प्रशिक्षणाचा सविस्तर कार्यक्रम सोबत सहपत्रीत केला आहे.

**२.२ विस्तार अधिकारी/कर्मचारी/निविष्ठा विक्रते यांचे प्रशिक्षण:** विस्तार अधिकाऱ्यांचे ज्ञान व कौशल्यवृध्दी करुन भविष्यात त्यांना तज्ञ प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर) बनविण्यासाठी प्रशिक्षित करणे हा प्रशिक्षणाचा हेतु आहे. याबाबतच्या सविस्तर सुचना उपरोल्लेखित दि. १२/५/२०१७ च्या पत्रान्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार जिल्हा स्तरावर जि.अ.कृ.अ. यांनी प्रकल्प संचालक आत्मा यांचे समन्वयाने नियोजन व कार्यवाही करणे बंधनकारक राहील. सन २०१८-१९ साठी प्रशिक्षणाचा सविस्तर कार्यक्रम सोबत सहपत्रीत केला आहे.

क) <u>अनुदानीत निविष्ठा पुरवठा</u> **(खर्चाचे प्रमाण केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) (जिल्हास्तर)**

कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध केंद्र व राज्य योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या कृषि निविष्ठांसंदर्भात थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) च्या अनुषंगाने संदर्भीय दि. १९/४/२०१७ व दि. १२/९/२०१७ च्या शासन निर्णयानुसार शासनाने सविस्तर सुचना निर्गमित केल्या असून त्यानुसारच अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. तसेच, याबाबत कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केल्या जाणा-या सुचना लागू राहतील.

**१. <u>जिप्समचे/पायराईट/डोलामाईट/सिंगल सुपर फॉस्फेट या भूसुधारकांचा वापर</u>:** जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचा गळीतधान्य पीकांच्या उत्पादकतेवर होणारा परिणाम विचारात घेता राष्ट्रीय गळीतधान्य अभियानांतर्गत जिप्सम/पायराईट्स/डोलोमाईट/एसएसपी यांचा समावेश केला आहे. जमिन आरोग्य पत्रिके आधारे व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीप्रमाणे गळीतधान्य पिकास गरजेनुरुप खते वापरण्याबाबत शेतक-याना मार्गदर्शन करावे. शेतक-यांनी गरजेनुरुप निविष्ठा स्वत: खरेदी कराव्यात. निविष्ठांच्या किंमतीच्या ५० टक्के किंवा रु.७५०/- प्रति हेक्टर उच्चतम मर्यादेत अनुदान थेट लाभार्थ्यांच्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा करावे. शेतक-यांना निविष्ठा उपलब्धता हंगामपूर्व होईल याद्दष्टीने मार्गदर्शन करावे. जिल्हानिहाय कार्यक्रम सोबत सहपत्रीत केला आहे.

**२. <u>जैविक खते</u>:** अभियानाअंतर्गत जैविक खते घटकाचा जिल्हानिहाय भौतीक व आर्थिक कार्यक्रम सोबत सहपत्रीत केला आहे. जैविक खते/द्रवरुप कन्सॉर्शिया यांचे उत्पादन शासकीय प्रयोगशाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर घेण्यात येते. शेतक-यांनी मागणी शासकीय प्रयोगशाळांकडे मागणी नोंदविण्याबाबत मार्गदर्शन करावे व गरजेनुरुप निविष्ठा खरेदी कराव्यात. निविष्ठांच्या किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ३००/हे. उच्चतम मर्यादेत लाभ अनुज्ञेय राहील. संदर्भीय शा.नि.दि.१९/४/२०१७ व दि. १२/९/२०१७ नुसार <u>जैविक खते पुरवठा महाबीज, शासकीय संस्था, कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र इ. कडून केला जाणार असल्याने त्याबाबतीत थेट लाभ हस्तंतरण योजनेच्या माध्यमातून अनुदान देण्याचा प्रश्न उदभवत नाही</u>, **त्यासाठी संदर्भीय दि.१६/०५/१८ च्या पत्रानुसार प्राधान्याने संबंधित प्रयोगशाळेकडे अपेक्षित मागणी कळवावी, जेणेकरून वेळेवर उत्पादन व पुरवठा शक्य होईल**. अन्यथा, डी.बी.टी.प्रमाणे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बॅन्क खात्यात जमा करावे.

**३. <u>पिक संरक्षण औषधे व तणनाशके</u>:** अभियानाअंतर्गत पीक संरक्षण औषधे व तणनाशके घटकाचा जिल्हानिहाय कार्यक्रम सोबत सहपत्रीत केला आहे. स्थानिक परिस्थीतीनुसार केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेमनुसार व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीप्रमाणे पीक संरक्षणासाठी औषधे/किटकनाशके/बुरशीनाशके/जैविक कीडनाशके/तणनाशके/जैव एजन्टस इत्यादी निविष्ठांची शेतक-यांनी खरेदी करावी. निविष्ठांसाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा रु.५००/हे. उच्चतम मर्यादेत लाभ अनुज्ञेय राहील. <u>जैविक किटकनाशकांचे उत्पादन शासकीय प्रयोगशाळा/कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्र इ. कडून केले जाते. त्यांचेकडून शेतक-यांनी खरेदी केल्यास संदर्भीय शा.नि.दि.१९/४/२०१७ व दि. १२/९/२०१७ नुसार त्याबाबतीत **थेट लाभ हस्तांतरण योजनेच्या** माध्यमातून अनुदान देण्याचा प्रश्न उदभवत नाही</u> त्यांचेकडून खरेदीबाबत शेतक-यांना मार्गदर्शन करावे. अन्यथा, डी.बी.टी.प्रमाणे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बॅक खात्यात जमा करावे. शेतक-यांना हंगामपूर्व निविष्ठा उपलब्धता व्हावी याकरीता मार्गदर्शन करावे.

**४. <u>एन.पी.व्ही.चा पुरवठा</u>:** हेलीकोव्हर्पा आर्मिजेरा अळीच्या जैविक नियंत्रणासाठी ही बाब अभियानाअंतर्गत समाविष्ठ केली आहे. अभियानाअंतर्गत एन.पी.व्ही. घटकाचा जिल्हानिहाय कार्यक्रम सोबत सहपत्रीत केला आहे. स्थानिक परिस्थीतीनुसार कृषि विद्यापीठाच्या शिफारशीप्रमाणे पीक संरक्षणासाठी एन.पी.व्ही. खरेदीबाबत शेतक-यांना मार्गदर्शन करावे. सदर निविष्ठांसाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ५००/- प्रती हेक्टर या उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. अनुदान थेट लाभार्थ्यांच्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बॅक खात्यात जमा करावे. शेतक-यांना हंगामपूर्व निविष्ठा उपलब्धते बाबत मार्गदर्शन करावे.

**५. <u>अनुदानीत कृषि औजारे व सिंचन सुविधा</u> :** कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध केंद्र व राज्य योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या कृषि औजारांसंदर्भात संदर्भीय दि. २७/४/२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ४.५ नुसार व थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) योजना राबविण्याच्या अनुषंगाने संदर्भीय शासन निर्णय दि. २१/१/२०१७ अन्वये सविस्तर सुचना निर्गमित केल्या असून त्यानुसार अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. तसेच, याबाबत कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) यांचेकडून वेळोवेळी निर्गमित केल्या जाणा-या सुचना लागू राहतील.

कृषि औजारे घटकासाठी निवड केलेल्या लाभार्थीने पूर्व संमती घेणे बंधनकारक राहील. पूर्वसंमती प्राप्त झाल्यावर संबंधीत लाभधारकाने **"उन्नत शेती-समृध्द शेतकरी"** मोहीमेबाबतच्या संदर्भीय दि. २७/४/२०१८ च्या शासन निर्णयातील अनुदानास अनुज्ञेय औजारांपैकी व तांत्रीकद्दष्ट्या योग्य औजारांची/पाईप्सची त्यांच्या पसंतीची औजारे खुल्या बाजारातून खरेदी करावी. अनुदान मागणीसाठी संबंधीतांनी खरेदीच्या मुळ पावत्या संबंधीत मंडल कृषि अधिकारी यांचेकडे जमा करुन त्याची पोहोच घ्यावी. तसेच, लाभार्थ्यांनी त्यांच्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बँक खात्याचा तपशील देवून अनुदान मागणी अर्ज द्यावा.

लाभधारकाने पूर्वसंमतीने खरेदी केलेल्या औजारांबाबत मोका तपासणी करुन शेतक-यांच्या आधार नोंदणीकृत **राष्ट्रीयकृत** बँक खात्यात अनुदान थेट जमा करण्याची कार्यवाही **दि. २७ / ४ /२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १२ नुसार करावी**. कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे औजारनिहाय अनुदानाचे दर अनुज्ञेय राहतील.

**सुधारीत कृषि औजारे:**

| औजारांचा प्रकार | उच्चतम अनुदान मर्यादा रु. प्रति औजार | |
|---|---|---|
| | सर्वसाधारण प्रवर्ग | अ.जा/अ.ज./अल्प/सिमांत/महीला प्रवर्ग |
| पॉवरचलित औजारे * | किंमतीच्या ४० टक्के किंवा रु.५०,०००/- (कृषि यांत्रीकीकरण अभियानानुसार) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु.६३,०००/- (कृषि यांत्रीकीकरण अभियानानुसार) |

**टीप** - * ( अनुदान दर ३५ बी.एच.पी. व वरील क्षमतेच्या औजारांचे असून त्यापेक्षा कमी बी.एच.पी.क्षमतेच्या औजारासाठी कृ.यां.उपभियान (SMAM) प्रमाणे उच्चतम अनुदान मर्यादा लागू राहील). **उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहिमेत समाविष्ठ** व कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रवर्गनिहाय व औजारेनिहाय उच्चतम मर्यादेचे अधिन राहून अनुदाचा लाभ अनुज्ञेय राहील.

**सिंचन सुविधेसाठी पाईप पुरवठा** : सिंचनासाठी मान्यताप्राप्त प्रकारच्या आय.एस. मार्क पाईप्सची लाभार्थ्यांनी पूर्वसंमतीने त्यांच्या पसंतीनुसार खरेदी करावी. लाभधारकांकडे सिंचनासाठी स्त्रोत उपलब्ध असल्याची खात्री करुन पाईपच्या किंमतीच्या ५० टक्के किंवा पाईपच्या प्रकारानुसार खालीलप्रमाणे उच्चतम मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. प्रती लाभार्थी एकूण लाभाची उच्चतम मर्यादा रु. १५०००/- राहील.

| अ. क्र. | पाईपचा प्रकार | उच्चतम अनुदान मर्यादा/मिटर |
|---|---|---|
| १ | एचडीपीई पाईप्स | रु. ५०/- *per meter* |
| २ | पीव्हीसी पाइप्स | रु. ३५/- *per meter* |
| ३ | एचडीपीई लॅमिनेटेड वोव्हन ले फ्लॅट ट्युब्ज पाइप्ससाठी | रु. २०/- *per meter* |

लाभधारकाने पूर्वसंमतीने खरेदी केलेल्या पाईप्सबाबत मोका तपासणी करुन शेतक-यांच्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बॅन्क खात्यात अनुदान थेट जमा करण्याची **कार्यवाही दि. २१/१/२०१७ व २८/४/२०१७** शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे विहीत मुदतीत करावी. DBT नुसार अनुदानाची अदायगी केलेल्या सर्व लाभार्थींची माहिती http://www.nfsm.gov.in/nmoopmis या लिंकवर तत्काळ भरून वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावी. सदर घटकाच्या अंमलबजावणी□□ मासिक प्रगती अहवाल खालील प्रपत्रात सादर करावा.

**राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान(गळीतधान्य)**

**सन २०१८-१९ अंतर्गत यांत्रिकीकरण घटकाचा DBT बाबतचा प्रगती अहवाल -माहे - .........**

| अ. क्र. | जिल्हा | औजाराचे नाव | औजाराचा लक्षांक (संख्या) | पूर्व संमतीसाठी ताकृअ कडे मागणी (संख्या) | ताकृअ कडून पूर्व संमती (संख्या) | शेतकऱ्यांकडून औजार खरेदी (संख्या) | मोका तपासणी (संख्या) | शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | लाभार्थी संख्या | अनुदान जमा रक्कम |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**ड) फ्लेक्झी फंड : (खर्चाचे प्रमाण केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) (जिल्हास्तर)**

स्थानिक गरजेनुरुप याबाबींसाठी आपल्या जिल्ह्याच्या फ्लेक्झी फंड घटकाच्या आर्थिक मर्यादेचे अधिन राहुन विभागीय कृषि सहसंचालक यांचे मान्यतेने कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. यासाठी संबंधित जि.अ.कृ.अ. यांनी विविध प्रसार माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी देवून जाहिरातीद्वारे अर्ज मागविणे बंधनकारक राहील. जिल्ह्यास मंजुर आर्थिक लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास खुल्या सोडत पध्दतीने विभागीय कृषि सहसंचालक यांचे मान्यतेने लाभार्थी निवड करावी. **एकाच बाबीसाठी एका लाभार्थ्यास एकापेक्षा जास्त योजनेतून लाभ अनुज्ञेय नाही. मात्र, असे आढळल्यास, लाभ देणारा अधिकारी व लाभाची द्विरुक्ती करणारा लाभार्थी यांचे विरुध्द अत्यंत कडक कार्यवाही केली जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

यासाठी बाबनिहाय संक्षीप्त मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे आहेत. सविस्तर तांत्रीक/आर्थीक मार्गदर्शक सुचना संबंधीत अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

**१. इनलेट व आऊटलेट सुविधेसह यांत्रिकीकरणाच्या सहाय्याने शेततळे निर्मीती:**

पिकांच्या वाढीच्या अवस्थेत संरक्षित सिंचन देण्याचे दृष्टीने शेततळे बाबीचा अंतर्भाव केला आहे. मागेल त्याला शेततळे बाबतच्या शासन निर्णयानुसार आर्थिक मापदंड निश्चीत करण्यात आले आहेत. त्यानुसार २०X२०X३ मी. आकारमानाचे शेतळ्यासाठी मापदंडानुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. ४०,४६७/- व ३०X३०X३ मी. आकारमानाचे शेतळ्यासाठी मापदंडानुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. ५०,०००/- पैकी किमानप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. लाभ थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने लाभार्थ्याच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा करावा.

गळीतधान्य पिकांची लागवड करणा-या शेतक-यांना/गटांना त्यांचे गरजेनुरुप या बाबीचा लाभ देण्यात यावा. निवडलेल्या तालुक्यातील पिकनिहाय क्षेत्रानुसार शेततळ्यांचा लक्षांक निश्चीत करावा. यानुसारच सदर पिकांच्या लागवडीसाठी निवडलेल्या लाभार्थी शेतक-यांनाच सदर बाबींचा लाभ देण्यात यावा.

शेततळ्यांसाठी मागेल त्याला शेततळेबाबतच्या मार्गदर्शक सुचनानुसार अंमलबजावणी करावी. अंमलबजावणीमध्ये सुसूत्रता येण्यासाठी कार्यान्वयीन यंत्रणा आणि लाभार्थी यांच्या जबादा-या पुढीलप्रमाणे राहतील.

**<u>कार्यान्वयीन यंत्रणेची जबाबदारी</u> :**

अ) निवड केलेल्या लाभार्थ्याला कृषि विभागाच्या इतर योजनेतुन शेततळेसाठी लाभ दिलेला नाही याची खात्री करावी.

ब) कृषि सेवक/कृषि सहाय्यक/कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी यांनी तांत्रीक निकषाप्रमाणे जागेची निवड करावी, निवडलेल्या जागेचे अक्षांश व रेखांश घेऊन नस्तीत नोंद घ्यावी, कामाच्या पूर्वी लाभार्थ्यासह जागेचा फोटो घेण्यात यावा व तो नस्तीत जतन करावा.

क) मंजूर आकारमानाप्रमाणे शेततळ्याची आखणी करुन द्यावी.

ड) खोदकामाच्या विविध टप्प्यावर भेट देऊन लाभार्थ्यांस तांत्रिक मार्गदर्शन करावे.

इ) लाभधारकाने शेततळ्याचे काम पूर्ण झाल्याचे लेखी कळविल्यांनतर कृषि सेवक/कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांनी प्रत्यक्ष मोजमापे घ्यावीत व अनुज्ञेय अनुदान अदायगीसाठी शिफारस करण्यापुर्वी लाभार्थ्यांसह शेततळ्याचा फोटो घ्यावा व तो नस्तीत जतन करावा.

ई) काम पूर्ण झाल्यावर अनुदानाची अनुज्ञेय रक्कम थेट लाभार्थ्यांच्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बँक खात्यावर जमा करावी.

प) शेततळ्यातील पाण्याचा गळीतधान्य पिकांना संरक्षित सिंचन म्हणून उपयोग व्हावा यासाठी लाभार्थ्यास गरजेनुसार "पाण्याचा कार्यक्षम वापरासाठी सिंचन साधने" या घटकांतर्गत सिंचन साधनांचा लाभ देण्यात यावा.

फ) तालुका कृषि अधिकार्याने शेततळ्याचे लाभार्थीनिहाय, वर्षनिहाय, योजनानिहाय एकत्रित नोंदवही तालुकास्तरावर ठेवणे बंधनकारक राहील जेणेकरून एकच लाभार्थी वेगवेगळ्या योजनेतून शेततळ्याचा लाभ (द्विरुक्ती) होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित तालुका कृषि यांची राहील.

ग) शेततळ्याचे Geotagging करणे बंधनकारक राहील.

**<u>लाभार्थ्याची जबाबदारी</u> :**

अ) कृषि विभागाचे कृषि सेवक/कृषि सहाय्यक यांनी निश्चीत केलेल्या ठिकाणी शेततळे घेणे बंधनकारक राहील.

ब) कार्यारंभ आदेश मिळाल्यापासून शेततळ्याचे काम तीन महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

क) लाभार्थ्यांनी स्वत:चा आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बँक खाते क्रमांक संबंधीत कृषि सहाय्यक यांचेकडे पासबुकचे पहिल्या पानाच्या छायांकीत प्रतीसह सादर करावा.

ड) मंजूर आकारमानाचे शेततळे खोदणे हे लाभार्थ्यांस बंधनकारक राहील.

इ) शेततळ्याच्या बांधावर व पाण्याच्या प्रवाहाच्या भागामध्ये स्थानिक प्रजातीच्या वनस्पतीची लागवड करावी.

ई) शेततळ्याची निगा, दुरुस्ती, वेळोवेळी गाळ काढणे इ. जबाबदाऱ्या संबंधीत लाभधारकाची राहतील.

प) पावसाळ्यात शेततळ्यात गाळ वाहून येवून साचणार नाही याची व्यवस्था लाभार्थ्यांने करावी. उदा.प्रवाहाच्या दोन्ही बाजुने तुराट्या/पराट्याचे संरक्षक आवरण देणे व इनलेट/आऊटलेट जवळ ३ ते ४ फांदेरी बांध घालणे इ.

फ) लाभार्थ्याच्या ७/१२ उताऱ्यावर शेततळ्याची योजनेसह नोंद घेणे बंधनकारक राहील.

ग) शेततळे पुर्ण झाल्यावर योजनेचा फलक लाभार्थ्याने लावणे बंधनकारक आहे.

घ) नैसर्गीक आपत्तीमुळे शेततळ्यास कोणत्याही प्रकारची हानी पोहोचल्यास नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

त) शेततळ्यामध्ये साठविलेल्या पाण्याचा उपयोग प्राधान्याने गळीतधान्य पिकास संरक्षित सिंचन देण्यासाठी करावा.

**२. <u>डीझेल पंपसंच पुरवठा</u> :** संरक्षित सिंचनासाठी पाणीसाठा उचलण्याकरिता अनुदानावर डीझेल पंपसंच पुरवठ्याची नव्याने तरतूद केली आहे. सदर घटकाचा लाभ सिंचन सुविधा असलेल्या लाभार्थ्यांना प्राधान्याने द्यावा. मान्यताप्राप्त आय.एस. मार्क डीझेल पंपसंचाची लाभार्थ्यानी पूर्वसंमतीने त्यांच्या पसंतीनुसार खरेदी करावी. त्यासाठी प्रत्यक्ष किमतीच्या ५०% किंवा उच्चतम मर्यादा रु. १०००० /- प्रती नग यापैकी किमानप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. अनुदानाचा लाभ थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने लाभार्थ्याच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात जमा करावा.

**३. <u>गोदाम सुविधा निर्मिती</u> :** मुल्यवृध्दीच्या दृष्टीने उत्पादीत मालाची योग्य प्रकारे साठवणुक करता यावी या उदेशाने फ्लेक्झी फंड या घटकाखाली गोदाम उभारणी या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. अन्नधान्ये उत्पादनाच्या सुरक्षित साठवणुकीसाठी गोदाम सुविधा उपयोगी आहे. जेथे गोदामाची व्यवस्था नाही मात्र, गळीतधान्य पिके घेतली जातात अशा ठिकाणी गोदाम बांधकामास प्राधान्य द्यावे. अभियानांतर्गत २५० मे. टन क्षमतेचे गोदाम बांधकामासाठी मंजूर अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु.१२.५० लाख मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

सदर बाब बँक कर्जाशी (Bank ended subsidy) निगडीत असून इच्छुक नोंदणीकृत शेतकरी उत्पादक संघ/कंपनी (FPO/FPC) यांनी केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडारण योजना/नाबार्डच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँकेकडे प्रकल्प सादर करावा. बँकेने कर्ज प्रकरण मंजूर केल्यानंतर संबंधित अर्जदार संस्था निधी उपलब्धतेच्या मर्यादेत सदर बाबीच्या लाभास पात्र ठरेल. **सदर बाब वैयक्तिक लाभार्थ्यासाठी अनुज्ञेय नाही.** तालुका कृषी अधिकारी यांनी अर्जदारांचे परिपूर्ण अर्ज जि.अ.कृ.अ. यांच्या शिफारसीसह वि.कृ.स.सं. यांचेकडे पूर्वसंमतीकरीता सादर करावेत. पूर्वसंमती व बँकेने कर्ज प्रकरण मंजूर केल्यानंतर संबंधित संस्था विहित समय मर्यादेत कार्यपूर्तीच्या अटीवर सदर बाबीच्या लाभास अनुज्ञेय ठरेल. पूर्वसंमतीनंतर संबंधित लाभार्थ्यांस बांधकाम सुरु करण्याबाबत कार्यारंभ आदेश तालुका कृषी अधिकारी यांनी द्यावेत.

बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वखार महामंडळ, बँक प्रतिनिधी व मंडळ कृषि अधिकारी यांच्या संयुक्त मोका तपासणी अहवालाच्या आधारे अनुज्ञेय अनुदान थेट लाभार्थ्यांच्या आधार नोंदणीकृत राष्ट्रीयकृत बँक कर्ज खात्यावर वर्ग करावे.

**<u>गोदाम बांधकामाबाबत करावयाची कार्यवाही</u> :**

अ) लाभार्थी निवडीसाठी वर्तमानपत्रात व्यापक प्रसिद्धी देवून अर्ज मागवावेत.

ब) तालुका कृषी अधिकारी यांनी याबाबीसाठी इच्छूक लाभार्थ्यांचे अर्ज महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या अथवा सार्वजनीक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाइन्स, स्पेसिफिकेशन्स व खर्चाच्या अंदाजपत्रकासह जि.अ.कृ.अ. यांचे शिफारसीने वि.कृ.स.सं. यांना सादर करावेत.

क) **लाभार्थी निवड एप्रिल - में महिन्यात करावी.** लक्षांकाच्या तुलनेत जास्त अर्ज आल्यास सोडत पद्धतीने निवड करावी.

ड) वखार महामंडळाच्या तांत्रिक निकषाप्रमाणे लाभार्थ्याने जागेची निवड करावी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी गोदाम बांधकामापुर्वी जागेस भेट देऊन खात्री करावी व फोटोग्राप्स घ्यावेत.

इ) कृषि विभागाच्या सर्व योजनामधून या बाबीसाठी एकदाच लाभ घेता येईल. **लाभाची द्विरुक्ती होणार नाही याची जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी खात्री करावी.**

ई) वखार महामंडळाच्या तांत्रिक निकषाप्रमाणे डिझाईन, स्पेसिफिकेशन, खर्चाचे अंदाज पत्रकाप्रमाणे बांधकाम आर्थिक वर्षात पूर्ण करणे बंधनकारक राहील. अपूर्ण बांधकामास पुढील आर्थिक वर्षात अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

प) अपूर्ण बांधकाम, मंजूर डिझाईन, स्पेसिफिकेशन मध्ये बदल करून बांधकाम केल्यास अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

फ) गोदामाचा वापर शेतक-यांनी उत्पादीत केलेला कृषिमाल साठवणुकीसाठी शेतक-यांना योग्य व माफक दरात करावा. याबाबत रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड हमीपत्र घ्यावे, त्यात गोदाम वापरामध्ये गैरवापर आढळल्यास अनुदानाची रक्कम व्याजासहीत वसुल केली जाईल याचा स्पष्ट उल्लेख करावा.

ग) जि.अ.कृ.अ. यांनी गोदाम बांधकामास भेटी देऊन कामाची प्रत्यक्ष पाहणी करावी फोटोग्राप्स घ्यावेत.

घ) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पुर्तता अहवाल (Completion Report) व फोटोग्राप्स घ्यावेत.

त) गोदामाच्या उद्देशाप्रमाणे त्याचा वापर गळीतधान्य उत्पादनाच्या सुरक्षित साठवणुकीसाठी करणे बंधनकारक राहील.

थ) गळीतधान्यांचे साठवणुकी सुविधेअभावी नुकसान होऊ नये म्हणुन संबंधितांना कृषि विज्ञान केंद्रामार्फत प्रशिक्षण द्यावे.

द) गोदाम भाडे तत्त्वावर द्यावयाचे झाल्यास संबंधित शेतकरी उत्पादक कंपनीने ता.कृ.अ.यांचे सल्याने कार्यपध्दती विकसीत करावी.

ध) गळीतधान्य साठवणुकीबाबतचा त्रैमासीक अहवाल, तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.

न) साठवलेल्या मालाची विक्री करण्यासाठी आत्मा/पणन विभागाचे मार्गदर्शन घ्यावे.

य) गोदामासाठी अग्निशमन व्यवस्था आसावी व दर्शनी भिंतीवर सिमेंट कॉक्रीटमध्ये पुढील प्रमाणे कोरीव बोर्ड असावा

महाराष्ट्र शासन पुरस्कृत
राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य) वर्ष सन २०१८-१९
लाभार्थ्यांचे नाव:- .................................. बांधकाम पुर्ण झाल्याचा दिनांक: ..........
एकुण खर्च : रु. ............./- अनुदानाची रक्कम : रु. .............../-

र) गोदाम बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी व बँकेच्या अधिका-यांनी मोका तपासणी करावी आणि तद्नंतर जि.अ.कृ.अ. यांनी अनुदानाची रक्कम लाभधारकाचे गोदामासाठी घेतलेल्या कर्ज खात्यावर जमा करावी.

ल) गोदामाचे जागेचे काम सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यावर Geotagging करून अक्षांश व रेखांश नोंदविणे बंधनकारक राहील.

वरील बाबींपैकी स्थानिक गरजेनुरुप केवळ आवश्यक बाबींची उपलब्ध आर्थीक मर्यादेत निवड करुन त्यांची अंमलबजावणी करण्याची कृपया दक्षता घ्यावी. फ्लेक्झी फंड घटकांतर्गत भौतिक / आर्थिक साध्याचा तपशील घटकांतर्गत ज्या बाबीवर खर्च केला आहे त्याबाबीचे नाव नमुद करुन स्वतंत्ररीत्या मासिक प्रगती अहवालामध्ये दर्शवावा.

**इ) प्रकल्प व्यवस्थापन व संकीर्ण खर्च:** (खर्चाचे प्रमाण केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के)

अभियानाची अंमलबजावणी करतांना कंत्राटी कर्मचा-यांचे मानधन, वाहनाचे भाडे, शेतकरी यशोगाथा तयार करणे, पीक कापणी प्रयोग, फलक व इतर अनुषंगीक खर्चासाठी संकीर्ण बाबीखाली तरतुद करण्यात आलेली आहे.

## ब) अभियान क्र. ३ : वृक्षजन्य तेलबिया अभियान

या अभियानात करंज, कोकम व महुआ या प्रमुख वृक्षजन्य तेलबिया पिकांचे क्षेत्र व उत्पादकता वृध्दीचा उद्देश आहे. अभियानात क्षेत्र विस्तार, लागवडी नंतर देखभाल, शेतकरी प्रशिक्षण, विस्तार अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रशिक्षण, फ्लेक्झी फंड व संकीर्ण खर्च या घटकांचा समावेश आहे.

**अभियान-३ (वृक्षजन्य तेलबिया) चा जिल्हा व घटकनिहाय कार्यक्रम प्रपत्र - ३ मध्ये दर्शविला आहे.**

**अभियानात समाविष्ठ पिके व जिल्हे :**

| अ.क्र | पिक | भौतिक क्षेत्र (हे.) | एकुण तरतुद (रु लाख) | निवडलेले जिल्हे | जिल्ह्यांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | करंज | १०० | २०.०० | ५ | ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, नंदुरबार |
| २ | कोकम | ३४५ | ५१.७५ | ३ | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग |
| ३ | महुआ | ५५ | ८.२५ | ६ | ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, धुळे, नंदुरबार |
| एकुण | | ५०० | ८०.०० | --- | ---- |

**लाभार्थीची निवड:**

१. शेतकरी उत्पादक गट व सभासद तसेच, एफ.पी.ओ. यांचे कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची प्राधान्याने निवड करावी.
२. संबंधीत शेतक-याचे स्वतःचे नावे ७/१२ व ८/अ उतारा असणे बंधनकारक राहील.
३. अनुसुचित जाती/जमाती प्रवर्गातील लाभधारकांनी जातीचा वैध दाखला स्वयंसाक्षांकीत करुन अर्जासोबत जोडावा. लाभार्थी निवड पंचायतराज संस्थेच्या सहभागाने करावी. मंडळ कृषि अधिकारी यांनी निकषांनुसार तपासुन लाभार्थी निवडीस अंतीम मान्यता दयावी व लाभाथीर् यादी ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डवर लावावी.
४. विहीत केलेल्या प्रमाणानुसार अनुसूचीत जाती/जमातीच्या तसेच महिला लाभार्थ्याचा समावेश करणे बंधनकारक राहील.
५. **कार्यक्रमांतर्गत किमान ३० टक्के महिला व ३ टक्के अपंग लाभार्थी निवड करावी.**
६. लाभार्थी शेतकरी मासिकाचा वर्गणीदार नसल्यास वर्गणीदारहोण्यासाठी उद्युक्त करावे.
७. उपविभाग व जिल्हास्तरावरुन याचे सनियंत्रण करण्यात यावे.

**समाविष्ठ बाबी :**

**१) क्षेत्र विस्तार व लागवडी नंतर देखभाल :** (खर्चाचे प्रमाण केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के) (जिल्हास्तर)

करंज, कोकम, महुआ या वृक्षजन्य तेलबियाची लागवड व नंतर देखभालीसाठी पुढील प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

वृक्षजन्य तेलबियाची लागवड व नंतर देखभालीसाठी उच्चतम अनुदान मर्यादा

| अ. क्र. | रोपाचे नाव | प्रति हेक्टर रोप संख्या | लागवड खर्च अनुदान (रु /हे.) | दुस-या वर्षापासून देखभाल कालावधी (वर्ष) | देखभाल अनुदान प्रति वर्ष मर्यादा (रु /हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | करंज | ५०० | २०,०००/- | ४ | २,०००/- |
| २ | कोकम | २५० | १५,०००/- | ६ | २,०००/- |
| ३ | महुआ | २०० | १५,०००/- | ८ | २,०००/- |

**रोपांची उपलब्धता:** करंज, कोकम व महुआ यांची रोपे कृषि विद्यापीठे, समाजिक वनीकरण यांच्याकडुन त्यांच्या निर्धारीत दराने खरेदी करुन शेतक-यांना लागवडीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. क्षेत्र विस्तारासाठी वृक्षनिहाय लागवड लक्षांक व वर्षनिहाय देखभालीचे लक्षांक सोबतच्या जिल्हा/बाबनिहाय तपशीलात दर्शविले आहेत.

**२. शेतकरी प्रशिक्षण : (खर्चाचे प्रमाण केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के):** अभियान - १ प्रमाणे

**३. विस्तार अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रशिक्षण: (खर्चाचे प्रमाण केंद्र ६० टक्के : राज्य ४० टक्के):** अभियान - १ प्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांचे जिल्हयासाठी दिलेल्या लक्षांकानुसार प्रशिक्षणार्थीची निवड करुन प्रकल्प संचालक आत्मा यांचे समन्वयाने तेलबिया वृक्षांची लागवड करण्यापुर्वी प्रशिक्षण आयोजित करावयाचे आहे. प्रशिक्षणार्थीची संख्या, स्थळ निश्चिती, आर्थीक मर्यादा, अनुदान अदायगी इ. बाबतच्या सुचना मिनिमिशन - १ प्रमाणेच राहतील.

**३. फ्लेक्झी फंड :** या घटकांतर्गत शेततळे व डिझेल पंपसंच बाबी समाविष्ठ असून कार्यपद्धती अभियान-१ प्रमाणे राहील.

**४. संकीर्ण खर्च :** शेतकरी यशोगाथा तयार करणे व इतर अनुषंगीक खर्चासाठी संकीर्णखाली तरतुद करण्यात आलेली आहे.

## इतर सर्वसाधारण सूचना:

१. **योजनेसाठी राज्य हिस्सा निधी तरतुदीबाबत** : सदर अभियानात केंद्र : राज्य हिश्याचे प्रमाण ६०: ४० आहे. अभियानासाठी केंद्र हिस्सा तरतुदीचे प्रमाणात राज्य हिस्सा तरतूद जिल्हा नियोजन मंडळाचे माध्यमातून केली जाते. सर्वसाधारण प्रवर्गासाठी जिल्हा नियोजन समिती (डी.पी.सी.) चे माध्यमातून, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे माध्यमातून व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आदिवासी विकास विभागाचे माध्यमातून तरतुदी जिल्हाधिकारी यांचेद्वारे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांना उपलब्ध करून दिल्या जातात. जिल्हा वार्षीक योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करताना सन २०१७-१८ चे मंजूर कार्यक्रमाचे आधारे सन २०१८-१९ साठी राज्य हिश्याकरिता जिल्हा निहाय व लेखाशीर्ष निहाय आवश्यक तरतुदीबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती यांना कळविले आहे. सदर तरतुदी संबंधित विभागांकडून थेट जिल्हा स्तरावर उपलब्ध करून दिल्या जात असल्याने जि.अ.कृ.अ. यांनी जिल्हाधिकारी यांचे माध्यमातून पुरेशा प्रमाणात व वेळेवर तरतुदी उपलब्ध होतील याची दक्षता घ्यावी. संदर्भीय दि. २७/९/२०१७ च्या शासन निर्णयानुसार अभियानाची अंमलबजावणी PFMS द्वारे करावयाची असल्याने केंद्र हिश्यास पूरक राज्य हिस्सा तरतूद जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारे उपलब्ध करून घेऊन PFMS द्वारे खर्च करण्याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मंजूर कार्यक्रमानुसार प्रवर्ग निहाय आवश्यक राज्य हिस्सा तरतुदीबाबत जिल्हाधिकारी व संबंधित विभागास तात्काळ संपर्क साधून निधी उपलब्धतेची व्यवस्था करावी.

२. **सन २०१७-१८ मधील अखर्चित निधी व प्रलंबित दायीत्वाबाबत** : सन २०१७-१८ मध्ये केंद्र शासनाकडून मंजूर कार्यक्रमाच्या तुलनेत केंद्र हिस्सा निधी कमी प्रमाणात उपलब्ध झाला होता. तसेच, उपलब्ध केंद्र हिस्सा निधी सर्वसाधारण व अनुसूचित जाती प्रवर्गासाठी कमी ठरत होता. त्यामुळे मंजूर कार्यक्रमाच्या तुलनेत प्रत्यक्ष अंमलबजावणी व निधी उपलब्धता विचारात घेता काही जिल्ह्यात निधी काही प्रमाणात अखर्चित राहणे व काही प्रमाणात प्रलंबित दायित्व निर्माण झाले आहे. प्रचलित पद्धतीनुसार अखर्चित निधी सन २०१८-१९ मध्ये वापरण्यास केंद्र/राज्य शासनाची मान्यता घ्यावी लागते. सन २०१७-१८ चे प्रलंबित दायित्व सन २०१८-१९ साठी उपलब्ध होणा-या निधीतून खर्ची टाकण्यास केंद्र/राज्य शासनाची मान्यता घ्यावी लागते. केंद्र/राज्य **शासनाकडून सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्राथम्याने प्रलंबित दायित्वाची अदायगी करावी.** प्रलंबित दायित्वाच्या अदायगीसाठी प्रवर्गनिहाय लागणारी राज्य हिश्याची अतिरिक्त तरतूद जिल्हा स्तरावर उपलब्ध करून घेण्याचे दृष्टीने कार्यवाही करावी.

३. **बाबबदलाबाबत कार्यपद्धती** : केंद्र शासनाने कळविलेला नियतव्यय, पिकाखालील सर्वसाधारण व्याप्त क्षेत्र, मागील ३ वर्षातील घटकनिहाय साध्य इ. बाबी विचारात घेवून जिल्हानिहाय, घटक/बाब निहाय लक्षांक ठरविले जातात. मात्र, स्थानिक परिस्थितीनुरूप विविध कारणास्तव एखाद्या घटका/बाबीवर निधी खर्च होत नसल्यास बाबबदल प्रस्ताव जि.अ.कृ.अ. स्तरावरून थेट आयुक्तालयास सादर केले जातात. सदर बाबबदल प्रस्ताव दोन प्रकारात मोडतात,

**अ) प्रमुख घटकामध्ये अंतर्भूत बाबीतील बाबबदल (इन्ट्राकॉम्पोनन्ट) व**

**ब) प्रमुख घटकामधील बाबबदल (ईन्टर कॉम्पोनन्ट).**

असेही निदर्शनास येते की, एकाच विभागांतर्गत एक जिल्हा एखाद्या घटक/बाबीचे साध्य होत नसल्याने बदल मागतो तर दुसरा जिल्हा त्याच घटक/बाबीसाठी अतिरिक्त कार्यक्रम मिळण्याची विनंती करतो. वास्तविक, प्रचलीत प्रशासकीय पद्धतीनुसार जिल्ह्यांनी आयुक्तालयास थेट प्रस्ताव सादर न करता प्रथमत: विभागीय कार्यालयास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

विभागीय स्तरावरून अशा प्रस्तावांची विभागासाठी जिल्हानिहाय व घटकनिहाय दिलेल्या लक्षांकाचा आढावा घेवून घटकासाठी मंजूर एकूण तरतुदीचा विचार करून, प्रस्तावांची स्थानिक परिस्थिती व तांत्रिक/आर्थिक दृष्ट्या योग्यायोग्यतेबाबत छानणी करून प्रथम विभागांतर्गत जिल्हांतर्गत बदल करणे अपेक्षित राहते. तद्नंतर **केवळ अपवादात्मक परिस्थितीत आवश्यकतेनुरूप** आयुक्तालयास प्रस्तावित करणे उचित ठरते. मात्र, तसे घडत नसल्याने नाहक कालापव्यय होतो. त्यादृष्टीने खालील सविस्तर सूचना देण्यात येत आहेत.

**१) प्रमुख घटकामध्ये अंतर्भूत बाबीतील अंतर्गत बाबबदल (इन्ट्राकॉम्पोनन्ट):** अभियानांतर्गत खालील पाच प्रमुख एकूण घटक आहेत. अ) बियाणे, ब) तंत्रज्ञान प्रसार, क) उत्पादन वाढीसाठी निविष्ठा व औजारे व सिंचन सुविधा, ड) फ्लेक्झी फंड व इ) व्यवस्थापन खर्च हे प्रमुख घटक आहेत. सदर प्रमुख घटकांमध्ये अंतर्भूत बाबी सदर प्रमुख घटकाचाच भाग ठरतात.

अ) **बियाणे घटक** : याखाली पायाभूत/प्रमाणित बिजोत्पादन, प्रमाणित बियाणे पुरवठा या बाबी येतात. त्यातील अंतर्गत बदल एकाच घटकाखाली येत असल्याने तो एकाच प्रमुख घटकांतर्गत बदल ठरतो, बाबबदल ठरत नाही. उदा. बिजोत्पाद्नावरील बचत होणा-या तरतुदीतून बियाणे पुरवठा घटकासाठी निधी वर्ग करणे किंवा उलट प्रक्रिया हि बाब घटकांतर्गत बदल ठरते. त्यासाठी वेगळ्या मान्यतेची गरज भासत नाही. **सदर प्रमुख घटकांतर्गत बदल वि.कृ.स.सं. स्तरावरून विभागासाठी मंजूर सदर घटकाच्या कार्यक्रमाचा आढावा घेवून राज्य हिस्सा निधीची खात्री करून मंजूर निधी मर्यादेत मंजूर करावेत.** मात्र, प्रमुख बियाणे घटकावरील तरतूद बियाणे व्यतिरिक्त इतर प्रमुख घटकांवर वर्ग करणे आंतरघटक (ईन्टर कॉम्पोनन्ट) बाबबदल ठरतो. त्यास केंद्र शासनाचे मान्यतेशिवाय मान्यता देता येत नाही. कारण, बियाणे घटकावरील तरतुदीतून इतर प्रमुख घटकावर बाबबदल करण्यास मान्यता देण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत.

ब ) **तंत्रज्ञान प्रसार घटक**: याखाली पीक प्रात्यक्षिके, प्रशिक्षणे याबाबी येतात. **प्रात्यक्षिकांतर्गत पीक बदल** एकाच घटकाखाली येत असल्याने त्यातील अंतर्गत बदल एकाच प्रमुख घटकांतर्गत बदल ठरतो, बाबबदल ठरत नाही. **सदर प्रमुख घटकांतर्गत बदल वि.कृ.स.सं. स्तरावरून विभागासाठी मंजूर सदर घटकाच्या कार्यक्रमाचा आढावा घेवून निधी मर्यादेत मंजूर करावेत.**

क ) **उत्पादन वाढीसाठी निविष्ठा व औजारे व सिंचन सुविधा:** याखाली एकात्मीक अन्नद्रव्ये व्यवस्थापन, एकात्मीक कीड/रोग व्यवस्थापन, कृषि औजारे पुरवठा व पाईप्सचा पुरवठा याबाबी येतात. या सर्व बाबी एकाच प्रमुख घटकाखाली येत असल्याने त्यातील अंतर्गत बदल एकाच प्रमुख घटकांतर्गत बदल ठरतो, बाबबदल ठरत नाही. **सदर प्रमुख घटकांतर्गत बदल वि.कृ.स.सं. स्तरावरून विभागासाठी मंजूर सदर घटकाच्या कार्यक्रमाचा आढावा घेवून निधी मर्यादेत मंजूर करावेत.**

ड) **फ्लेक्झी फंड :** सदर घटकाखालील मंजूर बाबी शेततळे, डीझेल पंपसंच व गोदाम उभारणी याबाबत जिल्ह्यांतर्गत बदल **वि.कृ.स.सं. स्तरावर विभागाचा सदर प्रमुख घटकाच्या कार्यक्रमाचा आढावा घेवून निधी मर्यादेत मंजूर करावेत.**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे अभियानांतर्गत एकाच प्रमुख घटकातील समाविष्ठ विविध बाबीमध्ये बदल अनुज्ञेय आहे. त्यासाठी विभागीय स्तरावर मान्यता द्यावी व त्याची प्रत आयुक्तालयास पाठवावी, असे प्रस्ताव आयुक्तालयास पाठविण्याची आवश्यकता नाही.

**२) एका प्रमुख घटकावरून दुस-या प्रमुख घटकावर बाबबदल (इन्टर कॉम्पोनन्ट)**: वर नमुद केलेल्या पाच प्रमुख घटकांमधील बदल हे आंतरघटक बदल ठरतात. जसे, **तंत्रज्ञान प्रसार** घटकावरील तरतुद **फ्लेक्झी फंड** अथवा इतर घटकांवर वर्ग करणे व तत्सम बदल हे आंतरघटक बदल सदरात येतात. बियाणे घटकावरील तरतुदीतून इतर प्रमुख घटकावर बाबबदल करण्यास मान्यता देण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत. त्याव्यतिरिक्त अभियानांतर्गत इतर आंतरघटक बदलास राज्यस्तरीय २० टक्के मर्यादेत राज्यस्तरीय मान्यता समितीची मान्यता घेणे बंधनकारक आहे. त्यामूळे, असे आंतरघटक बाबबदल शासन मान्यतेशिवाय कोणत्याही परिस्थितीत परस्पर करु नयेत. **त्यासाठी सबळ कारणमिमांसेसह विभागीय कृषि सहसंचालक यांच्या शिफारसीने सविस्तर प्रस्ताव आयुक्तालयास सादर करावेत.**

विभागीय कृषि सहसंचालक यांनी विभागाचा घटकांतर्गत मंजूर कार्यक्रम, उपलब्ध निधी (केंद्र व राज्य हिस्सा) याचा विचार करुन विभागांतर्गत समान घटकाच्या लक्षांकाच्या मर्यादेत बदल असल्यास त्यास मान्यता देवून तसे आयुक्तालयास कळवावे. मात्र, आंतरघटक बदल असल्यास शासन मान्यतेसाठी सर्व तपशीलासह प्रस्तावीत करावे.

जिल्हा/विभागांतर्गत मंजुर कार्यक्रमानुसार खरीप हंगामातील बचतीतुन रब्बी/उन्हाळी हंगामात एकाच घटकातर्गत कार्यक्रम राबविणे प्रस्तावित असल्यास त्यानुसार आवश्यक राज्य हिस्सा निधी, निविष्ठा उपलब्धता याची खात्री करुन सदर कार्यक्रम जिल्ह्याच्या तरतुदीतून किंवा विभागस्तरावरील घटकाच्या एकूण तरतुदीतून विभागीय कृषि सहसंचालक यांचे मान्यतेने राबविण्यास हरकत नाही. मंजुर कार्यक्रमानुसार संपुर्ण निधी खर्ची करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा/विभागाची राहील यांची नोंद घ्यावी.

४. **लाभार्थी प्रवर्गनिहाय करावयाच्या खर्चाबाबत:** केंद्र शासनाच्या प्रशासकीय मान्यतेच्या पत्रानुसार उपलब्ध तरतुदीपैकी सर्वसाधारण, अनुसुचीत जाती लाभार्थ्यांसाठी व अनुसुचीत जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी तरतुद स्वतंत्र प्रपत्रात दर्शविली आहे त्याप्रमाणे लाभ देणे बंधनकारक आहे.

एकुण तरतुदीच्या ३० टक्के तरतुद महीला व ३ टक्के अपंग लाभार्थी शेतक-यांवर खर्च करावी. केंद्र हिश्यासाठी तरतुद आयुक्तालयीन स्तरावरुन शासनाद्वारे करण्यात येत आहे. आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय दि. ३/४/२०१७ नुसार अ.जमाती प्रवर्ग व सामाजीक न्याय विभागाच्या शासन निर्णय दि. १३/४/२०१७ नुसार अनुसुचित जाती प्रवर्गासाठी त्याचप्रमाणे प्रचलीत पध्दतीनुसार सर्वसाधारण प्रवर्गासाठी प्रवर्गनिहाय राज्य हिस्सा तरतुद जिल्हा नियोजन समितीचे (डी.पी.सी.) माध्यमातून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी उपलब्ध करुन घेण्याची व्यवस्था करावी.

## अभियानाचे सनियंत्रण:

शासनाने निर्देशित केलेप्रमाणे लाभार्थ्यांच्या यादीनुसार सर्व लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतावर हाती घेण्यात आलेल्या कार्यक्रमाची प्रत्यक्ष तपासणी संबंधित गावातील कृषी सहाय्यकांनी करायची असून आपला अहवाल तालुका कृषी अधिकाऱ्यामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे. विविध स्तरावर खर्चाच्या तपासणीची टक्केवारी खालीलप्रमाणे राहिल.

**योजनेचे सनियंत्रणाकरिता खालील प्रमाणे तपासणी करावी.**

| अ.क्र. | संनियंत्रण स्तर | तपासणी टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सह संचालक | ०.५० |
| २ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १.०० |
| ३ | उप विभागीय कृषि अधिकारी | ५.०० |
| ४ | तालुका कृषि अधिकारी | २५.० |
| ५ | मंडळ कृषि अधिकारी | ५०.० |
| ६ | कृषि पर्यवेक्षक | १००.०० |

प्रत्येक महिन्यात विभागीय कृषि सहसंचालक यांनी किमान एका क्लस्टरला भेट दयावी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ३ क्लस्टरला भेट दयावी. कृषि उपसंचालक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील ५० टक्के क्लस्टरला भेटी दयाव्यात. भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांनी निविष्ठा पुरवठा व इतर कार्यक्रमांचा आढावा घ्यावा. भेट नोंदवहीमध्ये तशी नोंद करावी व शेऱ्यामध्ये सूचना लिहाव्यात. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी नियमीतपणे अभियानाचा आढावा घ्यावा व जिल्हयाचा मासिक प्रगती अहवाल ईमेल व्दारे व टपालाद्वारे विभागीय कृषि सह संचालक व आयुक्तालयास *nmoopdda@gmail.com* वर पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सोबत दिलेल्या प्रपत्रामध्ये सादर करावा.

**अभियानाचे सनियंत्रण व मूल्यमापन :-**

- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य व तेलताड) कार्यक्रमामध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची प्रवर्गनिहाय माहिती केंद्र शासनाच्या nfsm.gov.in/nfmis/NM_Login.aspx_ या वेबसाईटवर तसेच कृषी विभागाच्या MIS मध्ये ऑनलाईन वेळेत भरण्याची जबाबदारी तंत्र सहाय्यक यांची राहील.
- अभियानाच्या मासिक प्रगतीचा अहवाल आयुक्तालयाने विहित केलेल्या प्रपत्रात प्रवर्गनिहाय दर महिन्याच्या दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा.
- शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे घटकनिहाय, प्रवर्गनिहाय लाभार्थी यादी संकेत स्थळावरती भरणे बंधनकारक असल्यामुळे अपूर्ण माहिती असल्यास पुढील निधीचे वितरण केले जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत गावनिहाय वाटप केलेल्या निविष्ठा, प्रात्यक्षिके व इतर दिलेले लाभ याबाबतची माहिती लाभार्थ्यांच्या यादीसह ग्रामपंचायतीकडे पाठवून सदरील माहिती ग्रामसभेत जाहीर करावी.
- अभियानांतर्गत राबविलेल्या सर्व घटकांमुळे प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या उत्पादकतेवर दिसून आलेल्या परिणामांचे मूल्यमापन करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल उपविभागीय कृषी अधिकारी यांनी हंगामाच्या अखेरीस आयुक्तालयास सादर करावा.

- अभियानांतर्गत शेतकऱ्यांनी/गटांनी उत्कृष्टपणे राबविलेल्या कार्यक्रमाच्या यशोगाथा छापील / डिजिटल स्वरुपात तयार करून आयुक्तालयास सादर कराव्यात. यासाठी अभियानातील प्रशिक्षण व संकीर्ण बाबीखालील तसेच कृषी विभागाने इतर योजनांमध्ये उपलब्ध करून दिलेल्या निधीचा वापर करावा.

अभियान अंमलबजावणी प्रगती व निधी मुक्ततेच्या दृष्टीने उपयोगीता प्रमाणपत्रे केंद्र शासनास प्रत्येक तिमाही नंतर सादर करावी लागतात. त्यासाठी जि.अ.कृ.अ.यांनी अभियान अंमलबजावणी प्रगतीबाबत जून, सप्टेंबर, डिसेंबर व मार्च तिमाहीची उपयोगीता प्रमाणपत्र पुढील महिन्याच्या ५ तारखे पर्यंत ईमेल व्दारे व टपालाद्वारे विभागीय कृषि सह संचालक व आयुक्तालयास *nmoopdda@gmail.com* वर पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावीत. अभियानांतर्गत थेट लाभ पद्धतीने (डी.बी.टी.) दिल्या जाणा-या लाभाचा लाभार्थीनिहाय सविस्तर तपशील आधार क्रमांक व मोबाइल क्रमांकासह केंद्र शासनाच्या अभियानाचे पोर्टल *nmoop.gov.in* वर डी.बी.टी. रिपोर्ट सदराखाली नियमितपणे भरणे बंधनकारक आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

विभागीय कृषि सह संचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना संगणकीय प्रणालीव्दारे अनुदानाचे वितरण करण्यात येईल. संगणकीय प्रणालीव्दारे उपलब्ध करुन दिलेले अनुदान महिनानिहाय पूर्णपणे खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

**अभियान संचालक (रा.अ.सु.अ. -गळीत व तेलताड) तथा**
**कृषि संचालक (वि.प्र.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**सोबत:-** प्रपत्र-१ (अभियानाच्या मुलभुत सर्वेक्षणासाठीचे प्रपत्र)
प्रपत्र-२ जिल्हानिहाय भौतिक / आर्थिक कार्यक्रम - अभियान क्र. १ (गळीतधान्य)
प्रपत्र-३ जिल्हानिहाय भौतिक / आर्थिक कार्यक्रम - अभियान क्र.३ (वृक्षजन्य तेलबिया
प्रपत्र-४ (बियाणे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत नमुना)
प्रपत्र-५ (कृषि सहाय्यक पिक कापणी प्रयोग नोंदवही नमुना)
प्रपत्र-६ (अ,ब,क) पीक प्रात्यक्षिक भेटीचा तपशील
(एकुण सहपत्रे १ ते )

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य व तेलताड)
(मार्गदर्शक सूचना सन २०१८ -१९)

जा.क्र.कृ.आ./विप्र.२/**NFSM (OS&OP)**/मा.सू.२०१८-१९ /प्र.क्र.५ /      /१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, पुणे -४११००५,
दूरध्वनी क्र. ०२०-२५५३७६९७ इमेल : nmoopdda@gmail.com
**दिनांक :**        /०५/२०१८

प्रति,

**१) विभागीय कृषि सह संचालक (सर्व संबंधीत)**
**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व संबंधीत)**

विषय - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य व तेलताड) सन २०१८ -१९
**मार्गदर्शक सूचना.....**

संदर्भ : १) केंद्र शासनाच्या कार्यकारी मार्गदर्शक सुचना दि. ०४ फेब्रुवारी २०१४
२) केंद्र शासनाचे इंग्रजी पत्र क्र. 4-1/2018-19/NFSM (OS&OP), दि. ०२/०५/२०१८
३) शासन निर्णय कृषि व प.दु.म. विभाग क्र. अेअेपी-२०१८/प्र.क्र.४६/४ अे , दि.१६ /५/२०१८

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान -गळीतधान्य व तेलताड (National Food Security Mission Oilseeds & Oilpalm) अभियान सन २०१८-१९ करीता केंद्र व राज्य शासनाकडुन संदर्भ क्र. २ व ३ अभियाननिहाय खालीलप्रमाणे मंजुरी प्रदान केलेली आहे.

(रु लाख)

| अ.क्र. | अभियान | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | अभियान क्र. १ (गळीतधान्य) | ४१११.२४ | २६८७.५० | ६७९८.७४ |
| २ | अभियान क्र.३ (वृक्षजन्य तेलबिया) | ६३.७४ | ४२.५० | १०६.२४ |
| **एकुण** | | **४१७४.९८** | **२७३०.००** | **६९०४.९८** |

सदर अभियानाच्या कार्यकारी मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाने संदर्भ क्र. *१* अन्वये निर्गमित केलेल्या असून सदर कार्यकारी मार्गदर्शक सुचना केंद्र शासनाच्या *www.nmoop.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

उपरोक्त प्रमाणे केंद्र / राज्य शासनाने प्रदान केल्लेल्या मंजुरीनुसार सन *२०१८-१९* साठी मार्गदर्शक सुचना व जिल्हा/पिक/बाबनिहाय कार्यक्रम सोबत सहपत्रित करण्यात येत आहे. सदर मार्गदर्शक सुचना कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (http://www.krishi.maharashtra.gov.in) प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी तालुकानिहाय लक्षांक निर्धारीत करुन क्षेत्रिय स्तरावर अभियानाची तत्काळ अंमलबजावणी करावी.

**सोबत :- वरीलप्रमाणे**

**अभियान संचालक (रा.अ.सु.अ.-गळीत व तेलताड)**
**तथा**
**कृषि संचालक (वि.प्र.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत :** १) मा.अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२) मा. जिल्हाधिकारी (सर्व संबंधित) यांना माहीतीस्तव सविनय सादर.

**पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव समादाराने अग्रेषित**

१) मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाबीज भवन, अकोला.
२) मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, प्रभादेवी, राजन हाऊस, मुंबई.
३) क्षेत्रीय विक्री अधिकारी, हिंदुस्थान ईन्सेक्टीसाईज लिमीटेड, नागपूर ४४० ०१०.
४) क्षेत्रीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बियाणे महामंडळ (*NSC*), ६८१-६९०, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७.
५) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, ५८३/बी, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या, मार्केट यार्ड, गुलटेकडी पुणे-३७
६) कृषि उपसंचालक, मृद चाचणी प्रयोगशाळा, कृषि भवन, पुणे - ५

# प्रपत्र ५

## कृषि सहाय्यक स्तरावरील पिक कापणी प्रयोग नोंद वही नमुना

## सन २०१८-१९

कृषि सहाय्यकाचे नाव : ------------------------------------------------------------

कार्यक्षेत्र :

प्रात्यक्षिकाचे गाव : ---------- तालुका : ------------ जिल्हा : --------------

पिक : वाण :

| सहभागी शेतक-यांचे नाव व शेत गट क्र | प्रात्यक्षिकातील क्षेत्र (हे.) | मिळालेले उत्पादन (क्विं/हे.) | | किमान आधारभूत किमतीनुसार मिळालेले उत्पन्न (रु./हे.) | | प्रात्यक्षिकातील मिळालेले निव्वळ वाढीव उत्पन्न (रु./हे.) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रात्यक्षिकातील | पारंपारिक पध्दतीने | प्रात्यक्षिकातील | पारंपारिक पध्दतीचे | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| एकूण | | | | | | |

वरिष्ठ अधिका-याने या नोंदवहीत तपासणी करून दिनांकासाहित अभिप्राय नोंदवून स्वाक्षरी करावी.

- प्रात्यक्षिकांचे अनुभवावरून गावातील/जवळपासच्या क्षेत्रातील किती शेतक-यांनी तंत्रज्ञान अवलंब केला. त्यांची शेतकरी संख्या --- व क्षेत्र ----- हे.
- प्रात्यक्षिकास भेटी दिलेल्या शेतक-यांची संख्या ------
- सदर अभिलेख अभियानाच्या मूल्यमापनाचे वेळी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

**सदर कृषि सहाय्यकाची बदली झाल्यास नोंदवही रुजू होणा-या नवीन कृषि सहाय्यकाकडे वर्ग करावी. सदर अभिलेख कायमस्वरुपी (२० वर्ष) जतन करणे बंधनकारक राहील.**

- ➢ तालुक्याची सरासरी उत्पादकता ...................................................................
- ➢ प्रात्यक्षिकासाठी निर्धारित उत्पादकता ...................................................................
- ➢ प्रात्यक्षिकात आलेली उत्पादकता ...................................................................